मुलींची गीतें

कविवर्य मोरोपंत-
कृत

सौ. सीताबाई
जयवंत



गृहा आणावया । मागें हरिणा मी । दुःख परिणामीं । नेणोनियां ॥

सीतागीत, अभंग २७.

महाराष्ट्र-कवि-वर्य-मोरोपंत-कृत

मुलींचीं गीतें.

हें पुस्तक

सौ॰ सीताबाई जयवंत

यांनीं

कठीण शब्दांचे अर्थ आणि सुबोध व विपुल टीपा देऊन

मुलींकरितां

तयार केलें.

मुंबईत

जावजी दादाजी

यांच्या "निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

१९०३.

किंमत बारा आणे.



[illegible]

सीतागीत, अभंग २७

महाराष्ट्र-कवि-वर्य-मोरोपंत-कृत

मुलींचीं गीतें.

हें पुस्तक

सौ० सीताबाई जयवंत

यांनीं

कठीण शब्दांचे अर्थ आणि सुबोध व विपुल टीपा देऊन

मुलींकरितां

तयार केलें.

मुंबईत
जावजी दादाजी
यांच्या "निर्णयसागर" छापखान्यांत छापिलें.

१९०३.

किंमत आठ आणे.

अर्पणपत्रिका.

माझी परम प्रिय माता

तीर्थरूप सौ० यमुताई चिटणीस,

व

माझे परम प्रिय वडील

तीर्थरूप रा० रा० मल्हार खंडेराव चिटणीस,

बी. ए., एल्. एल्. बी.

यांस

हें पुस्तक

अत्यंत नम्रतापूर्वक

अर्पण केलें आहे.

सौ० सीताबाई (मैना).

प्रस्तावना.

महाराष्ट्रकविवर्य मोरोपंत यांनीं केलेलें सीतागीत मीं कांहीं दिवसांपूर्वीं नवनीतांतून वाचिलें तेव्हांच तें मला फार आवडलें, आणि असें वाटलें कीं मुली झोंपाळ्यावर बसून जीं इतर गाणीं ह्मणतात त्यांपेक्षां हें गीत ह्मणतील तर फार बरें होईल, व या सीतागीतांतील कठीण शब्दांचे अर्थ व टीपा देऊन एक लहानसें पुस्तक तयार केल्यास मुलींना फार उपयोग होईल. ह्मणून नवनीत, काव्यसंग्रह, व मराठी कोश या पुस्तकांच्या साहाय्यानें मीं टीपा तयार केल्या व त्यांची हस्तलिखित प्रत ती० रा. रा. नारायण चिंतामण केळकर यांजकडे पहाण्याकरितां पाठवून दिली. ती त्यांनीं मोठ्या आस्थेनें तपासली आणि पुस्तक छापण्याविषयीं उत्तेजन दिलें. पुढें कांहीं दिवसांनीं काव्यसंग्रहांत छापिलेलीं सावित्रीगीत व रुक्मिणीहरणगीत हीं दोन गीतें वाचून त्यांवर मीं टीपा तयार केल्या, आणि त्यांचीही हस्तलिखित प्रत ती० रा. रा. केळकर यांनीं पूर्वींप्रमाणें शुद्ध केली. तसेंच ती० रा. रा. केळकर यांनीं या पुस्तकाकरितां उपोद्घात लिहिण्याची कृपा केली. त्यांचे मजवर या कामीं जे उपकार झाले आहेत त्यांची फेड या ठिकाणीं त्या उपकारांचा प्रणतिपूर्वक उल्लेख करण्यापलीकडे होणें शक्य नाहीं; कारण 'जें जें दिलें तें तें । सद्गुरूला अल्प, । वंदनचि कल्प- । तरुपूजा ॥' असें स्वतः मोरोपंतकवींनींच (रुक्मिणीहरणगीत अभंग ५२ येथें) ह्मटलें आहे. सारांश हें पुस्तक तयार करण्याचे कामीं ती० रा. रा. केळकर यांजकडून उत्तेजन व साहाय्य मिळाल्यामुळेंच मीं हें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें धारिष्ट केलें आहे.

हें पुस्तक मुलींना विशेष आवडावें ह्मणून यांतील चित्रें रा. रा. लक्ष्मण नारायण तासकर—जे मुंबई आर्ट्स्स्कुलांत एक शिक्षक आहेत व ज्यांना मुंबई येथील चित्रकलाप्रदर्शनांत अनेक

वेळां बक्षिसें मिळालीं आहेत—यांनीं मुद्दाम तयार करून दिलीं याबद्दल मी रा. रा. तासकर यांची फार आभारी आहें.

हें पुस्तक मुद्दाम मुलींकरितां तयार केलें आहे. तरी महाराष्ट्र-कुटुंबांतील मुलींचे आईबाप, पालक व शिक्षक यांच्याकडून या पुस्तकास चांगला आश्रय मिळेल अशी आशा आहे.

आतां या गीतत्रयाविषयीं कांहीं अभंग मुलींच्या ओंवीवृत्तांत माझ्या पूज्य वडिलांनीं केले आहेत ते येथें त्यांच्या परवानगीनें देऊन ही प्रस्तावना पुरी करितें.

अभंग.

रुक्मिणी, सावित्री,
सीता पतिव्रता,
यांच्या गोड कथा
पवित्र ज्या; १
त्या गीतीं गाईल्या
मयूर कवीनें,
झालीं हृष्ट मनें
भाविकांचीं. २
रुक्मिणी-हरण-
गीत मनोहर;
वाटे हर्ष फार
रसिकांना. ३
सावित्री-गीत तें
पवित्र पुण्यद;
निघे धन्य-वाद
सर्वांमुखीं. ४
सीता-गीत आहे
प्रेमळ रसाळ;
ऐकतां सकळ
डोलतात. ५
मुलींनीं हीं गीतें
भक्तीनें वाचावीं,
प्रेमें आदरावीं,
मागणें हें. ६
मुलींना आमुच्या
देव सुखी ठेवो,
सद्बुद्धि तो देवो,
प्रार्थना ही. ७

मु० नाशिक.
मार्गशीर्ष शु० १५ शके १८२५
(ता० ४ दिसेंबर १९०३).

सौ० सीताबाई जयवंत.

महाराष्ट्र-कवि-वर्य-मोरोपंत-कृत मुलींचीं गीतें.

उपोद्घात.

महाराष्ट्रकविवर्य मोरोपंत (इ. स. १७२९ ते १७९४) हे आपल्या वयाच्या तेविसाव्या वर्षी बारामतीकर काळे यांचे घरीं आपले तीर्थरूपांकडे गेल्यावर थोड्या दिवसांनीं अशी गोष्ट घडून आली कीं यजमानांच्या मुली झोंपाळ्यावर बसून 'एकसरी दूसरी तीसरीला बिंदी। चवथीला चिंधी घालूं केली;' 'कोल्हापूर शहरामध्यें विंचवाची पेटी। वस्ती केली तूझ्यासाठीं अंबाबाई;' 'सरजाची नथ सरसगट मोतीं आठ। पूणेरि तूझा थाट मामीबाई'—असल्या असंबद्ध व नीरस ओव्या ह्मणत होत्या; त्या पंतांनीं ऐकल्या. तेव्हां त्यांच्या मनांत आलें कीं मुलींना योग्य, लहान लहान आणि बोधपर अशीं प्रसिद्ध स्त्रियांचीं चरितें जर यांना अभंगवृत्तांत (ह्मणजे मुलींच्या ओवीवृत्तांत) रचून दिलीं तर यांचीं गाणीचीं गाणीं आणि उपदेशाचा उपदेश, अशीं दोनही साधतील. असा विचार येऊन त्यांनीं त्या मुलींना विचारिलें, 'तुम्हांस कांहीं नवीन गाणीं करून दिलीं तर तीं तुह्मी म्हणाल काय?' त्यांनीं ती गोष्ट ताबडतोब कबूल केली आणि लगेच आमच्या भावी कविरायांनीं रुक्मिणी, सावित्री आणि सीता या तीन पूज्य पतिव्रतांचीं चरित्रें अत्यंत सोप्या अशा वृत्तांत आणि अर्थाला विशेष सुगम म्हणजे मुलींना सुद्धां समजतील अशा रीतीनें रचिलीं. हीं नवीन गाणीं मुलींनीं म्हणतांना यजमानांनीं ऐकिल्यावर स्वाभाविक रीतीनें त्यांनीं चौकशी केली. आणि आपल्या कारकुनाच्या चिरंजीवाची ही कृति आहे, असें कळल्यावर त्यांना फार आनंद झाला. अशी प्रस्तुतच्या तीन गीतांबद्दल एक आख्यायिका सर्वश्रुत आहे; आणि ती इतकी स्वाभाविक आणि संभवनीय आहे कीं तिच्या खरेपणाबद्दल शंका घेण्याचें कांहींच कारण दिसत नाहीं.

या तीन गीतांपैकीं रुक्मिणीहरणगीत ही एका प्रसिद्ध प्रणयविवाहाची कथा

आहे. यांत सर्वांच्या मर्जीविरुद्ध रुक्मि हा आपल्या बहिणीचें शिशुपालाशीं लग्न लावणार असें पाहून आधींपासूनच जिनें श्रीकृष्णास आपला देह अर्पण केला होता त्या रुक्मिणीनें एका ब्राह्मणाबरोबर सर्व हकीगत लिहून व शेवटीं या संकटांतून आपणास सोडविण्याबद्दल मनःपूर्वक प्रार्थना करून एक पत्र श्रीकृष्णास पाठविलें; आणि त्यावरून कृष्णानें आयत्या वेळीं येऊन आपल्या अतुल सामर्थ्यानें शिशुपालादि सर्व राजेलोकांस मोह पाडून रुक्मिणीला आपल्या रथावर घेतलें, आणि शेवटीं दुष्टांचा पराभव करून व रुक्मीचेंही योग्य पारिपत्य करून रुक्मिणीचा हेतु पूर्ण केला. एवढा कथाभाग आहे. त्यावरून प्रभूला आपण अनन्यभावें शरण गेल्यास तो वाटेल त्या संकटापासून आपणास मुक्त करून इष्ट हेतु सिद्धीस नेतो एवढें तात्पर्य घेण्यासारखें आहे.

दुसरें सावित्रीगीत. हें वरीलपेक्षां ज्यास्त सुरस आणि बोधप्रद आहे. सावित्री ही एका राजाची अत्यंत आवडती, एकुलती आणि उपवर कन्या होती. तिनें पित्राज्ञेवरून आपला पति स्वतःच पसंत केला, तो केवळ सत्य-वानाच्या गुणाकडे पाहून केला. त्याचा बाप 'अंध, वृद्ध, रिपुहृतराज्य आणि वनस्थ' असा असूनही तो परमेश्वरावर दृढ विश्वास ठेवून 'न काळजी वाहे' आणि 'कुलशीलसत्वगुणनिधि तो पुत्रकलत्रमात्र परिवार । परि वार सर्व सम त्या कीं मथिला स्वांतरस्थ अरिवार ॥' यामुळेंच जिला 'तो श्वशुर मानला' त्या मुलीची गुणग्राहकता किती वर्णन करावी? त्याचप्रमाणें 'तूं पसंत केलेला सत्यवान् एक वर्षानें मृत्यु पावणार आहे' असें नारदानें सांगितल्यावरही 'वरिला तो वरिलाचि स्पर्शावा या न अन्य कायातें' हा जिचा दृढनिश्चय आणि त्यामुळें आपल्याला पतिसुख जरी फारसें मिळालें नाहीं तरी आपल्या कृतीनें पतिव्रता स्त्रीचें कर्तव्य जगाला स्पष्ट कळेल; आणि 'स्तवितील कुलीन कन्यका यातें' या-करितांच जी या जगांतील आपल्या सर्व सुखावर पाणी सोडण्यास तयार झाली, त्या सावित्रीच्या योग्यतेचें बरोबर वर्णन कोण करूं शकेल? पुढें पतिसेवातत्परतेनें आणि सशरीर 'सहगमनाच्या' निश्चयानें प्रत्यक्ष यमधर्मा-कडूनही सत्यवानाची सुटका होऊन ह्या दंपत्त्यास सर्व सुखें प्राप्त झालीं ही

गोष्ट निराळी. तात्पर्य अशा योग्यतेच्या ह्या वटसावित्रीचें व्रत सर्व हिंदुस्त्रिया व लहान मुलीसुद्धां दरवर्षी करितात यांत नवल तें काय? हिंदुसमाजामध्यें अशा उत्तमोत्तम व्रताचारामुळें स्त्रीसमूहावर जो परिणाम घडला आहे, त्यामुळेंच स्वार्थत्याग, सहिष्णुता, धर्मश्रद्धा, काटकपणा हे बलवत्तर गुण आपल्या 'अबलां'च्या आंगीं पुरुषांपेक्षां बऱ्याच जास्त प्रमाणावर आढळून येतात, हें विचार करणारांस समजून येईल.

आतां शेवटचें आणि सर्वांत श्रेष्ठ असें सीतेचें चरित्र पंतांनीं सीतागीतांत गुंफिलें आहे. रुक्मिणीपेक्षां सावित्री; आणि सावित्रीपेक्षां सीता हें नांव हिंदुस्त्रियांना जास्त परिचित आहे. रामावतार म्हणजे सर्वोत्तम अशा सात्विक गुणांच्या पूर्ण विकासाचा चित्रपट असून त्यांत सीतादेवीची मूर्ति रामाच्या बरोबरीनें अथवा राम आणि सीता मिळून एकवटलेलें असें एक सुंदर चित्र प्रमुखत्वानें आणि उत्कर्षानें विराजत आहे. इतकें निष्कलंक, शुद्ध, प्रेमळ, हृदयंगम आणि कुकल्पनेला थोडासुद्धां थारा न देणारें असें दुसरें चरित्र हिंदूंच्या ग्रंथांत तर नाहींच; पण सर्व पृथ्वीवर दुसरीकडे कोठेहि सांपडणें कठीण आहे. पित्राज्ञेमुळें पत्करिलेला वनवास, जिच्या सापत्नभावानें आपणांस राज्यास मुकावें लागलें त्या आपल्या सावत्र आई कैकईशींसुद्धां निष्कपट वागणूक, इत्यादि गोष्टींनीं रामचंद्राचें चित्र जसें खुलतें, त्याप्रमाणेंच किंवा त्याहूनही थोडें ज्यास्तच, सर्व बाळपण माहेरीं आणि सासरीं राजवाड्यांत व राजविलासांत गेल्यामुळें कोमललतिकेप्रमाणें नाजूक अशा या राजकन्येचीं चौदा वर्षें आपल्या पतीबरोबर वनांत जाण्याची तयारी, परमवैभवशाली रावणाच्या अशोकवनांत राहून तो अनेक तऱ्हांनीं विनवण्या करीत व वारंवार धमक्या देत असतांही कल्पनेंत सुद्धां जिच्या पवित्र अंतःकरणाला अशुद्ध विचार शिवला नाहीं ही गोष्ट, त्याचप्रमाणें लोकमताला मान देण्याकरितां पत्यनुज्ञेप्रमाणें दिव्य करण्याची तयारी आणि शेवटीं गरोदर असतांनाहि पुन्हां अरण्यवास पतकरणें या सर्व संकटांच्या कसोटीस जी सीताबाई न डगमगतां उतरली तिची सर देवस्त्रियांनाही येणें कठीण; मग मानवी स्त्रियांना कोठून

येणार ? हा हिंदुस्त्रियांपुढें ठेविलेला कित्ता फार अवघड आहे खरा; पण तो नेहमीं पुढें ठेवून गिरविल्यामुळें परकीय लोकांनाही ज्यांचीं नांवें पूज्य आहेत अशा स्त्रिया आपल्याकडे होऊन गेल्या. आयुष्यामध्यें जीं अनेक संकटें व मोहजनक प्रसंग आपणावर येतात, त्यांतून निभावून जाण्याचें तप जो करील त्यासच त्याची सिद्धि प्राप्त होईल. म्हणून प्रत्येकानें कर्तव्यजागरूक असावें—कसलाही प्रसंग येऊन पडला, कोणतीही स्थिति प्राप्त झाली, तरी सत्यापासून व सत्वापासून ढळूं नये—हें या चरित्रावरून शिकावयाचें आहे.

असो. अशीं तीन सुंदर चरितें पंतांनीं निवडून काढून वारामतीकर काव्यांच्या मुलींना त्यांचीं सोपीं गीतें करून दिलीं यावरून व पंतांनीं विठोबादादा चातुर्मासे यांस लिहिलेल्या पत्रांतील ‘श्रीनारायण अभंग व श्रीरुक्मिणीस्वयंवर अभंग दोन पाठविलीं आहेत, लिहून घेऊन लवकर पाठवावीं. चिरंजीव सौभाग्यवती मुलींस वाचावयास पाहिजेत’ या मजकुरावरून पंत स्त्रीशिक्षणाचे चाहते होते हें उघड आहे. असो. या गोष्टीस आज दीडशें वर्षें झालीं. या अवधींत ह्या गीतांचा सर्वसंग्रहकारांनीं प्रथम उद्धार केला; आणि अलीकडे काव्यसंग्रहांतूनही तीं प्रसिद्ध झालीं आहेत. पण त्यांची आख्यायिका व योग्यता जाणून मुलींच्या शाळांतून अथवा सुशिक्षितांच्या घरांतून त्यांची संथा सुरू असल्याचें आजपर्यंत कधींही माझ्या ऐकण्यांत आलें नाहीं. लहान मुली इतर वेडींवांकडीं वाटेल तितकीं गाणीं भराभर पाठ करून टाकतात; पण या गीतांचें महत्त्व जाणून हीं गीतें त्यांजकडून पाठ करवून म्हणवून घेतलीं तर त्यांजपासून फार उपयोग होईल ही कल्पना स्त्रीशिक्षणाची कळकळ असणाऱ्या आम्हांपैकीं कोणालाही येऊं नये ही सखेदाश्चर्याची गोष्ट आहे. पण त्याच्या उलट सानंदाश्चर्याची गोष्ट प्रस्तुत घडून आली आहे. ती ही कीं अशीं उत्तम गीतें मुलींना चांगलीं उपयोगीं व्हावीत म्हणून त्यांतील कठीण शब्दांचे अर्थ आणि सुबोध व विपुल टीपा देऊन त्यांचें निराळेंच पुस्तक तयार करण्याचें महत्वाचें काम एका सोळा वर्षांच्या सुशिक्षित मुलीनें आपल्या लहान बहिणींकरितां फार उत्तम रीतीनें

केलें आहें. चि० सौ० मैनाबाईची ही अभिनंदनीय कृति पाहून त्यांचे वडील व माझे परम मित्र रा० रा० मल्हार खंडेराव चिटणीस यांना जसा आनंद झाला असेल तसा आनंद स्त्रीशिक्षणाची कळकळ असणाऱ्या गृहस्थांनाही होईल यांत संशय नाहीं.

प्रस्तुत पुस्तकांतील गीतत्रयासंबंधानें विवेचन करून त्याचा उपयोग मुलींना किती आहे हें वर थोडक्यांत सांगितलें आहे. आतां ओघानें मध्यमस्थितींतील मुलींच्या हल्लींच्या शिक्षणाबद्दल दोन शब्द लिहिणें अगत्याचें आहे असें वाटल्यामुळें ते येथें नमूद करितों.

स्त्री आणि पुरुष ह्यांची योग्यता सूक्ष्म दृष्टीनें पाहतां एकमेकांहून कमी अगर ज्यास्ती अशी ठरवितां येणार नाहीं. वास्तविक पाहिलें तर दोहोंची योग्यता सारखीच आहे.

याबद्दल आपल्या श्रुतींतही आधार सांपडतात.

॥ पाटितोयं द्विजः पूर्वमेकदेहः स्वयंभुवा ॥
॥ पतयोर्धेन चार्धेन पत्न्योभूवन्निति श्रुतिः ॥
॥ यावन्न विंदते जायां तावदर्धो भवेत्पुमान् ॥
॥ नार्धं प्रजायते सर्वं प्रजायेतेत्यपि श्रुतिः ॥

अर्थः—पूर्वी स्वयंभूनें एक देह दुभागून अर्ध्या भागानें पति निर्माण केले व अर्ध्या भागानें पत्नी निर्माण केल्या, अशी श्रुति आहे. लग्न होईपर्यंत पुरुष अर्धाच असतो. अर्ध्या देहापासून उत्पत्ति नाहीं. पूर्ण देहापासून(च) प्रजा होते. अशी ही श्रुति आहे. यावरून पुरुष व स्त्री मिळून एक शरीर आहे, व दोघांची योग्यता प्रपंचांत समसमान आहे हें स्पष्ट होय.

त्याचप्रमाणें भारतांत म्हटलें आहे:—

॥ अर्धं भार्या मनुष्यस्य भार्या श्रेष्ठतमः सखा ॥
॥ भार्या मूलं त्रिवर्गस्य भार्या मूलं तरिष्यतः ॥

भार्या ही पुरुषाची अर्धांगी आहे, भार्या उत्तम मित्र आहे. धर्म, अर्थ आणि

काम हे तिन्ही पुरुषार्थ प्राप्त करून देणारी भार्याच आहे आणि भार्येच्या योगानेंच मनुष्य हा संसारसमुद्र सहजगत्या तरून जातो.

दुसऱ्या एका दृष्टीनें पाहिलें तर स्त्रीपुरुषांची तुलनाच करितां येणार नाहीं. कारण तुलना करण्यास दोन वस्तूंची अगदीं समान अशी स्थिति घेतली पाहिजे. म्हणजे या जगांत स्त्रीपुरुषांचीं कामें हीं एकच असलीं पाहिजेत. पण वस्तुस्थिति तर मुळींच तशी नाहीं. स्त्रीपुरुषांचीं कर्तव्यें एकच प्रकारचीं नाहींत, आणि तीं परस्पर विरुद्धही नाहींत, तर तीं परस्परांचीं पूरक आहेत. म्हणजे स्त्रीचें जें काम तें पुरुषाचें नाहीं, आणि पुरुषाचें जें काम तें स्त्रियांचें नव्हे. तरी पण दोहोंनीं मिळून एकच काम करावयाचें असतें. तें काम दोन भागांचें मिळून झालेलें असून प्रत्येक भागाला निराळ्या दृष्टीनें महत्त्व आहे. दोहोंचीं कार्यें भिन्न आहेत; पण तीं एकाच मुख्य कामाला पोषक होतात. स्त्रीपुरुषांचा संसार अथवा या जगांतील जें कर्तव्य त्याला गलबताची उपमा चांगली लागू पडते. गलबत फार हेलकावूं नये व वादळांतही उलटूं नये म्हणून त्यांत निलीम भरतात म्हणजे तळाशीं वाळूचीं पोतीं वगैरे वजनदार पदार्थ घालीत असतात. त्याचप्रमाणें वायूच्या योगानें गति मिळावी म्हणून त्याला एक शीड लाविलेलें असतें. आतां तें वजन आणि त्या गलबताचें शीड ह्या दोहोंचे उपयोग व कामें जरी निरनिराळीं आहेत तरी गलबताच्या कामाला त्या दोहोंचीही सारखीच जरूरी असते. म्हणजे शीड नसेल तर त्याची गतीच कुंठित होईल; बरें, जोराचा वारा सुटला तर तें उलटूं न देण्याला आंतील वजनच उपयोगी आहे. म्हणजे एक गत्युत्पादक असून दुसरें स्थिरता कायम ठेवणारें आहे. त्याचप्रमाणें घराबाहेर व्यवहारांत श्रमाचीं, चळवळीचीं आणि उलाढालीचीं कामें पुरुष करितात. [1]त्यांचा कल आणि बुद्धि नवीन गोष्टी करण्याकडे अथवा हुडकून काढण्याकडे आणि त्यांची उमेद सत्पक्षाचे कामीं धाडसी कृत्यें आणि लढाया करून जय मिळविण्याकडे असते. परंतु स्त्रि-

[1] यापुढील भागांत स्त्रीपुरुषांची तुलना व मुलींचें शिक्षण यासंबंधानें रस्किनच्या सिसॅम ॲन्ड लिली या पुस्तकांतील कांहीं मुद्यांचा उपयोग केला आहे.

यांची बुद्धि घरांत व बाहेर शांतता आणि सुखसंपादन करण्याकडे आणि स्वतः श्रम करून सुख वाढविण्याकडे असते. पुरुष जगांत व्यवहरत असतां त्यांतील घडामोडी, मोहपाश आणि संकटें यांत तो सांपडून अपमान, चुका, पराजय हीं त्याच्या वांट्यास ज्यास्त येतात. परंतु आपली जी गृहदेवता तिचें तो ह्या सर्वांपासून निवारण करितो. ह्या गृहांत सर्वत्र स्वस्थता, एकोपा आणि समाधान वास्तव्य करितें; घराबाहेरील चढाओढ, गडबड आणि अस्वस्थता ह्यांचें वारेंहि चांगल्या गृहिणीच्या गृहांत नसतें. बाहेर जगांत जरी दुही आणि द्वैधीभाव असला तरी आंत पूर्ण अद्वैत नांदत असतें. दिवसभर व्यवहार करून जीव रात्रीं सुपुम्नानाडींत प्रवेशून जसा पूर्ण आनंद अनुभवितो; त्याप्रमाणेंच पुरुष घरीं आल्यावर त्याच्या सर्व श्रमांचा परिहार होतो. अशा या आनंदाच्या जागेकरितां म्हणजे कुटुंबांतील माणसांच्या सौख्याकरितांच, पुरुषाची जगांतील सर्व गड-बड चाललेली असते. याच गडबडीमुळें जेव्हां कांहीं अडचणी उत्पन्न होतात, त्या वेळीं उत्तम गृहिणी, मित्र व मंत्री होऊन, त्या अडचणी दूर करण्यास मोठें साह्य करिते; मनुष्यस्वभावाचें सुंदर चित्र रेखाटणारा जो आंग्लकविमु-कुटमणि शेक्सपियर यानें आपल्या सर्व नाटकांमध्यें नायिकांचीच सरशी दाखविली आहे. संकटांत न डगमगतां वाटेल तितके श्रम करून नायकास एखादी तोड सांगून अथवा एखादी अजब युक्ति लढवून त्याला मुक्त करणाऱ्या नायिकेचाच सर्वत्र विजय झालेला ह्या नाटकांतून दिसून येतो. तात्पर्य सत्व-गुणाच्या प्रकर्षामुळें संसारयात्रा सुखमय करण्याला उत्तम स्त्रियाच विशेषतः कारणीभूत होतात. मुलांचें संगोपन आणि शिक्षण हें चांगल्या आयांच्या हातून जसें होतें तसें चांगल्या पुरुषांच्या हातून होणें शक्य नाहीं.

प्रेम, दया, विनय, पापभीरुता, स्वहितनिरपेक्षता हे गुण विशेष रीतीनें स्त्रियांमध्यें दिसून येतात आणि त्यामुळेंच सुशिक्षित कुटुंबांमध्यें स्त्रियांचें योग्य वर्चस्व दिसून येतें. कुटुंबांतील सर्व माणसांबद्दल व विशेषेंकरून मुलांबद्दलचें स्त्रीवर्गाचें सात्विक प्रेम हें लहानपणीं सुद्धां स्पष्ट दिसून येतें. एकाच कुटुंबांतील सारख्या वयाचा मुलगा व मुलगी अशीं दोघें घेतलीं तर मुलीची मनोवृत्ति

मुलापेक्षां निराळी दिसून येते. मुलाचा कल मारामारी करणें, हट्ट करणें, स्वतःच्या कर्मणुकीकडे पाहणें इत्यादि गोष्टींकडे जास्त असतो. पण तीच मुलगी आईच्या मागें मागें राहून तिला कामें करावयास लागेल व आपल्या भावाशीं भांडण झाल्यास हार खाईल. तसेंच आपल्या लहान भावंडांस खेळविणें जरूर असल्यास मुलगे लवकर कंटाळून पळून जातील पण मुली त्यांनां प्रेमानें घेऊन त्यांची कर्मणूक करण्यांत गुंग होऊन जातील. उलट एखादें दांडगाईचें अथवा क्रूरपणाचें काम करावयास मुलगा जितका लवकर सरसावेल तितकी मुलगी तयार होणार नाहीं. एवढेंच नव्हे; पण अशा कृत्याला ती आपली संमतिही देणार नाहीं. थोडे दिवसांपूर्वी लंडन येथें एक स्त्रीग्रंथकारांची सभा भरली होती तेव्हां स्त्रियांचीं कर्तव्यें या विषयावर लेडी जहांगीर या पार्शीबाईचें लहानसेंच पण चटकदार भाषण झालें. आणि तें तेथील स्त्रियांनाही वरेंच आवडलेंसें दिसलें. त्यांत पूर्वेकडील स्त्रियांच्या संबंधानें पुढील विचार आहेत:—

"आशियाखंडांतील स्त्रियांचा घराबाहेरील सार्वजनिक चळवळींशीं मुळींच संबंध नसतो. त्यांचें जग व त्यांचा आयुष्यक्रम त्यांच्या घराचे आंतच असतो. त्या घरामध्यें त्यांचें वर्चस्व राणीप्रमाणें असून अत्यंत प्रेम करणारा पति व मुलें हीं तिचे प्रजाजन असतात! ह्या वर्चस्वाची कल्पना तुम्हां पाश्चात्य स्त्रियांस कधींही येणार नाहीं. माझ्या मतें स्त्रियांची ही स्थिति स्वाभाविक व फार सुखदायक आहे. प्राचीन काळीं तुमच्या स्त्रियांचीही स्थिति अशीच होती; आणि अजूनही स्त्रियांस अंतःकरणापासून हीच स्थिति स्वभावतः आवडते. 'मोठे झाल्यावर तुम्ही कोण होणार?' असा प्रश्न एका लहान भाऊबहिणीस विचारिला असतां 'मी शिपाई होऊन राजाच्या शत्रूंशीं लढेन' असें मुलानें उत्तर दिलें; आणि 'मी मोठेपणीं आई होईन' असें मुलीनें उत्तर दिलें! ह्या मुलीनें सांगितलेली ही इच्छा प्रत्येक स्त्रीचे मनांतून केव्हांही नाहींशी होत नाहीं. आशियाखंडांतील स्त्रियांचें आयुष्य ह्या ईश्वरी संकेताचे जवळ जवळ असतें. माता व तिचें अपत्य ह्या ईश्वरी संबंधावरच स्त्रियांचें खरें वर्चस्व

अवलंबून आहे असें आम्ही मानितों; आणि ह्या वर्चस्वाची शाश्वतीही या संबंधाखेरीज इतर कोणत्याही गुणांवर अवलंबून राहणार नाहीं!"

अशा योग्यतेच्या ज्या स्त्रिया त्यांचें शिक्षण साधारणतः कोणत्या तत्वावर असलें पाहिजे याचा विचार करूं या.

१ प्रथमतः त्यांची प्रकृति सदृढ होऊन त्यांच्या शरीरास तजेला व सौंदर्य येईल अशा प्रकारचें शारीरिक शिक्षण मुलींना मिळणें अवश्य आहे. मोकळ्या मनानें जेथें हिंडतां फिरतां येईल, फुगडी झिम्म्यासारखे खेळ खेळतां येतील व मोठ्यानें गाणीं म्हणतां येतील, असें एक स्थळ त्यांच्या शाळेला जोडून अवश्य असलें पाहिजे. मग ती स्वतंत्र बाग असो अथवा शाळेचें आवारच मोठें असो. प्रत्येक घराला याच कामाकरितां एखादें सुंदर परडें अथवा बगीचा असणें हें आपल्या मध्यम स्थितीच्या लोकांत हल्लीं अशक्य झालें आहे. पण मुलींच्या ज्या सार्वजनिक शाळा असतात त्यांसंबंधानें वरील सोय असणें अत्यंत अवश्य आहे व शक्यही आहे. हल्लीं आपण मुलांच्या शाळांतून तालीम, क्रिकेटग्राउंड वगैरेची सोय केलेली पाहतों, पण मुलींच्या शाळा म्हटल्या म्हणजे भरवस्तींत एखादी लहानशी भाड्याची जागा अथवा बाग किंवा मोठें आवार नसलेली एखादी इमारत असावयाची. यासाठीं या कामीं सुधारणा करण्यास योग्य अधिकारीवर्गाचें या विषयाकडे अशा रीतीनें यापुढें जितकें लक्ष जाईल तितकें बरें.

२ हल्लीं शाळांतून मुलांना जें शिक्षण देण्यांत येतें तेंच सदोष आहे म्हणून त्यामध्यें वस्तुदर्शनपाठासारिखे नवीन विषय घालून त्याला सुधारलेलें स्वरूप देण्याचा प्रयत्न सुरू आहे. मुलींच्या शाळेंतही आजपर्यंत जें शिक्षण देण्यांत येत आहे तें बहुतेक मुलांच्याच नमुन्यावर दिलें जातें; पण ही केवळ चूक आहे. कारण वर सांगितल्याप्रमाणें स्त्रीपुरुषांचीं या जगांतील कामें जशीं भिन्न आहेत, त्याचप्रमाणें त्यांचे मनोविकार व प्रवृत्ति ह्यांचा स्वाभाविक कलही भिन्न असतो. स्त्रियांचा कल सात्विक मनोवृत्तींनीं प्रेरित असतो. पुरुषांमध्यें तामसी वासनांचें प्राबल्य असतें. यामुळें स्त्री ही गृहसौख्याचें निधान होतें

आणि पुरुष जगांतील उलाढाली करण्यास समर्थ होतो. त्याच्या तमोगुणाला स्त्रीसंगति हा एक चांगला आळा आहे. यास्तव पुरुषांप्रमाणें स्त्रियांमध्येंही तामसी वासनांचें प्राबल्य होऊं नये व केवळ श्रेष्ठ वासना वाढाव्या अशी व्यवस्था त्यांच्या शिक्षणांत झाली पाहिजे. भक्ति किंवा धर्मावरील विश्वासाच्या योगानें एक प्रकारचें बळ उत्पन्न होतें आणि त्यामुळें आंगीं सद्गुण उत्पन्न होण्यास जी स्वहितनिरपेक्षता लागते ती आंगीं येणें शक्य होतें. तिच्यापासूनच करारीपणा, दुसऱ्याकरितां कष्ट सोसण्याची शक्ति वगैरे उत्तमोत्तम गुण पुरुषांपेक्षां स्त्रियांच्या आंगीं ज्यास्त प्रमाणावर उत्पन्न झालेले दिसून येतात. पुरुषांप्रमाणें स्त्रियांमध्यें तामसवृत्तीचें प्राधान्य असतें तर या जगाचें स्वरूप आजमितीस अगदींच निराळें व दुःखमय झालें असतें. पुरुषांमध्येंही सात्विकगुण नाहींत असें नाहीं; पण त्यांचें प्रमाण एकंदरीनें कमी आहे हें खास.

वरील विवेचनावरून हें लक्षांत आलें असेल कीं मुलांच्या आणि मुलींच्या स्वाभाविक मनोवृत्ति व या जगांतील कामें भिन्न असून तीं एकमेकांस मदत करणारीं अशीं आहेत म्हणून त्यांच्या शिकण्याच्या विषयांची मर्यादा, शिक्षण देण्याचा मार्ग, पुस्तकांतील धडे वगैरे सर्व पुष्कळ अंशानें मुलांच्यापेक्षां निराळे असले पाहिजेत. पुष्कळ पुस्तकें व भाषा येण्यापेक्षां संकटांत सापडलेल्या गरीब माणसावर सुद्धां दया करणें, शास्त्रीय नियम पाठ करण्यापेक्षां सृष्टींतील प्राणिमात्रावर प्रेम करणें, इतिहासांतील नांवें व तारखा पाठ करण्यापेक्षां त्यांतील न्यायान्यायाचीं कृत्यें व त्यांना मिळणारें योग्य बक्षीस अथवा शासन, इत्यादि गोष्टी त्यांच्या मनावर पूर्णपणें बिंबविल्या पाहिजेत. त्यांचे कोमल मनोविकार जागृत ठेवून, निराश्रितावर दया करणें हें आपलें आद्य कर्तव्य आहे ही गोष्ट त्यांना समजावून दिली पाहिजे. त्यांचे मनोविकार फार तीव्र असल्यामुळें अद्भुत कादंबऱ्या त्यांच्या हातीं जितक्या न पडतील तितक्या चांगल्या. त्यांनीं थोडीं पुस्तकें वाचिलीं तरी कांहीं हरकत नाहीं पण जीं पुस्तकें त्यांना वाचावयास द्यावयाचीं तीं काळजीपूर्वक निवडून दिलीं पाहिजेत. तात्पर्य बुद्धिविषयक शिक्षणापेक्षां त्यांच्या कोमल व उच्च मनोवृत्तींना पोषक असेंच शिक्षण मुलींना ज्यास्त मिळेल

अशी तजवीज केली पाहिजे. पुढें दिलेल्या मर्यादित शिक्षणक्रमापलीकडे त्यांनीं मुळींच जाऊं नये असें माझें म्हणणें नाहीं. त्यांत ज्यास्त विषयांची भर घालून त्यांना ज्यास्त ज्ञान प्राप्त करून दिल्यास त्यापासून ज्यास्त फायदा होईल हें खरें. पण आपल्या सध्याच्या परिस्थितींत मध्यम स्थितींतील गृहस्थांच्या मुलींना तरी आणखी बरींच वर्षेंपर्यंत पुढें दिलेला शिक्षणक्रम पुरेसा होईल किंवा पुरून उरेल असें म्हणण्यास हरकत नाहीं. परिस्थितींत जसजसा बदल होत जाईल तसतसा यांतही तो झालाच पाहिजे, आणि होईलही. पण स्त्री व पुरुष ह्यांच्या स्वाभाविक मनोवृत्तींत आणि जगांतील कर्तव्यांत जें अंतर आहे तें नेहमीं डोळ्यांपुढें ठेवून चाललें पाहिजे. आज उद्वेग उत्पन्न करणारी गोष्ट ही आहे कीं मुलींना शाळांतून दिलें जाणारें शिक्षण त्यांच्या श्रमाच्या मानानें पुढील आयुष्यक्रमाला जितकें फायदेशीर व्हावें तितकें होत नाहीं. कारण त्या कामीं वरील गोष्टींचा विचार जितका व्हावयास पाहिजे तितका झालेला दिसत नाहीं. आमचें म्हणणें सयुक्तिक दिसल्यास मुलींच्या आईबापांनीं योग्य तो फेरफार घडवून आणण्याची खटपट करावी.

३ सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट ही कीं आपल्या मुलींचे शिक्षक स्वभावानें, वर्तणुकीनें आणि विद्येनें स्पृहणीय असून ज्यांना तुम्ही स्वतः मान द्याल असेच असले पाहिजेत. आपल्या मुलांच्या गुरुजींना आपण जर तुच्छतेनें वागवून त्यांची अवहेलना केली, त्यांच्याबद्दल अपूज्य भावानें बोललों, तर तीव्र मनोविकारांच्या व बुद्धीच्या मुलींना आपल्या स्वतःच्या बुद्धीचें अथवा शिक्षणाचेंहि महत्त्व वाटावयाचें नाहीं. या गोष्टींकडे चांगलें लक्ष न पुरविल्यामुळें आपल्या मुलांच्या मनावर त्याचा काय परिणाम होतो, हें पुष्कळ विद्वान् लोकांच्याही लक्षांत येत नाहीं.

वरील गोष्टींचा स्थूलरीत्या विचार झाला. आतां जें शिक्षण हल्लींच्या परिस्थितींत आपल्या हिंदु अथवा महाराष्ट्रसमाजांतील मध्यम स्थितीच्या मुलींना देतां येईल त्याचें थोडक्यांत विवेचन करूं.

मुलींना सातवर्षांच्या आंत शाळेंत पाठवूं नये. तोंपर्यंत आईनेंच घरीं अक्षरओळख करून द्यावी आणि पुढें सातपासून १२ वर्षांपर्यंत मराठी शाळां-

तून शिक्षण द्यावें. हल्लीं मुलांचा व मुलींचा शिक्षणक्रम बहुतेक सारखाच आहे. म्हणून त्यांपैकीं मुलींचीं इयत्तापत्रकें खालील धोरणानें तयार करणें जरूर आहे.

(अ) गणित—व्यवहाराला लागणारे तोंडचे हिशेब, सरळव्याज, खाजगी जमाखर्चाची पद्धत, व्यवहारांतील मापाचीं व वजनाचीं कोष्टकें (हीं कोष्टकें प्रत्यक्ष जिन्नस मापून व मोजून शिकवावयाचीं.) यापेक्षां ज्यास्त अवघड आणि व्यवहारांत निरुपयोगी विषय शिकविण्याचें कारण नाहीं.

(आ) इतिहासभूगोल—महाराष्ट्राचा इतिहास व हिंदुस्थानच्या इतिहासाची सामान्य माहिती. भारत आणि रामायण यांतील ठळक कथा. भूगोल—हिंदुस्थानांतील इलाखे व प्रांत, मोठीं गांवें, क्षेत्रें, नद्या, पर्वत वगैरे आणि महाराष्ट्राची विशेष माहिती, ही सर्व केवळ नकाशावरून (पुस्तकाचा उपयोग न करितां) शिकविणें. जगाच्या नकाशावरून फक्त खंडें, देश वगैरे अगदीं ठोकळ माहिती देणें. इतिहास शिकवितांनाही तो गोष्टीच्या रूपानें सांगून पुस्तकांचा उपयोग होईल तितका कमी करणें.

(इ) अक्षर आणि भाषा—अक्षर मोडी व बाळबोध चांगलें लिहितां येणें. यांतच पत्रांचे मायने वगैरेंचा समावेश करावा. याशिवाय यांत ज्यास्त सुचविण्यासारखें नाहीं. भाषाविषयासंबंधानें मात्र कांहीं फरक करणें जरूर आहे तो असा.—व्याकरण हा विषय फार कसोशीनें शिकविण्याचें कारण नाहीं. त्यांतील साधारण परिभाषा व वर्गीकरण समजलें म्हणजे पुरे; आणि तेंहि अगदीं वरच्या वर्गांत शिकवावें. क्रमिक पुस्तकांपैकीं वरच्या पुस्तकांत जे शास्त्रीय धडे हल्लीं आहेत त्यांचे ऐवजीं बालबोध व करमणूक यांतील नमुन्यावर शास्त्रीय माहितीचे अगदीं सोपे व मनोरंजक धडे चित्रांसह घालावे. आरोग्यमार्ग, सूपशास्त्र, गृहव्यवस्था, बाळशिक्षण, बाळसंगोपन वगैरे स्त्रियांना विशेष उपयोगी अशा विषयांवरील धडे ज्यास्त घालावे. शिवाय ग्रेसदार्लिंग, जानकाक्रन वगैरे परकीय लोकांच्या माहितीचे धडे काढून त्यांच्या ऐवजीं हिंदुस्थानांतीलच पौराणिक आणि ऐतिहासिक स्त्रीपुरुषांच्या मनोरंजक आणि बोधप्रद गोष्टी असाव्या. कवितेच्या धड्यामध्यें

लहान लहान गाणीं, सीतागीतासारखीं गीतें व केरळकोकिळांतील 'सासरची पाठवणी' वगैरे स्फुट कविता असावीं. अशा रीतीनें बदल करून मुलांचीं आणि मुलींचीं क्रमिक पुस्तकें निरनिराळीं करून मुलींच्या पुस्तकांत सुंदर चित्रें वगैरे ज्यास्त असावीं.

(ई) शिवणकाम, घरांतील व्यवस्था व कामें, अजाऱ्यांची व मुलांची शुश्रूषा हीं कामें मुलींच्या वयाच्या मानानें त्यांस समजावून द्यावीं.

(उ) मुली लहान असतांना फुगड्या, छप्पुपाणी, कोंबडा, वगैरे खेळ आणि वरच्या यत्तेंत दळण, कांडण, धान्य पाखडणें, वेचणें, भाजा नीट करणें व चिरणें, ओयरा घेणें, स्वयंपाक करणें, परकरचोळी व साड्या धुणें वगैरे कामें शाळेचे विषय म्हणूनच मुलींकडून करवून घ्यावीं. या शिक्षणानें शाळेंत जाणाऱ्या मुलींना घरच्या कामांचा कंटाळा येणार नाहीं.

तात्पर्य, मुलींच्या गृहशिक्षणाला ज्यांची जरूर नाहीं असे विषय कमी करून व त्यांना उपयोगी असे विषय वाढवून जेणेंकरून स्त्रिया सदाचारसंपन्न, सुशील, विनययुक्त, बालसंगोपनकुशल, गृहकार्यदक्ष आणि स्वकर्तव्यजागरूक होऊन धर्मपत्नी हें नांव अन्वर्थक करितील अशा प्रकारचें शिक्षण त्यांना मिळेल अशी तजवीज केली पाहिजे.

वरीलप्रमाणें शिक्षण मिळाल्यास मुली सशक्त राहतील आणि जरूर तेवढें शिक्षण त्यांना तेराव्या वर्षापर्यंत शाळेंत मिळालें म्हणजे पुढें घरीं तेच विषय ज्यांचे त्यांस सवडीप्रमाणें वाढवितां येतील. सांप्रत मध्यम स्थितींतल्या आपल्या कुटुंबांतील स्त्रियांस घरचीं कामें संभाळून ज्या शिक्षणाचा उपयोग करून घेतां येईल असें शिक्षण एवढेंच. त्यांनीं पुढें दिलेलीं वर्तमानपत्रें, मासिकपुस्तकें आणि इतर स्वतंत्र ग्रंथ हे आपल्या योग्यतेप्रमाणें वाचून आपल्या ज्ञानाला वाटेल तेवढी भर घालावी. आणि कुटुंबांतील जरूरीचीं कामें करून त्यांना जी फुरसत मिळेल ती सर्व भरून काढण्याला पुढील पुस्तकें वगैरे पुरून उरण्यासारखीं आहेत.

स्वतंत्रग्रंथ—भारतामृत, चिपळूणकरांचें भागवत व रामायण, बाळसंगोपन

व शुश्रूषा यांवरील पुस्तकें, कै० रानड्यांच्या यादींतील मराठी ग्रंथ, कै० गाडगिळांच्या संसारसुखांतील निवडक पुस्तकें, बडोद्याच्या ग्रंथसंपादक आणि प्रसारकमंडळीचीं पुस्तकें, दाभोळकरांचीं पुस्तकें, कै० दीक्षितांचा ज्योतिर्विलास, रा० चिटणिसांचे अंतरिक्षांतील चमत्कार, रा० सरदेसाई यांच्या रियासती, साधुसंतांचीं चरित्रें, मराठी कवींचीं काव्यें, ऐतिहासिक स्त्रीपुरुषांचीं चरित्रें वगैरे अनेक सोपे धार्मिक, नीतिविषयक, शास्त्रीय, सामाजिक व राजकीय ग्रंथ.

मासिकपुस्तकें—महाराष्ट्रमहिला, मासिकमनोरंजन, बालबोध, केरळ-कोकिळ, विविधज्ञानविस्तार, सरस्वतीमंदीर, ग्रंथमाला, काव्यसंग्रह वगैरे.

वर्तमानपत्रें:—करमणूक, केसरी, सुधारक, सयाजीविजय वगैरे.

हल्लींच्या स्थितीप्रमाणें पाहतां वर दिलेल्या यादींतील वाङ्मय आमच्या कौटुंबिक स्त्रियांना पुरणार नाहीं अशी कुरकुर येण्याचा संभवच नाहीं, असें मला खात्रीनें वाटतें. हें सर्व शिक्षण अर्थात् मराठींतच दिलें पाहिजे. या भाषेंत गद्यपद्यात्मक ग्रंथांची संख्या वाढत आहे तेव्हां आणखी थोड्याच वर्षांत वरील भांडारांत चांगलीं निवड करण्यास पुष्कळ सोय होईल.मराठीला नाक मुरडून कांहीं मध्यमस्थितींतील लोक आपल्या मुलींस आणि स्त्रियांस इंग्रजी शिक्षण देण्याचा व्यर्थ प्रयत्न करितात; या भल्या गृहस्थांना आपल्या ऐपतीची, आपल्या स्त्रियांच्या फुरसुतीची व ज्या परिस्थितींत त्यांना सारा जन्म काढावा लागतो व आणखी थोड्याशा फरकानें तो तसाच बरींच वर्षें काढावा लागेल, त्या परिस्थितीची चांगलीशी अटकळ न करितां आल्यामुळें त्यांचा हा प्रयत्न निष्फल होतो. जी कांहीं थोडी स्त्रियांची हौस असेल ती परकीय भाषेचें तुटपुंजें ज्ञान प्राप्त करण्यांतच जाते, आणि तेवढ्या श्रमानें मराठी वाङ्मयांतून मिळणाऱ्या ज्ञानाला त्या मुकतात व उत्तम विचारानें भरलेल्या इंग्रेजी ग्रंथांचें परिशीलन करण्याइतकें परभाषेचें ज्ञानही प्राप्त होत नाहीं. यामुळें 'दोहींकडे अंतरला, थोरपणें भांबावला.' अशी स्थिति होते. कारण हल्लीं मुलींचीं लग्नें १२ पासून १४ वर्षांच्या आंत होतात. आणि जरी याहून एखाददुसरें वर्ष मुलगी अविवाहित

राहिली तरी लग्नानंतर लौकरच त्या विदुषीला मातृस्थानापन्न होण्याची पाळी आली कीं तिची कंबर खचलीच. शिवाय माहेरीं जितक्या सवलतीनें अभ्यास होतो तितका नव्या घरीं होणें शक्य नाहीं म्हणून फार झालें तर एक दोन वर्षेंच इंग्रजीचा अभ्यास करावयास सांपडेल; आणि हें ज्ञान पुढें लग्नानंतर कितीही वाढविलें तरी तें एखादा वजनदार इंग्रजी ग्रंथ समजण्याजोगें होणें संभवनीय नाहीं. परकीयभाषेच्या अभ्यासाच्या चरकानें मुलांची स्थिति काय होते याचा आपण नीट विचार केला तर असें दिसून येईल कीं हल्लींच्या पदवीधर विद्यासंपन्नांपैकीं शेंकडा नव्वद लोक महत्त्वाच्या व उपयुक्त वाचनापासून पराङ्मुख झालेले असतात. दररोजचीं वर्तमानपत्रें चाळणें व कादंबऱ्या वाचणें हें ज्ञानसंपादन फारशा किंमतीचें मानितां येणार नाहीं. ग्रंथमालेंतील गतवर्षनिरीक्षणाचे लेख वाचले अथवा विविधज्ञानविस्तारासारख्या भारदस्त मासिकपुस्तकाकरितां लेख गोळा करण्याकरितां व्यवस्थापकांस पडणाऱ्या त्रासाची चौकशी केली तर वरील विधानास जरूर तो पुरावा मिळेल. अशी शोचनीय स्थिती होण्यास परभाषेशिवाय आणखीहि अनेक कारणें असतील; परंतु हें मुख्य कारण नाहीं असें म्हणावयास मी तरी निदान तयार नाहीं. आमच्या आंग्लविद्याविभूषितांपैकीं शेकडा जे दहापांच लोक विद्यादेवीचे भक्त असतील त्यांनीं इंग्रजींतून नवीन नवीन मिळणारें ज्ञान स्वभाषेच्या द्वारें आपल्या केवळ मराठी जाणणाऱ्या देशभगिनींना व बंधूंना देण्याचें मनावर घेतलें तरी पुरे होईल. भाषा म्हणजे कांहीं ज्ञान नव्हे. म्हणून अर्धेमुर्धे इंग्रजी शिकण्यांत कांहीं अर्थ नाहीं हें बहुतेकांस कबूल होईल असें वाटतें.

आपल्या महाराष्ट्रांतील मध्यमस्थितींतील स्त्रियांना संसार आटोपून फुरसत फार थोडी राहते याकरितां त्यांचा सर्व शिक्षणक्रम मराठींतच चालावा असें वर प्रतिपादन केलें आहे. यावरून आमच्या स्त्रियांना परभाषेचें शिक्षण मुळींच नको, व इंग्रजींतल्या उत्तमग्रंथभांडाराची व त्यांची गांठ पडणें भयावह आहे अशाप्रकारचें माझें म्हणणें आहे असा गैरसमज कोणींहि करून घेऊं नये. कॉलेजांतील सर्व शिक्षण पुरे होईपर्यंत ज्यांना आपल्या मुलींना लग्नाशिवाय ठेवितां

येईल किंवा चाकरनोकरांचें ऐश्वर्य असल्यामुळें मुबलक वेळ देतां येईल अशा स्त्रियांना मिडवाईफ किंवा एल् एम् अँड एस्, एम् डी अशा वैद्यकांतील परीक्षा देण्यास किंवा ज्ञानसंपादनाच्या इतर मार्गांचेंही अवलंबन करण्यास कांहींच हरकत नाहीं. मात्र अशा स्त्रिया आपल्या मध्यमस्थितीच्या कुटुंबांत शेकडा १।२ तरी सांपडतील कीं नाहीं याची शंकाच आहे; म्हणून अशा प्रकारच्या उच्च शिक्षणाचा विचार वर केलेला नाहीं. बाकी या उच्च शिक्षणाचें किंवा वैद्यकी वगैरे धंदेशिक्षणाचें अध्ययन आमच्या स्त्रियांकडून होणें हें आजमितीस अत्यंत आवश्यक आहे. कारण इंग्रजी वगैरे शिकून पाठशाळेंतील वरच्या परीक्षा देऊन आणि अध्यापन या विषयाचें चांगलें अध्ययन करून वरील तत्वावर मुलींच्या शाळा चालविणाऱ्या मास्तरणी आजमितीस नाहींच म्हटल्या तरी चालतील. त्याचप्रमाणें मिडवाईफ (सुईण) व नर्स (दाई) व लेडीडाक्टर (स्त्रीवैद्य) यांचें काम उत्तमरीतीनें करणाऱ्या स्त्रिया आपल्या समाजांत फारच कमी आहेत. शिवाय सुधारलेल्या राष्ट्रांतील स्त्रियांइतके आरोग्यरक्षणाचे नियम आमच्या वायकांस माहीत नसल्यामुळें आपल्याकडे स्त्रिया व मुलें ह्यांच्या रोगांचें प्रमाण तिकडच्यापेक्षां ज्यास्त असणारच. तें कमी करण्याला स्त्रीवैद्यांचा उपयोग पुष्कळ होईल यांत शंका नाहीं आणि यासाठीं शिक्षण व वैद्यक हीं दोन कामें चांगल्या रीतीनें करण्यास आज त्या त्या विषयांत तयार झालेल्या हजारों स्त्रियांची जरूरी आहे; पण हें काम मध्यमस्थितींतील कुटुंबांपैकीं संसाराचा भाग ज्यांच्या आंगावर पडलेला आहे व जोखमीचें आणि अत्यंत महत्त्वाचें असें मातृत्वाचें काम करण्यांत ज्यांचा बराच वेळ गुंतला राहतो अशा स्त्रियांकडून होणें शक्य नाहीं. हें काम करण्यास अनुकूलस्थितीमुळें ज्यांना बरेच दिवस अविवाहित राहतां येईल किंवा दुर्दैवानें वैधव्य प्राप्त झाल्यावर ज्यांच्या पाठीमागें मुलाबाळांचा लकडा नाहीं आणि ज्या सर्वकाळ वैधव्यस्थितींतच राहण्यास तयार असतील अशा स्त्रिया मात्र तें करण्यास योग्य होत. पण तूर्त अशांची संख्या सुद्धां फारच थोडी सांपडणार. स्त्रियांच्या उच्चशिक्षणाबद्दल प्रस्तुतच्या लेखकासंबंधानें गैरसमज होऊं नये म्हणून इतका खुलासा केला आहे. याजपेक्षां

या विषयास येथें ज्यास्त जागा देतां येत नाहीं. वर सांगितलेल्या मध्यमस्थितींतील संसारिक स्त्रियांचा जो मोठा वर्ग त्याबद्दलच आज आम्हांस विशेष विचार करावयाचा होता म्हणून त्यांच्या शिक्षणक्रमासंबंधानें हे दोन शब्द लिहिले आहेत. त्यांना वर सांगितलेला स्वभाषेंतील शिक्षणक्रमच हितावह आणि पुरेसा होईल. आणि या क्रमाप्रमाणें तयार झालेल्या स्त्रियांस कोणत्याही कारणानें वरील उच्च शिक्षणाचा फायदा घेण्याची स्थिति प्राप्त झाली तर त्या कामींही ह्या शिक्षणक्रमाचा उपयोग खास होईल.

वर सुचविलेल्या शिक्षणक्रमाच्या धोरणानें मुलींना शिकविल्यास अल्पकालांत मुलींची तयारी किती होईल हें प्रस्तुत ग्रंथकर्त्रींच्या कृतीवरून सहज समजून येईल. हल्लीं शाळांतून सुरू असणाऱ्या जुन्या धोपट मार्गाचें सूक्ष्म अवलोकन करून त्यांत या लेखांत निर्दिष्ट केलेल्या धोरणानें फेरफार करून शिक्षण दिल्यामुळें माझे मित्र रा० चिटणीस यांनीं आपल्या मुलीचा पुष्कळ फायदा करून दिला; पण ज्या मुलींच्या आईबापांनीं असा विचार आजपर्यंत केला नसेल त्यांनीं तरी यापुढें वरील धोरणानें आपल्या मुलीस शिक्षण दिल्यास अल्पश्रमानें इष्ट वस्तूचा लाभ होईल. प्रस्तुतच्या गीतांवर ज्या टीपा दिल्या आहेत त्या अवघ्या आठवर्षांच्या मराठी शिक्षणाचें फल आहे हें सांगितलें म्हणजे ह्या लेखांत दर्शविलेल्या शिक्षणाच्या नवीन दिशेचें महत्व वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

या विषयाच्या महत्वामुळें हा उपोद्घात लिहिण्याची माझे मित्र रा० चिटणीस ह्यांची सूचना मीं मोठ्या आनंदानें स्वीकारिली. माझ्या ह्या लहानशा लेखामुळें स्त्रीशिक्षणाच्या कामीं कितीशी मदत होईल हें सांगतां येत नाहीं. परंतु महाराष्ट्रांतील सुशिक्षित आईबाप या विषयाचा वर सांगितलेल्या दिशेनें थोडासा जरी विचार करूं लागतील तरी या लेखाचें काम झालें असें मी समजेन. त्याचप्रमाणें ह्या गीतांचें महत्त्व लक्षांत घेऊन कांहीं घरांतून तरी आईबाप आपल्या मुलींना जवळ घेऊन ह्या गीतांचें महत्त्व त्यांच्या मनावर ठसवून व तीं त्यांजकडून पाठ करवून घेऊन गोकुळअष्टमीचे दिवशीं रुक्मिणी-

हरणगीत, वटसावित्रीचे दिवशीं सावित्रीगीत आणि रामनवमीस सीतागीत अशीं नियमानें त्यांजकडून म्हणवून घेतील तर या पुस्तकाचें बरेंचसें चीज झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. ह्या गीतांचें वृत्तही मुलींच्या आवडत्या ओव्यांचेंच असल्यामुळें त्यांना झोपाळ्यावर बसून ह्या ओव्या म्हणण्यास अडचण पडणार नाहीं. आणि त्यांतील कथाभाग परिचित व बोधपर असल्यामुळें त्यांची करमणूक होऊन त्यांना बोध होईल. पंतांनीं सीतागीतांत 'श्रीरामाचें गीत गातील ज्या कन्या । होतील त्या धन्या संसारांत ॥' म्हणून जो आशीर्वाद मुलींना दिला आहे तोच आशीर्वाद प्रस्तुत पुस्तक तयार करणाऱ्या बालग्रंथकर्त्रीला व हीं गीतें गाणाऱ्या मुलींना देऊन हा लेख पुरा करितों.

धुळें,
ता० २५ नोवेंबर १९०३.

नारायण चिंतामण केळकर.

महाराष्ट्रकविवर्यमोरोपंतकृत मुलींचीं गीतें.

अनुक्रमणिका.

श्रीराम.

महाराष्ट्र-कवि-वर्य-मोरोपंत-कृत

रुक्मिणी-हरण-गीत.

(अभंग.[1])

कुरु[2]–क्षेत्रीं येतां
सूर्य[3]–ग्रह–पर्व
स्नाना आले सर्व,
यदु[4] कुरु[5]. १

द्रुपदाची कन्या[6]
सद्गुणांची खाणी[7]
पांडवांची राणी[8]
होती जेथें. २

१. रुक्मिणीहरणगीत, **सा**वित्रीगीत, व **सी**तागीत या तीन गीतांचा छंद (वृत्त) 'अभंग' आहे. "पहिली माझी ओवी । पहिला माझा नेम । तुळशीखालीं **रा**म । पोथी वाची ॥" या प्रकारच्या ओंव्या मुली झोंपाळ्यावर बसून ज्या चालीवर म्हणतात त्या चालीवर हे अभंग म्हणतां येतात. तसेंच, "कां रे नाठवीसी । कृपाळू देवासी । पोसितो जगासी । एकलाची ॥" यासारखे **तु**काराम–**रा**मदासादि महाराष्ट्रसाधूंचे अभंगहि मुलींना ओंव्यांचे चालीवर म्हणतां येतील. २. **कु**रु या नांवाचें एक मोठें विस्तृत मैदान आहे. **कौ**रव**पां**डवांचें जें युद्ध झालें तें या **कु**रुक्षेत्रावर झालें. हें **कु**रुक्षेत्र **दि**ल्लीशहराजवळ आहे. ३. सूर्य+ग्रह (ग्रहण=राहूनें धरणें अथवा ग्रासणें)+पर्व (पर्वणी)=सूर्यग्रहणाची पर्वणी. ४. **या**दव. ५. **कौ**रव. ६. मुलगी. द्रुपदराजाची मुलगी=**द्रौ**पदी. ७ खाण. ८. **पां**डवांची राणी=**पां**डवांची बायको (**द्रौ**पदी).

श्रीकृष्णाच्या [1]भार्या
[2]साष्ट–शत सोळा
[3]सहस्रही गोळा
झाल्या तेथें. ३

द्रौपदी सर्वांचा
करी बहु मान,
त्यांचें देहभान
[4]उरों नेदी. ४

रुक्मिणीस [5]म्हणे,
"सांग [6]निज [7]लग्न-
कथा, मन [8]मग्न
[9]सुखीं होऊ." ५

रुक्मिणी म्हणे, "हो!
[10]असो [11]स्तव; [12]यथा-
मति लग्न–कथा
सांगेन मी. ६

[13]विदर्भ–देशांत
[14]कुंडिन–नगरीं
[15]भीष्मकाचे घरीं
जन्म माझें. ७

१. बायका. २. स (सहित)+अष्ट (आठ)+शत (शंभर)=आठ आणि शंभर; एकशें आठ. ३. हजार. श्रीकृष्णाला सोळा हजार एकशें आठ बायका होत्या. ४. उरूं दिलें नाहीं; आनंदानें त्यांचें देहभान उरलें नाहीं; त्या सर्व फार समाधान पावल्या असा भाव. ५. याचा कर्ता 'द्रौपदी' अध्याहृत. ६. आपली स्वतःची. ७. लग्नाची हकीकत. ८. गढून जाईल असें; निमग्न; गर्क. ९. सुखांत; आनंदांत. १०. राहूं द्या; पुरें करा. ११. स्तुति. १२. जसें मला येईल तसें. १३. विदर्भनांवाच्या देशांत. हल्लीं ज्यास 'वऱ्हाड' म्हणतात तोच प्राचीनकाळीं विदर्भदेश या नांवानें प्रसिद्ध असे. १४. कुंडिन नांवाचे नगरांत. वऱ्हाडांत उमरावतीपासून सुमारें १५ कोसांवर कौंडिण्यपुर म्हणून एक खेडें आहे; हेंच प्राचीनकाळचें कुंडिननगर असें म्हणतात. १५. भीष्मक हें रुक्मिणीच्या बापाचें नांव. भीष्मक राजास भीमक असेंही दुसरें नांव होतें.

माझ्या जननीचें[1]
नाम[2] शुद्धमती
जिचा[3] भाव पति
महेश्वर. ८

बंधु माझे पांच
वडील अवघे,
आहेत चवघे
ताताऽधीन[4]. ९

देवब्राह्मणांचा
भक्त माझा बाप,
ज्याला स्वप्नीं पाप
ठावें नाहीं. १०

रुक्मिणी हें माझें
माहेरींचें नाम,
जाती[5]–पुष्प–दाम
भावांचें मी. ११

रुक्मि ज्येष्ठ–बंधु
मोठा अहंकारी[6],
घरीं दारीं भारी
तेज त्याचें. १२

स्वामींचा[7] म्यां साधु[8]-
मुखें बडीवार[9]
आयकिला फार
बाळपणीं. १३

१. आईचें. २. नांव. ३. [आपला] पति (नवरा) महेश्वर (शंकरच) [आहे असा] जिचा भाव (श्रद्धा; निष्ठा; विश्वास) [होता, अशी]. ४. तात (बाप)+अधीन (आज्ञेंत राहणारे)=बापाच्या आज्ञेंत राहणारे असे. रुक्मिणीला पांच भाऊ वडील होते. त्यांचीं नांवें:–रुक्मि, रुक्मरथ, रुक्मबाहु, रुक्मकेश, आणि रुक्ममाली. सर्वांत मोठा भाऊ रुक्मि हा मोठा अभिमानी व गर्विष्ठ होता. त्याच्यापुढें बापाचें सुद्धां चालत नसे. बाकीचे चवघे भाऊ बापाच्या आज्ञेप्रमाणें वागणारे होते. ५. जाती (जाई)+पुष्प (फूल)+दाम (माळ)=जाईच्या फुलांच्या माळेप्रमाणें रुक्मिणी भावांस प्रिय होती; किंवा जाईच्या फुलाला जसें नाजूकपणानें वागवितात तसें ते बंधु रुक्मिणीला जपत. ६. अभिमानी. ७. श्रीकृष्णाचा. ८. साधूंच्या मुखांतून; सज्जन लोकांच्या मुखांतून. ९. स्तुति.

[1]कारण आनंद-
सिंधु—मज्जनाचें
येणें सज्जनांचें
मज होय. १४

श्री-कृष्ण-गुणांची
लागलीच गोडी,
पळही न सोडी
मन माझें. १५

तात म्हणे, 'द्यावी
सं[2]सार—वैद्याला.'
'देईन चै[3]द्याला,'
दादा म्हणे. १६

दादापुढें कांहीं
न चाले बापाचें,
तें फळ पापाचें
मॉझियाची. १७

[5]आणविला चैद्य,
[6]धरियेलें लग्न,
झालें चिं[7]ता-मग्न
मन माझें. १८

चिंता नाहीं कळों
दिली म्यां जनांत,
योजिले मनांत
सात श्लोक. १९

१. सज्जनांचें [माझ्या बापाच्या घरीं] येणें आनंदसिंधुमज्जनाचें (आनंदसमुद्रांत बुडण्याचें) कारण (साधन) मज होय (होत असे)—असा अन्वय व अर्थ. २. संसाररूपी जो रोग त्याचा नाश करणारा जो वैद्य त्याला (श्रीकृष्णाला). ३. शिशुपाळाला. चेदि नांवाच्या राजाच्या कुळांत जन्मला होता म्हणून शिशुपाळाला चैद्य असें म्हटलें आहे. ४. माझ्या. ५. 'आणविला' व 'धरियेलें' या क्रियापदांचा कर्ता 'रुक्मिदादानें' अध्याहृत. ६. 'लग्न धरणें' म्हणजे लग्नाची तिथि अथवा मुहूर्त नेमणें. ७. चिंतेंत बुडालेलें म्हणजे फार काळजी लागली असा भाव.

लिहिली[1] पत्रिका
आपुल्याच हातें,
संकट महा[2] तें
काय सांगूं ? २०

सुदेव ब्राह्मण
विनविला[1][3] आर्य[4],
पाठविला[1] कार्य
साधावया. २१

पत्रिका[5] घेऊनि
गेला द्वारकेला,
तेणें फार केला
श्रमी देह. २२

ब्राह्मणाची भीड
स्वामींस[6] पडली,
तरीच घडली
मज सेवा. २३

विप्र–हस्तीं[7] देती
हात[8] पुण्य[9]–श्लोक
सात पुण्य–श्लोक[10]
वाचितांचि. २४

पूर्ण अनुग्रह[11]
स्मितें[12] जाणविलें[13][14],
रथ आणविला[13]
त्यांचि[15] वेळे. २५

१. याचा कर्ता 'म्यां' (रुक्मिणीनें) अध्याहृत. २. मोठें. ३. प्रार्थिला. ४. श्रेष्ठ. ५. [रुक्मिणीनें श्रीकृष्णास सात श्लोकांचें लिहिलेलें] पत्र. ६. श्रीकृष्णास. ७. विप्र (ब्राह्मण)+हस्तीं (हातांत)=सुदेव ब्राह्मणाच्या हातांत. ८. हात देणें=वचन देणें. श्रीकृष्णानें सुदेव ब्राह्मणाला 'मी कुंडिननगराला येतों' असें वचन दिलें. ९. पुण्य (पवित्र, उत्तम)+श्लोक (कीर्ति) ज्याची असा—श्रीकृष्ण. १०. (रुक्मिणीच्या पत्रिकेंतील सात) शुद्ध श्लोक. ११. कृपा. १२. गालांत हंसून. १३. याचा कर्ता 'श्रीकृष्णानें' अध्याहृत. १४. कळविला, समजाविला. १५. त्याच वेळेस.

स्व[1]–रथीं प्रथम
चढवूनि विप्र
माझे स्वामी क्षिप्र[2]
आरूढले. २६
आलें गांवें[3] एका
रात्रींत शंभर
स्वामी **विश्वं**–भर[4]
दया[5]–सिंधु. २७
द्विज[6] गेल्यावरी
शिशुपाळ आला;
चिंता–ज्वर[7] झाला
मला भारी. २८

माय दे लावूनि
देहाला हळद,
हे हालाहल-द[8]
न तो पाप[9]. २९
करूनि भंलतें[10]
एक मिषें[11] [12]वाटे
[13]पाहें; विष वाटे[14]
अन्न पान[15]. ३०
पुसतां सांगें मी
अश्रु[16]-हेतु तेलें[17];
उत्तरीं गुंतेलें[18]
नव्हे कधीं. ३१

१. स्व (आपल्या)+रथीं (रथावर). २. लवकर. ३. योजनें. एक योजन=चार कोस. ४. जगाचा पालनकर्ता. ५. दयेचा सागर. ६. ब्राह्मण (**सु**देव ब्राह्मण). ७. काळजीचा ताप. म्हणजे अत्यंत काळजी लागली–असा भाव. ८. हालाहल नांवाच्या विषाप्रमाणें ताप देणारी. ९. पापी (**शि**शुपाळ). **रु**क्मिणीच्या देहाला तिच्या आईनें हळद लाविली ती तिला हालाहल विषाप्रमाणें तापदायक वाटली. **शि**शुपाळापेक्षांहि तिला ती हळद ताप देणारी वाटली; तितका तो पापी **शि**शुपाळ वाटला नाहीं. १०. खोटें. ११. निमित्त. १२. (श्री**कृ**ष्णाच्या) वाटेकडे. १३. याचा कर्ता 'मी **रु**क्मिणी' अध्याहृत. १४. मनांत वाटे. १५. पाणी. १६. रडण्याचें कारण; डोळ्यांत पाणी येण्याचें कारण. १७. डोळ्यांत तेल गेल्यानें अश्रु आले असें खोटेंच कारण मी सांगें. १८. कधीं उत्तरीं (उत्तर देण्याच्या कामीं) गुंतेल (अडेल) अशी मी स्त्री नव्हे (काव्यसंग्रह).

‘लग्न[1]-पूर्व-दिनीं
वृ[2]ष्णी-बळ-पूर्ण
होऊनियां तूर्ण[3]
हरावया[4].’ ३२

ऐसें जें लिहोनि
पाठविलें होतें,
आठविलें हो! तें
शतदां[5] म्यां. ३३

न[6] आले त्या दिशीं[7],
मध्यें[8] रात्रि मात्र,
चिंता-ज्वरें गात्र[9]
तापविलें. ३४

त्या रात्रीं लागला
नाहीं माझा डोळा,
प्राण कंठीं गोळा
झाले होते. ३५

भक्त[10]-चिंता-मणि
गौरी[11]-हर[12], परी
रुसल्यें त्यावरी
शतदां मी. ३६

मी म्हणें, ‘कपाळीं
हा[13] नवरा, जीवा
हा! नव[14]-राजीवा-
मल-नेत्रा! ३७

१. लग्नाच्या तिथीच्या अदले दिवशीं. २. **वृ**ष्णी (**या**दव)+बळ(सैन्य)+पूर्ण (युक्त)=**या**दवसैन्ययुक्त. ३. त्वरित. ४. [मला] घेऊन जाण्यास [यावें]. ५. शंभर वेळां. ६. याचा कर्ता ‘श्री**कृ**ष्ण’ अध्याहृत. ७. दिवशीं. ८. [या वेळेच्या आणि लग्नाच्या] मध्यें रात्र मात्र [राहिली]. ९. शरीर. १०. भक्तांचा चिंतामणी; भक्तांच्या इच्छा पुरविणारा देव. ११. **गौ**री (**पा**र्वती)+हर (**शं**कर). लग्नाच्या आधीं वधूकडून **गौ**रीहराची पूजा करवितात हें प्रसिद्धच आहे. (का०सं०) १२. परंतु. १३. **शि**शुपाळ. १४. नव (नवीन)+राजीव (कमल)+अमल (स्वच्छ)+नेत्रा=नवीन कमलाप्रमाणें स्वच्छ आहेत नेत्र ज्याचे अशा (**कृ**ष्णा!). मी जीवा म्हणें, ‘हा नवराजीवाऽमलनेत्रा! हा नवरा कपाळीं (नशीबीं)—असा अन्वय. हे **कृ**ष्णा! माझ्या कपाळीं हा (**शि**शुपाळ) कां नवरा! असें मी आपल्या जीवा (मनाला) म्हणें.

कृष्णास दे कीं हे
तनु [1]पावकास,
अंबे! पाव कास
घालुनियां. ३८

वाहीन मी [2]नित्यें
श्री-शंकरा बेल,
[3]वि-शंक राबेल
मन [4]पायीं. ३९

देईन मी [5]नित्य
[6]नव सदा दानें;
नवस [7]दादानें
किती केले! ४०

काय करावें त्या
सज्जनें [8]वाडवें?
[9]मैदैव आडवें
झालें वाटे. ४१

जाणों पत्रिकेंत
लिहितां [10]चुकल्यें,
तरीच [10]मुकल्यें
महा-सुखा. ४२

[11]धाडिला चोरोनि
स्व-भावा लाखोटा;
स्व-भावाला खोटा
कोण म्हणे? ४३

---

१. अग्नीला. हे तनु (मी=रुक्मिणी) कृष्णास कीं (किंवा) पावकास देईन (का० सं०). श्रीकृष्ण पति न मिळाला तर मी अग्नींत उडी घालीन, पण दुसऱ्या कोणास वरणार नाहीं—असा अर्थ. २. नेहमीं. ३. वि+शंका (शंकारहित.)=निःसंशय. ४. (श्रीशंकराच्या) पायांच्या ठिकाणीं. ५. नेहमींचीं (हें दानांचें विशेषण). ६. न+वीन. ७. शिशुपाळास रुक्मिणी द्यावयाची हा आपला हेतु सिद्धीस जावा म्हणून दादानें (रुक्मीनें) हि नवस केले होते असें रुक्मिणी सांगत आहे. (का० सं०). ८. (सुदेव) ब्राह्मणानें. ९. माझें दैव. १०. याचा कर्ता 'मी-रुक्मिणी' अध्याहृत. ११. स्वभावा (आपला भाव, हेतु) चोरोनि (स्पष्ट न करितां; संदिग्ध ठेऊन) लाखोटा (पत्र) धाडिला; स्वभावाला (रुक्मीला) खोटा (वाईट, दुष्ट) [असें] कोण म्हणे?—असा अन्वयार्थ. आपल्या भावाच्या वाईट कृतीचा स्पष्ट उल्लेख मीं आपल्या पत्रांत केला नसेल, आणि त्यामुळें श्रीकृष्णाला त्या पत्राचें

न पावावें हें[1] तो
[2]त्यांची नव्हे रीति,
[3]न ते अव्हेरीति,
विनवितां.' ४४

ऐसें नानापरी
चिंतेंत पडल्यें,
दुःखें मी रडल्यें
सारी रात्र. ४५

जों ऐसें [4]मन्मन
चिंतेंत [5]रौहाटे
[6]स्फुरला पहांटें
डावा [7]बाहु. ४६

स्फुरे [8]नेत्र नाशी
सर्व ताप डावें,
सर्वथा पडावें
[9]सुखीं येणें. ४७

हर्षलें कांहीं [10]तों
सुदेव देखिला,
तो विप्र [11]लेखिला
महादेव. ४८

[12]तो म्हणे, 'आणिला,
आला वासुदेव,
हा लावा सुदेव
वाटे [13]शीघ्र.' ४९

म्यां त्याच्या चरणीं
ठेविलें मस्तक,
[14]तेणेंही [15]हस्तक
माझ्या [16]माथां. ५०

महत्व न वाटून ते आले नसतील असें मला वाटलें.—असा रुक्मिणीच्या म्हणण्याचा भाव.

१. ही तर. न पावावें ही तर त्यांची रीत नव्हे. २. श्रीकृष्णाची. ३. न अव्हेरीति=अव्हेर करीत नाहींत, उपेक्षा करीत नाहींत. ४. माझें मन. ५. गुरफटून जाई. ६. स्फुरण पावला. ७. हात. ८. डोळा. डावें नेत्र स्फुरे सर्व ताप नाशी=डावा डोळा लवला असतां तापाचा (दुःखाचा) नाश होतो. ९. असें झालें म्हणजे. १०. त्याच वेळेस. ११. मानिला. १२. सुदेव ब्राह्मण. १३. लवकर. वाटे लावा=बक्षीस देऊन मला परत पाठवा. १४. सुदेव ब्राह्मणानें. १५. हात. १६. डोक्यावर.

त्या प्राणदात्याला
काय म्यां अर्पावें[1]?
अमृता तर्पावें[2]
कोणें रसें? ५१

जें जें दिलें तें तें
सद्गुरुला अल्प[3],
वंदनचि कल्प[4]–
तरु-पूजा. ५२

ज्यांला भक्त-त्राण[5]
दुष्ट-दंड[6] पाठ[7]
आले पाठोपाठ
भावोजीही. ५३

भारी[8] बळभद्र[9]-
भावोजींचें सैन्य
येतां आलें दैन्य[10]
चैद्यादिकां[11]. ५४

सीमांत–पूजन
केलें जनकानें[12],
जसें जनकानें[13]
मिथिलेंत[14]. ५५

उतरले प्रभु[15]
कुंडिनाबाहेर,
हर्षलें माहेर[16]
दादाविणें. ५६

---

१. अर्पण करावें, द्यावें. २. तृप्त करावें. अमृताला कोणत्या रसानें तृप्त करावें? सुदेव ब्राह्मण हा मला अमृतासारिखा वाटला तेव्हां मी यःकश्चित् रुक्मिणीनें त्याला काय देऊन तृप्त करावें! ३. थोडें. ४. कल्पतरूची पूजा करावयाची म्हणजे त्याला नमस्कार करणें हेंच उचित, कारण कल्पतरू-जवळ काय नाहीं? सर्व कांहीं आहे; व आपण त्याला काय देऊं शकणार? ५. भक्तांचें संरक्षण. ६. दुष्टाला शासन करणें. ७. अवगत; माहित. ज्यांना भक्तांचें संरक्षण व दुष्टांना शासन करणें हें अवगत आहे असें भावोजी (बलराम) पाठोपाठ आले. ८. पुष्कळ. ९. बलराम. १०. दीन अवस्था. ११. चैद्य आदिकरून राजांना. १२. [माझ्या] बापानें (भीमकराजानें). १३. जनक-राजानें; सीतेच्या बापानें. १४. मिथिला नांवाचे नगरींत. १५. श्रीकृष्ण. १६. रुक्मिदादाशिवाय माझ्या माहेरच्या सर्व माणसांना आनंद झाला.

अंबिकेला न्यावी
नवरी [1]बाहेरीं
हा माझ्या माहेरीं
कुळ–धर्म. ५७

मज रक्षावया
[2]कटकाचा कोट
[3]केला, वाटे [4]लोट
[5]सिंधूचा तो. ५८

या [6]कन्या–रत्नाला
[7]केली सेनापेटी,
अंबिकेच्या भेटी
नेते झाले. ५९

जगदंबेची म्यां
पूजा केली [8]भावें,
कार्य सिद्ध व्हावें
न कां मग? ६०

[9]उजवा अशोक
प्रसाद मागतां
चरणां लागतां
[10]दिलें मज. ६१

प्रसाद घेऊनि
करूनि [11]नमन,
तेथूनि [12]गमन
[13]जसें [14]केलें. ६२

[15]जे मज भोंवतें
होते उभे [16]मेले
अंबेनें ते केले
वेडे सर्व. ६३

१. नगराच्या बाहेर. २. सैन्याचा. ३. याचा कर्ता 'रुक्मिदादानें' अध्याहृत. ४. पाण्याचा लोट किंवा संचय. ५. समुद्राचा. समुद्राच्या पाण्याप्रमाणें अलंघ्य असा सैन्याचा वेढा माझ्या भोंवतीं होता असा अर्थ. ६. मला–रुक्मिणीला. ७. याचा कर्ता 'रुक्मिदादा आदिकरून' अध्याहृत. ८. भक्तीनें. ९. उजव्या बाजूचा प्रसाद चांगला शुभदायक असतो म्हणून उजव्या बाजूचाच अशोकपल्लव पडावा अशी मीं प्रार्थना केली. १०. याचा कर्ता 'अंबिकेनें' अध्याहृत. ११. नमस्कार. १२.जाणें. १३. जेव्हां. १४.याचा कर्ता 'म्यां रुक्मिणीनें' अध्याहृत. १५. सैन्यांतील लोक. १६. ही बायकांची शिवी आहे.

गळालीं [1]मेल्यांच्या
[2]हातींचीं [3]हातेरें,
पळांत मातेरें
झालें त्यांचें. ६४
न गणिलें [4]रथ-
गजानीका [5]गदा-
ग्रजांनीं [6]कागदा
मान दिला. ६५
[7]प्रकटले स्वामी,
लाजल्यें मी बाळा,
[8]सखी म्हणे, 'माळा
आधीं घालीं'. ६६
ज्यांच्या तेजें [9]रवि
[10]शशि [11]मोलवले,
ते घ्याया [12]लवले
माला माझी. ६७
धरूनियां [13]करीं
[14]स्यंदनीं [15]वोहिलें,
हें प्रेम पाहिलें
कोठें कोण्हीं? ६८
बैसवूनि [16]अंकीं
उराशीं धरिलें,
मज [17]उद्धरिलें
चिंतेंतूनि. ६९
मला नेतां वीर
एकही न बोले;
वाटले ते कोल्हे,
सिंह स्वामी. ७०

१. ही वायकांची शिवी आहे. २. हातांतील. ३. हत्यारें; शस्त्रें. ४. रथ+गज (हत्ती)+अनीक (सैन्य) [यांना] न गणिलें (जुमानिलें नाहीं). ५. **गद** म्हणून **व**सुदेवाचा मुलगा होता तो आहे अग्रज (वडील भाऊ) ज्याचा त्यानें (श्रीकृष्णानें). ६. रुक्मिणीनें पाठविलेल्या पत्रिकेला. ७. आले; समोर आले. ८. मैत्रीण (रुक्मिणीची). ९. सूर्य. १०. चंद्र. ११. निस्तेज झाले. १२. वांकले. १३. हातानें. १४. रथावर. १५. नेऊन बसविलें. १६. मांडीवर. १७. वर काढिलें; माझी चिंता दूर केली असा अर्थ.



ज्यांच्या तेजें रवि । शशि मावळले, । ते ध्याया लवले । माला माझी. ॥   रुक्मिणीहरणांतील, अभंग ६७.

गळाली मेल्याच्या
दांतींची दांतेरें,
पडात माळेरें
झाले त्यांचें. ६४
[illegible] [illegible] [illegible]-
[illegible] मृदा-
[illegible] कागदा
माज दिला.
[illegible] [illegible],
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]

ते व्याया[12] लेवले
[illegible] माझी. ६७
[illegible] [illegible]
[illegible] [illegible],
[illegible]
[illegible] [illegible] ६८
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible]. ६९
[illegible] [illegible] [illegible]
[illegible] [illegible],
[illegible] [illegible],
[illegible] स्वामी. ७०

[illegible] समोर [illegible] निर्बीज झाले. [illegible] १६. मांडीवर. [illegible]



ज्यांच्या तेजें रवि । शशि मालवले, । ते ध्याया लवले । माला माझी. ॥ **रुक्मिणीहरणगीत, अभंग ६७.**

त्या[1] कटक-कोटा
स्वर्ग, मज सुधा,
म्हणा **च**क्रायुधा
पक्षि-राज. ७१

यापरी हरूनि
मज दूरवर
आले शूर[2]-वर
धणी माझे. ७२

पावले दुर्जन
असा वध[3] हो! ते,
अ[4]-सावध होते
घडीभरी. ७३

मग मज नेलें
असें त्यां[5] कळलें,
वदन[6] मळलें
अप[7]-यशें. ७४

ते दुष्ट ह्मणती
तापोनि[8] कोपानें[9],
'हरिली गोपानें[10]
कन्या, कीर्ति.' ७५

जिंकोनियां यदु[11]-
नंदनास मज
मंद[12] ना-समज[13]
हरूं आले. ७६

शाल्व जरासंध
चैद्य शिशुपाळ
धांवले भूपाळ[14]
रणासाठीं. ७७

१. त्या कटककोटा (सैन्याच्या कोटाला) स्वर्ग [म्हणा] मज (मला—रुक्मिणीला) सुधा (अमृत) [म्हणा] **च**क्रायुधा (चक्र आहे आयुध ज्याचें अशाला=श्रीकृष्णाला) **प**क्षिराज (पक्ष्यांचा राजा—**ग**रुड) म्हणा—असा अन्वय. **ग**रुडानें स्वर्गांतून जसें अमृत आणिलें तसें श्रीकृष्णानें मला शत्रूच्या सैन्याच्या कोटांतून आणिलें. २. शूरांमध्यें श्रेष्ठ (श्रीकृष्ण). ३. पराभव. ४. गैरसावध. ५. त्यांना (सैन्याला). ६. तोंड. ७. अपकीर्तीनें. ८. संतापून जाऊन. ९. रागानें. १०. गवळ्यानें (श्रीकृष्णानें). ११. **य**दूच्या मुलास (श्रीकृष्णाला). १२. मंद बुद्धीचे. १३. असमंजस. १४. राजे.

[1]योजूनि स्वामींला
[2]गट करायाचें
कटक [3]रायाचें
गांठीं घाली. ७८
स्वामींनीं पावतां
[4]भयें [5]तनु [6]कंपा
केली [7]अनुकंपा
मजवरी. ७९
[8]बोलिले, ‘[9]कोमेलें
आंग कांपतीस
सांग कां ? पतीस
पावोनही. ८०
शत्रु-भयें झाला
[10]प्रकट [6]कांप हा,
[11]स्व-कटका पहा,
भिऊं नको. ८१

चैद्यादि [12]तृणाच्या
पहा या [13]दवातें,
अहा ? यादवांतें
कोण [14]सोहे ? ८२
फिरले आमुचे
बळदेव दादा,
[15]तेजें [16]सिंह-नादा,
करितात. ८३
[17]भेदितील तेजें
पर्वता पहा तें,
सर्व ताप [18]हातें,
हरितील. ८४
यांच्या जळतील
तेजें, पळतील,
वैरि मळतील
अ-कीर्तीनें. ८५

१. बेत करून. २. पकडावयाचें. ३. भीमकराजाचें. ४. भीतीनें. ५. शरीर. ६. कांपरें. ७. कृपा. ८. याचा कर्ता ‘श्रीकृष्ण’ अध्याहृत. ९. पतीस पावोनही कोमेलें (नाजूक, कोमल) आंग कां कांपतीस? सांग—असा अन्वय. १०. उत्पन्न. ११. स्वतःच्या सैन्याला. १२. गवताच्या. १३. अग्नीला. १४. सहन करील. १५. तेजानें; पराक्रमानें. १६. सिंहासारखी गर्जना. १७. याचा कर्ता ‘बलराम’ अध्याहृत. १८. हातानें; स्वतः.

केला नसे कोण्ही
[1]रामासम रण,
रामास मरण–
भय नाहीं. ८६
[2]येंचें देवांनींही
[3]हळ [4]नवसावें,
पळ न बसावें
पुढें [5]काळें. ८७
भ्यालीस कां? अहा!
[6]मुग्धे! स्वस्थ रहा,
चमत्कार पहा
सं[7]गराचा.' ८८
या स्वामींच्या [8]बोलें
[9]साध्वस [10]उडालें,
आनंदीं बुडालें
मन माझें. ८९
पाहें तों उठले
[11]बळाचे सागर
मुसळ नांगर
घेऊनियां. ९०
[12]त्यां स्वल्प पन्नास
वर्ण वाखाणाया,
[13]अर्णवा खाणाया
समर्थ ते. ९१
[14]स्वर्ग-ज होय कां?
न कोहाळा हळा,
नको हाळाहळा
गंध ज्याचा. ९२

१. बलरामासारिखा. २. बलरामाचें. ३. नांगर. ४. नवस करावा; साह्यास मिळावा म्हणून नवस करावा. ५. यमानें. ६. वेडे; भित्रे. ७. युद्धाचा; रणाचा. ८. बोलण्यानें. ९. भय. १०. गेलें; नाहींसें झालें. ११. बळाचे समुद्र (बलराम). १२. त्यां (बलरामाला) वाखाणाया पन्नास वर्ण ('अ' पासून 'ळ' पर्यंत सर्व भाषा) स्वल्प (कमी)–असा अन्वय. १३. समुद्राला. १४. ज्याचा (ज्या हलाचा=नांगराचा) गंध हाळाहळा (हालाहल नांवाच्या विषाला) नको [त्या] हळा (हलाला=नांगराला) स्वर्गज (ऐरावत) कोहाळा कां न होय?–असा अन्वय. ज्या नांगराच्या प्राणघातक तीव्रतेमुळें हालाहलालाही भीति वाटते त्यापुढें बिचारा ऐरावत तर कोहाळ्याच्या फळाप्रमाणें आहे. कोहाळा पांढरा असल्यामुळें ऐरावताला त्याची उपमा फारच शोभते. (काव्यसंग्रह).

[1]घटजीं शोषाया
तप नदीपा न,
[2]तपन दीपा न
लोपवील? ९३
[3]झाले [4]और्व [5]पर-
बळ-पारावारा,
[6]बळ-पारावारा
किती जाणें? ९४
[7]पर-सेनार्णवीं
बळ मंदराग,
खळ मंद, राग
त्याचा येतो. ९५
[8]वाहिलीं [9]क्षोणीतें
[10]खंणीत [11]शोणीतें,
वर्णावें कोणीं तें
महा-युद्ध? ९६
वीर [12]अभि-मुख-
प्रहारें जे मेले,
अप्सरांनीं नेले
[13]वरूनि ते. ९७

१. घटजीं (अगस्तीनें) नदीपा (समुद्राला) शोषाया तप (तप करणें) न (नको) असा अन्वयार्थ. अगस्ति ऋषीनें एका आचमनांत समुद्र शोषून टाकल्याची कथा सुप्रसिद्ध आहे. २. तपन (सूर्य) दीपा (दिव्याला) न लोपवील? (अर्थात् निस्तेज करील असा अर्थ.) ३. याचा कर्ता 'बलराम' अध्याहृत. ४. वडवाग्नि. ५. पर (शत्रु)+बळ (सैन्य)+पारावारा (समुद्राला)=शत्रुसैन्यरूपी समुद्राला. ६. [बलरामाच्या] बळ (शक्ति)+पारावारा (मर्यादेला)=शक्तीच्या मर्यादेला. ७. परसेनार्णवीं (शत्रूचें सैन्य हाच समुद्र त्यांत) बळ (बलराम) मंदराग (मंदराग पर्वत) [वाटले] खळ (दुष्ट=शत्रु) मंद (निर्बुद्ध) त्याचा राग येतो. ८. याचा कर्ता 'बलरामानें' अध्याहृत. ९. पृथ्वीला. १०. प्रवाहाच्या जोरानें पृथ्वीला खळगे पाडीत. ११. रक्तें. बलरामानें पुष्कळ शत्रु मारून पृथ्वी रक्तानें भिजवून टाकिली—असा भाव. १२. समोरील वारानें. अभि (समोर)+मुख (तोंड)+प्रहारें (वारानें)=तोंडावर लागलेल्या वारानें. १३. रणांत मृत्यु पावलेले वीर स्वर्गीं जातात व त्यांस अप्सरा वरितात (लग्न करितात) अशी समजूत आहे.

नाचले त्या रण[1]-
रंगांत कबंध[2],
कीं[3] पातक-बंध[4]-
मुक्त झाले. ९८

विस्तार तूं[5] पुसों
नको, टिके[6] सरी
न कोटि-केसरि-
बळ यांच्या. ९९

वैरि-वीर[7] बहु
रणांत गळाले[8],
उरले पळाले
मृत्यु-भयें[9]. १००

जय[10]-श्रीचा लाभ[11]
सर्वांही **याद**वां.
किती तीं[12] या दवा
वैरि-तृणें? १०१

दादानें[13] देखिले
स्वरक्तें[14] रंगले
जे रणीं भंगले[15]
चैद्यादिक. १०२

म्हणे[16], 'पाहा कैशी
सोडवितों कन्या?
हें कार्य[17] मी अन्या[18]
सांगों नये. १०३

१. रणाच्या भरांत; युद्धाच्या भरांत. २. धडें; मस्तकरहित शरीरें. ३. कारण. ४. पातकाच्या बंधनापासून मुक्त. ५. तूं (**द्रौ**पदी). ६. कोटि-केसरि–बळ (कोटि सिंहांचें बळ) यांच्या (**ब**लरामाच्या) सरी (बरोबरीला) न टिके–असा अन्वयार्थ. (का० सं०). ७. वैरि (शत्रु)+वीर (शूर लोक)=शत्रूकडील शूर लोक. ८. मृत्यु पावले. ९. मृत्यूच्या भयानें. १०. यशाचा; विजयाचा. ११. याचें क्रियापद 'झाला' अध्याहृत. १२. तीं वैरितृणें (शत्रुरूपी गवत) या [**ब**लरामरूपी] दवा (वणव्याला) किती?–असा अन्वय. १३. **रु**क्मिदादानें. १४. स्वतःच्या रक्तानें. १५. जखमा होऊन पडले; पराभव पावले. १६. याचा कर्ता '**रु**क्मि' अध्याहृत. १७. काम. १८. इतराला, दुसऱ्याला.

यादवांच्या रक्तें
क्षोणीला [1]न्हाणितों,
[2]भगिनी आणितों
[3]घडीमाजी; १०४
धरीन [4]चोराला,
[5]त्रैलोक्य [6]धुंडीन;
[7]नातरी '[8]कुंडिन
पाहें न मी.' १०५
[9]जिंकावया केली
तया प्रतिज्ञा ते
जयाप्रति ज्ञाते
उपासिती. १०६

[10]अक्षौहिणी सैन्य
घेऊनि धांवला,
क्षणांत [11]पावला
दादाराय. १०७
जयाच्या पायांला
[12]भावीक लागती
[13]भावीं [14]कलागती
त्याशीं [15]बरी. १०८
[16]दादानें रथासीं
रथ मेळविला,
[17]क्षण खेळविला
प्रभूंनीं तो. १०९

१. स्नान घालितों; भिजवितों. २. बहीण (रुक्मिणी). ३. घटकेंत. ४. भगिनी चोरून नेणाऱ्या कृष्णाला (का० सं०). ५. तिन्ही लोक; स्वर्ग, मृत्यु, पाताळ. ६. शोधीन. ७. नाहीं तर. ८. कुंडिननगर. ९. जयाप्रति ज्ञाते उपासिती तया जिंकावया ते प्रतिज्ञा केली.—असा अन्वय. ज्या श्रीकृष्णाची ज्ञानी लोक उपासना करितात त्या श्रीकृष्णाला जिंकावयाची ते (ती) प्रतिज्ञा (वरील प्रतिज्ञा) [दादानें] केली. १०. २१८७० रथ, २१८७० हत्ती, ६५६१० घोडेस्वार, आणि १०९३५० पायदळ इतकें सैन्य एका अक्षौहिणीमध्यें असतें. ११. येऊन ठेपला. १२. भक्त लोक. १३. मनांत आणी. १४. भांडण. १५. मोठी. १६. रुक्मिदादानें श्रीकृष्णाच्या रथाबरोबर आपला रथ मेळविला (भिडविला). १७. क्षणभर प्रभूंनीं तो (रुक्मि) खेळविला= श्रीकृष्णानें रुक्मीचा एकदम पराभव केला नाहीं; त्याच्याबरोबर क्षणभर युद्ध केलें.

स्वामींचें जें तेज
[1]अ-जित रणीं तें
[2]अजी [3]तरणीतें
तापवील. ११०

[4]न मर्में खंडिलीं
कोदंड-कवचें,
तो [5]दंडक [6]वचें
सांगवेना. १११

स्वामींची [7]दुर्जनीं
[8]उग्रता [9]बाहेर,
[10]मानस [11]माहेर
[12]करुणेचें. ११२

[13]वि-रथ [14]वि-शस्त्र
दादा केला [15]भग्न,
मग [16]खड्ग नग्न
वधावया. ११३

[17]होतां बंधु-तेज
मंद, कालवलें
नंदका लवलें
मन [18]शिर. ११४

१. अजिंक्य; न जिंकतां येण्यासारिखें. २. आज. ३. सूर्याला. ४. (श्रीकृष्णानें दादाचीं) मर्में (शरीराचीं नाजूक अवयवें) न खंडिलीं (तोडिलीं) कोदंडकवचें (बाहुभूषणें) खंडिलीं—असा अन्वय. ५. शिक्षा; शासन. ६. शब्दानें; वाणीनें. ७. वाईट लोकांचे ठिकाणीं. ८. उग्रपणा. ९. बाहेरून; वरून. १०. मन. ११. आवडतें स्थान; राहण्याचें ठिकाण. १२. कृपेचें. १३. ज्याला रथ नाहीं असा. १४. शस्त्ररहित. १५. पराभूत. १६. मग [रुक्मीला] वधावया [श्रीकृष्णानें] खड्ग नग्न (उघडें) केलें (म्यानांतून बाहेर काढिलें.) १७. बंधुतेज मंद होतां (कमी होतां) मन कालवलें [आणि] शिर नंदका (श्रीकृष्णाच्या खड्गाला) लवलें=भावाचा पराभव झाला तेव्हां [रुक्मिणीचें] मन कालवलें व श्रीकृष्णानें रुक्मीला मारण्याकरितां खड्ग उचललें होतें त्या वेळेस रुक्मिणीनें आपली मान पुढें केली. १८. मस्तक; डोकें.

[1]ऐकिली न नत–
घात-लीला जुनी,
घातली लाजूनि
पायीं मिठी. ११५
[2]सोडोनियां कोप
सकळ वळले,
न कळवळले
कोणा आर्तीं? ११६
ठेऊनि नंदक[3]
[4]ध्वजाशीं बांधिलें;
[5]खावें जें रांधिलें
जैसें स्वयें. ११७

भावाची सांगों मी
काय काय शोभा[6]?
नायका यशोभा[7]
यदूंच्याचि. ११८
स्वामींनीं दादाची
दादाच्याचि [8]दोषें
[9]विटंबिली रोषें[10]
तनु जैशी. ११९
[11]विटंबिती सेना
भावोजीही कोपें;
दोघांसही[12] सोपें
चरित्र हें. १२०

१. जुनी (पूर्वीं घडलेली) नतघातलीला (शरणागताचा घात करणारें असें श्रीकृष्णाचें कृत्य) न ऐकिली, ह्मणून आतांही शरण आलेल्याला मरण देऊं नये–असा भाव (का० सं०). २. सकळ (सर्व) कोप (राग) सोडोनियां [श्रीकृष्ण] वळले; कोणा आर्तीं (संकटांत) न कळवळले?–असा अन्वय. ३. श्रीकृष्णाच्या खड्गाचें नांव. ४. (रथाच्या) निशाणाला. ५. जैसें स्वयें रांधिलें (शिजविलें) [तैसें] खावें=जसें शिजवावें तसें खावें; 'जसें करावें तसें भोगावें' ही याच अर्थाची म्हण आहे. ६. फजिती. ७. यदूंच्याचि नायका (कृष्णाला) यशोभा (यशस्+भा=यशोभा; कीर्ति व तेज). ८. अपराधास्तव, अपराधाकारणें. ९. तनु विटंबिली=शरीर विरूप केलें. श्रीकृष्णानें रुक्मीचे केंस काढून त्यास विरूप केलें होतें. १०. रागानें. ११. (सेनेचा) पराभव करून फजिती केली. १२. (श्रीकृष्णास आणि बलरामास) हें चरित्र (हें कृत्य) सोपें (सहज करितां येण्यासारिखें)–असा अन्वयार्थ.

[1]मुक्त केला दादा
भावोजींनीं आंगें;
थोरपण [2]सांगें
अर्से कोठें? १२१

[3]ज्याच्या भक्ति-रसें
भुलविला **भर्ग**,
केला तुच्छ स्वर्ग-
सुधा-भोग; १२२

ज्यासाठीं **ब्र**ह्मादि
सुर सदा दास,
सुरस दादास
रुचेना तो. १२३

[4]तेथेंचि राहिला,
न गेला **कुं**डिना;
[5]कोणीका धुंडिना
असा नाहीं. १२४

माझा नि[6]ववला
भावोजींनीं खेदें[7];
[8]यांचा बोल वेद,
भेद नाहीं. १२५

[9]श्री-**मू**र्ति श्री-**गं**गा
या देहा ओहळा
स्वीकारी सोहळा
पुरवाया. १२६

---

१. भावोजींनीं आंगें (स्वतः) दादा मुक्त केला; असें थोरपण कोठें? सांगें (सांग)–असा अन्वय. २. याचा कर्ता 'तूं' (**द्रौ**पदी) अध्याहृत. ३. ज्याच्या (श्री**कृ**ष्णाच्या) भक्तिरसें (भक्तिरसानें–परम भक्तीनें) **भ**र्ग (**शं**कर) भुलविला (मोहित झाला) [आणि म्हणून **शं**करानें] स्वर्गसुधाभोग (स्वर्गातील अमृताचा उपभोग) तुच्छ केला; [आणि] ज्यासाठीं (श्री**कृ**ष्णासाठीं) **ब्र**ह्मादि (**ब्र**ह्मदेव आदिकरून) सुर (देव) सदा (नेहमीं) दास (भक्त) [आहेत] तो (श्री**कृ**ष्ण) सुरस (उत्तम) दादास रुचेना–असा १२२ व १२३ या अभंगांचा अन्वयार्थ. ४. ज्या ठिकाणीं श्री**कृ**ष्णानें **रु**क्मीचा पराभव केला त्या ठिकाणीं तो (**रु**क्मि) नवें शहर वसवून राहिला; **कुं**डिननगराला गेला नाहीं. ५. कोणीहि हुडकूं लागला असतां असा हट्टी आणि आग्रही मनुष्य सांपडणार नाहीं. ६. शांत केला. ७. दुःख. ८. यांचा (**ब**लरामाचा) बोल (बोलणें) वेद (वेदवाक्यच आहे), [त्यांत] भेद (फरक) नाहीं. ९. श्री**मू**र्ति (**कृ**ष्णमूर्ति हीच) श्री**गं**गा या

द्रौपदीबाई! हे[1]
माजी[2] लग्न-कथा,
स्वामी मनोरथा[3]
पुरविती." १२७

नाशी[4] काम-क्रोध-
लोभ-पाप-व्यथा
स्वयंवर-कथा
रुक्मिणीची. १२८

लावी[5] धर्म-न्याय-
भक्ति-ज्ञान-पथा
स्वयंवर-कथा
रुक्मिणीची. १२९

भेटवी[6] देऊनि
प्रेम **प**क्षि-रथा
स्वयंवर-कथा
रुक्मिणीची. १३०

मयूरासी वर्षा[7]
सज्जना[8] हे तथा[9]
स्वयंवर-कथा
रुक्मिणीची. १३१

रुक्मिणीहरणगीत
समाप्त.

ओहळा देहा (रुक्मिणीच्या लहान ओढ्यासारख्या देहाला) सोहळा पुरवाया स्वीकारी.–असा अन्वयार्थ. (का० सं०).

१. ही. २. माझी. ३. इच्छेला. ४. रुक्मिणीची स्वयंवरकथा काम (इच्छा)+क्रोध (राग)+लोभ+पाप+व्यथा (दुःख) नाशी–असा अन्वयार्थ. ५. धर्म+न्याय (नीति)+भक्ति+ज्ञान यांच्या पथा (मार्गाला) लावी. ६. प्रेम (भक्ति) देऊन **प**क्षिरथा (**वि**ष्णूला) भेटवी. ७. पावसाळा. ८. चांगल्या लोकांना. ९. तशी; त्याप्रमाणें. **म**यूरासी (मोरास) वर्षा (पावसाळा [यथा=जसा] [प्रिय] तथा (तशी) हे (ही) रुक्मिणीची स्वयंवरकथा सज्जना (चांगल्या लोकांना) [प्रिय आहे]–असा अन्वयार्थ. '**म**यूरासी' या शब्दांत **मो**रोपंत कवीनें आपलें नांव सूचित केलें आहे. कारण आपल्या नांवांतील **मो**र किंवा **म**यूर या शब्दावर कोटि करून **मो**रोपंत कवि आपणांस मोराची उपमा घेत असत.

श्रीराम.

महाराष्ट्र-कवि-वर्य-मोरोपंत-कृत

सावित्री-गीत.

(अभंग[1].)

मद्र[2]-देशीं होता
राजा महा[3]-मति
नामें **अ**श्वपति
साधु[4]-मान्य. १

आलें वृद्ध-पण,
नाहीं पुत्र-रत्न,
केले बहु यत्न
करावे[5] ते. २

सा[6]वित्री-देवीचें
करी[7] आराधन[8]
देह, दारा[9], धन
समर्पूनि[10]. ३

निष्ठेनें[11] सर्वदा
अष्टा[12]-दश वर्षें
जप होम हर्षें
चालवितां, ४

---

१. पृष्ठ १ टीप १ पहा. २. **म**द्र नांवाच्या देशांत. हा **दि**ल्लीच्या पश्चिमेस असणारा एक देश. या **म**द्रदेशाचा **श**ल्य हा पांडवांचे वेळीं राजा होता. ३. महा (मोठी)+मति (बुद्धि)=अति बुद्धिमान्. ४. साधु ज्याला मान देतात असा. ५. करावयाचे; करण्यासारिखे. देवांस नवस करणें, देवब्राह्मणांची पूजा करणें, जप होम करणें, तीर्थयात्रा करणें, वगैरे जे करण्यासारखे प्रयत्न ते. ६. **सा**वित्री=**ब्र**ह्मदेवाची स्त्री. ७. याचा कर्ता '**अ**श्वपति' अध्याहृत. ८. पूजन, स्तवन, भजन, भक्ति इत्यादि. ९. बायको. १०. अर्पण करून. ११. भक्तीनें. १२. अष्टा (अष्ट=आठ)+दश (दहा)=अठरा.

अग्नि-कुंडांतूनि
प्रकटली[1] देवी[2];
अश्वपति ठेवी
पायीं[3] शिर. ५

देवी म्हणे, 'माग'
राजा म्हणे, 'माते!
पुत्र-दानें[4] दाते[5]
लाजवावे.' ६

सावित्री म्हणे, 'म्यां
स्वामी दया-निधि[6]
विनविला[7] विधि[8]
तुजसाठीं. ७

दिली[9] तुज पुत्र-
शताहूनि धन्या[10]
पतिव्रता कन्या
विचारूनि.[11]' ८

ऐसें सांगोनि ती
देवी गुप्त झाली.
कन्या पोटीं आली
मानवीच्या.[12] ९

पुत्रांचें[13] तैसेंच
विधीनें[14] बा[15] रसें[16]
सु-दिनीं[17] बारसें
तिचें करी. १०

१. प्रकट झाली; निघाली. २. सावित्री देवी. ३. मस्तक. ४. पुत्राच्या दानानें=मुलगा देऊन. ५. दानशूर लोकांस लाजवून टाक. मला तूं पुत्रदान दिलेंस तर इतर दाते खालीं माना घालतील. (काव्यसंग्रह). ६. दया+निधि (ठेवा)=दयेचा ठेवा (अत्यंत दयाळु). ७. प्रार्थिला. ८. ब्रह्मदेव. ९. याचा कर्ता 'म्यां' अध्याहृत. १०. शंभर पुत्रांपेक्षां जास्त धन्यत्व देणारी (का० सं०). ११. विचार करून. १२. मनुष्यस्त्रीच्या (अश्वपतीच्या बायकोच्या). १३. मुलाच्याप्रमाणें. सावित्री जरी मुलगी होती तरी पुत्रोत्सवाप्रमाणें तिचा उत्सव केला असा अर्थ. १४. यथाशास्त्र; विधिपूर्वक. १५. बाप (अश्वपति). १६. उत्साहानें; आनंदानें; हर्षानें. १७. सु (चांगल्या)+दिनीं (दिवशीं)—चांगल्या दिवशीं; शुभ दिवशीं.

जिणें पूर्ण केला
वर[1]-दानें काम[2],
ठेवी तिचें[3] नाम
कन्यकेसी. ११
रूपें गुणें कांहीं
उणी न **सा**वित्री,
तशी नसावी [4]त्रि-
भुवनांत. १२
तिला[5] न मागती
राजपुत्र गुणें
स्वरूपासी उणें
जाणोनियां. १३
राजा चिंता करी,
झाली उपवर[6],
अनु[7]-रूप वर[8]
न ये कोणी. १४

सावित्रीला म्हणे,
'वत्से! लग्न-काळ
आला, न भू[9]-पाळ
कोणी मांगों[10]. १५
तूंचि वर स्वयें[11]
योग्य पहा, जा गे!
कोणीही न मागे
येऊनियां. १६
या माझ्या वचनें[12]
तुवां न कोपावें[13],
तुज म्यां ओपावें[14]
योग्य हस्तीं[15].' १७
सावित्री पित्याची
आज्ञा मान्य करी,
ठेवी पायांवरी
मस्तकातें. १८

---

१. वराच्या दानानें (वर देऊन). २. इच्छा; हेतु. ३. **सा**वित्री देवीचें. ४. त्रिभुवनांत=त्रैलोक्यांत. ५. **सा**वित्रीला. स्वरूपानें व गुणानें आपण कमी आहोंत असें जाणून कोणी राजपुत्र तिला वरीना (काव्यसंग्रह). ६. लग्नास योग्य. ७. योग्य. ८. तुमची मुलगी मला द्या असें म्हणणारा; नवरा मुलगा. ९. राजा. १०. मागणी करण्याकरितां. ११. स्वतः. १२. बोलण्यानें. १३. रागावूं नये. १४. द्यावें; अर्पण करावें. १५. योग्य हस्तीं=चांगल्या वराला.

पित्याचा प्रधान,
कुल-गुरु[1], दाया[2],
आप्त[3]-समुदाया-
सह निघे. १९

गेली पृथ्वीवरी
पहावया वरा,
करी शोध बरा
देशोदेशीं. २०

शोधी ती मानेसा[4]
नवरा जीवाला[5],
नव[6] राजीवाला[7]
जैशी भृंगी[8]. २१


रसिकाला[9] जैशी
कविता, ती[10] सती
पाहे योग्य पति
जनीं[11] वनीं[12]. २२

एके दिवशीं आला
संसार-पार-द[13]
श्रीमुनि नारद
मृत्यु-लोकीं. २३

अश्वपतीला तो
भेटे तपोधन[14],
चातकाला[15] घन[16]
स्वयें जैसा. २४

अश्वपति पावे
सुखास[17] नमूनि[18],
सुखासन[19] मुनि
अंगीकारी[20]. २५

१. कुळाचा उपाध्याय. २. धात्री, लहानपणीं संभाळणारी बाई. ३. आप्तमंडळी बरोबर घेऊन. ४. आवडेल असा. ५.मनाला. ६.नवीन. ७.कमलपुष्पाला. ८. भ्रमरी. ९.ज्याला कविता इत्यादिकांची गोडी आहे तो. १०.**सा**वित्री. ११.जनांत. १२. वनांत. १३. संसार (सागराचें)+पार (परतीर)+द (देणारा)=संसारापासून मुक्त करणारा. १४. तप हेंच आहे धन ज्याचें असा. १५. चातकपक्ष्याला. १६. मेघ. १७. आनंदास. १८. नमस्कार करून. १९. [मनाला] सुख (आनंद) [देणारें] आसन; सुखावह आसन. २०. स्वीकारी.



अशा समयांत । सावित्रीही आली, । पायीं नम्र झाली । दोघांच्याही. ॥ **सावित्रीगीत, अभंग २८.**

सुधारस[1] तूपें[2],
कीं[3] सागर कूपें[4],
तैसा[5] मुनि भूपें[6]
सत्कारिला. २६

उद्धराया अश्व-
पतिराय[7] कवि[8]
कथा आयकवी
पुरातना[9]. २७

अशा समयांत
सावित्रीही आली,
पायीं नम्र झाली
दोघांच्याही. २८

नारद विलोकी[10]
करूनियां कृपा,
म्हणे, 'तुझी नृपा
कन्या कीं हे[11]? २९

कोठें गेली होती?
कोठोनि ही आली?
सत्य[12] श्रीची[13] आली[14]
रूपें गुणें. ३०

अहा! उजविलें[15]
कां न कन्यकेला?
ईणें धन्य केला
न कां कोणी?' ३१

राजा म्हणे, 'स्वामी!
हेचि[16] भूमीवर
पहावया वर
धाडिली म्यां. ३२

आतांचि आली हे
सावित्री या धामीं[17],
ईचें वाक्य स्वामी!
आयकावें. ३३

वत्से! सांग कोण
वर त्वां पाहिला.'
ऐकाया राहिला
स्वस्थ मुनि. ३४

---

१. अमृत. २. तुपानें. ३. किंवा. ४. विहिरीनें. ५. तुपानें अमृताचा किंवा विहिरीनें समुद्राचा सत्कार करावा त्याप्रमाणें. ६. राजानें (**अ**श्वपतीनें). ७. राजा. ८. शहाणा, सर्वज्ञ (**ना**रदमुनि). ९. जुन्या, प्राचीन. १०. पाही. ११. ही. १२. खरोखर. १३. **ल**क्ष्मीची. १४. सखी; मैत्रीण. १५. लग्न केलें. १६. हीच (**सा**वित्री). १७. घरीं.

सावित्री म्हणे, 'हो!
शाल्व[1]-देश-पति
द्युमत्सेन अति
विख्याताहे[2]. ३५
धर्म[3]-न्याय-निष्ठ,
दाता[4], सत्य[5]-संध,
झाला दैवें अंध
वृद्धपणीं. ३६
आलें अंधपण;
पुत्र तोही बाळ;
असा कष्ट[6]-काळ
प्राप्त होतां, ३७
शत्रूनें हरूनि[7]
राज्य[8]-भ्रष्ट केला;
स[9]-स्त्री-पुत्र गेला
तपोवनीं[10]. ३८
साहोनियां[11] वर्षा[12]
हिमा[13] आतपाला[14]
तो महा तपाला
करीतसे. ३९
त्याचा पुत्र नामें
सत्यवान् सुमति[15]
वरिला तो पति
भावें[16] मनें.' ४०
मुनि म्हणे, 'केलें
सावित्रीनें खोटें[17],
यांत पाप[18] मोठें,
काय सांगों? ४१

१. **शा**ल्वदेशाचा राजा. हा देश **दि**ल्लीच्या पूर्वेस असावा. २. विख्यात आहे=प्रसिद्ध आहे. ३. धर्मानें व न्यायानें वागणारा. ४. दान करणारा; उदार. ५. सत्य (खरी) संधा (प्रतिज्ञा; वाणी)=खरी आहे प्रतिज्ञा ज्याची असा; खरें बोलणारा. ६. वाईट दिवस. ७. जिंकून; पराभव करून. ८. राज्यापासून भ्रष्ट; राज्य गेलेला असा. ९. स (सह)+स्त्री (बायको)+पुत्र (मुलगा)=बायको व मुलगा यांच्या सह. १०. तप करावयास योग्य अशा वनांत. ११. सहन करून. १२. पावसाला. १३. थंडीला. १४. उन्हाला. १५. सु (चांगली) मति (बुद्धि)=चांगल्या बुद्धीचा; बुद्धिमान्. १६. भक्तीनें. १७. वाईट. १८. वाईट गोष्ट; अनिष्ट गोष्ट.

सत्य बोलतसे
द्युमत्सेन राजा,
बोले त्याची [1]भाजा
तेंही सत्य. ४२

स्वयेंही [2]तो सत्य
सर्वदा बोलतो,
[3]सत्वेंचि डोलतो
तपोवनीं. ४३

[4]चित्रीं लिही अश्व
मृत्तिकेचा [5]घडी,
हाचि घडीघडी
छंद त्यास. ४४

म्हणूनि सत्यवान्
[6]चित्राश्व हीं नांवें
मुनींनीं [7]स्वभावें
ठेवियेलीं. ४५

आम्हां ठावें आहे
त्याचें वृत्त सारें,
आमुच्या [8]विचारें
[9]चुकली हे.' ४६

राजा म्हणे, 'रूपें
बरा आहे तो कीं?'
मुनि म्हणे, 'लोकीं
[10]तसा [11]कैचा?' ४७

राजा म्हणे, 'जाणे
विद्या [12]कळा कांहीं?'
मुनि म्हणे, 'नाहीं
तैसा [13]सुज्ञ.' ४८

राजा म्हणे, '[14]शौर्यें
कसा असे बोला?'
मुनि म्हणे, 'तोलीं[15]
[16]महेंद्राशीं.' ४९

---

१. बायको. २. सत्यवान्. ३. सद्गुणांनीं (का० सं०). ४. घोड्यांचीं चित्रें काढितो व मातीचे घोडे करितो (का० सं०). ५. करी. ६. सत्यवानाला चित्राश्व असेंही नांव होतें. ७. सहजरीतीनें; अर्थात्. ८. मतानें. ९. हिच्या हातून चूक झाली. १०. सत्यवानासारिखा. ११. कोठें आहे? १२. कला (गाणें वगैरे). १३. शहाणा. १४. पराक्रमानें. १५. तुलना करा. १६. इंद्राबरोबर.

राजा म्हणे, ‘आहे
गुरु-विप्र-भक्त[1] ?’
मुनि म्हणे, ‘व्यक्त[2]
भक्ति-रस.’ ५०

राजा म्हणे, ‘तरी
नसेल तो दाता.’
मुनि म्हणे, ‘हाता[3]
त्याच्या गावें.’ ५१

राजा म्हणे, ‘तरी
क्षमा[4] नाहीं काय ?’
मुनि म्हणे, ‘हाय !
नायकों[5] हें.’ ५२

राजा म्हणे, ‘पाहे
हरि[6]-हरा भेद ?
तेणें तुज खेद
वाटतसे ?’

मुनि म्हणे, ‘शिव-
शिव ! हरि-हरि !
त्याची फार बरी[7]
दृष्टि आहे.’

राजा म्हणे, ‘त्याच्या
कोण दोष आंगा
स्पर्शलासे[8] ? सांगा
तुह्मी स्वामी !’

मुनि म्हणे, ‘गुण[9]-
ग्रामा एक थोर
दोष, चंद्रा घोरें[10]
राहु जैसा.

१. गुरु (वडील)+विप्र (ब्राह्मण)+भक्त (भक्ति करणारा)=वडील मा
ब्राह्मण यांची भक्ति करणारा. २. स्पष्ट. मूर्त्तिमंत तो भक्तिरसच आहे.
सं०.) ३. त्याच्या हाताची स्तुतिच करावी. हातानें आपण दान करितों
हाताची स्तुति करावयाची, सारांश तो मोठा दाता आहे. (का०
४. त्याच्या आंगीं क्षमा नाहीं काय ? ५. शिव ! शिव ! त्याच्या संबंधा
बोलूं सुद्धां नका. तो मोठा क्षमाशील आहे असें तात्पर्य. ६. हरि (वि
हर (**शं**कर)–**वि**ष्णु व **शं**कर यांच्यामध्यें भेद पाहतो काय ? (वि
शंकर निरनिराळे आहेत असें समजतो काय ?) ७. चांगली; अ
सम. ८. शिवला आहे. ९. गुण+ग्राम (समूह)–पुष्कळ गुण आहे
च्यामध्यें अशाला (**स**त्यवानाला). सत्यवान् हा सर्वगुणसंपन्न आहे, परं

त्या गुण-मंदरा[1]
वर्षमात्र आयु[2]
जातां काळ-वायु[3]
उन्मूळील.[4]' ५७

राजा म्हणे, 'तृषा[5]
हरी[6] त्या सु-सरा[7]
सेवावें, दुसरा
पहा बाई!' ५८

सावित्री म्हणे, 'जो
वरिला मीं मनें,
तोचि गुरु-जनें[8]
द्यावा मज. ५९

तो **स**त्यवान् सत्य
पति हो[9] कल्पायु[10],
किंवा हो अल्पायु[11],
अन्य[12] पिता. ६०

त्यालाचि वरील
तुमची हे कन्या,
तुम्हासम अन्या
पहातसे.' ६१

मुनि म्हणे, 'राया!
स्थिर-बुद्धि[13] धन्या
हे **सा**वित्री कन्या
निश्चयाची[14]. ६२

एक मोठा दोष (उणेपणा) आहे कीं तो अल्पायुषी आहे—असा भाव. १०. भयंकर.

१. गुण+मंदरा (मंदर=स्वर्गांतील कल्पवृक्ष)—गुणांच्या कल्पवृक्षाला (**स**त्य-वानाला). २. आयुष्य. ३. **य**मरूपी वायु. ४. समूळ उपटून टाकील. ५. तहान. ६. हरण करी. ७. सु (चांगलें)+सर (सरोवर; तळें.)—चांगल्या सरोवराला. तहान भागवितें अशा दुसऱ्या चांगल्या सरोवराला सेवावें म्हणजे चांगलें सरोवर पहावें. (का० सं०). ८. गुरु (वडील)+जनें (लोकांनीं, माणसांनीं)=वडिलांनीं. ९. होवो. १०. कल्प+आयु—कल्पपर्यंत (चार अब्ज बत्तीस कोटी वर्षेंपर्यंत) आहे आयुष्य ज्याचें असा. ११. अल्प (थोडें)+आयु (आयुष्य)—थोडें आहे आयुष्य ज्याचें असा. १२. दुसरा पुरुष मला बापासारिखा आहे. १३. एकनिश्चयाची. चंचल नाहीं बुद्धि जिची अशी. १४. स्थिरबुद्धीची; दृढनिश्चयाची.

सत्यवंता ऐसा
गुणी नाहीं कोणी,
पाहिली म्यां [१]क्षोणी
विचारूनि[२]. ६३

चित्राश्वाकारणें
द्यावें कन्या-दान,
कांहीं अनमान
करूं नको. ६४

[३]धर्मे [४]वर्ते त्याचा
ईश्वर कैवारी,
[५]सर्वानर्थ [६]वारी
[७]धार्मिकांचे. ६५

तुह्मां समस्तांचें
कल्याण असावें,
जातों मी, बसावें
स्वस्थ तुवां.' ६६

ऐसें बोलोनि तो
मुनि स्वर्गा जाय.
गेला तोही राय
[८]तपोवना.

द्युमत्सेना भेटे,
ह्मणे **अ**श्वपति,
'तुझ्या [९]पुत्राप्रती
कन्या देतों.'

द्युमत्सेन म्हणे,
'आमुची हे [१०]गति!
अन्य [११]क्षिती–पति
काय थोडे ?

तुझी एकुलती
कन्या भाग्यवती
[१२]सुखोचिता अति
सुकुमारी.

१. पृथ्वी. २. विचार करून, शोधून. ३. धर्मानें; चांगल्या
४. वागतो; वर्तन करितो. ५. सर्व+अनर्थ (संकटें)–सगळीं संकटें.
वारण करी. ७. धर्मानें वागणाऱ्यांचे. ८. **द्यु**मत्सेन ज्या तपोवनांत र
त्या तपोवनांत. ९. पुत्राला (**स**त्यवानाला). १०. स्थिति. आम्ही संकट
(का० सं०). ११. पृथ्वीपति. क्षिती (पृथ्वी)+पति (स्वामी)–पृथ्वीचे स्व
१२. सुख+उचिता (योग्य आहे अशी)–सुखांत राहण्यास योग्य.

नाहीं [1]सुख-गंध,
राज्य-भ्रष्ट, अंध,
अशाशीं संबंध
कां रुचला?' ७१
अश्वपति म्हणे,
'[2]सत्य-शील-धन
हेंचि सुज्ञ-जन
इच्छितात. ७२
संकटाला भिऊं
नये [3]सत्व-रतें,
जातें [4]सत्वर [5]तें
सोडोनियां. ७३
निश्चयें घेऊनि
आलों कन्यकेला,
[6]अर्थी धन्य केला
पाहिजे हो!' ७४
द्युमत्सेन म्हणे,
'[7]अतिथी तूं [8]पूर्ण;
तुझा [9]काम [10]पूर्ण
करावाचि.' ७५
[11]पाचारिले [12]त्यांहीं
सर्व [13]तपोनिधि,
लग्न यथा-विधि
[14]संपादिलें. ७६
[15]परमार्थ-दृष्टि
[16]हिमाळयापरी
कन्या-दान करी
अश्वपति. ७७

१. सुख+गंध (लेश; संसर्ग)=थोडें देखील सुख नाहीं. २. सत्य (खरें बोलणें)+शील(स्वभाव;चांगलें आचरण)–खरें बोलणें व चांगलें आचरण हेंच धन आहे. ३. धैर्यवंतानें. सत्व (चांगलेपणा)+रत (निष्ठेनें वागण्यांत तत्पर)–सदाचरणानें वागणारा त्यानें. ४. लवकर. ५. संकट. ६. याचक; मागणारा. ७. पाहुणा. ८. खरा; योग्य; सर्वतोपरी. ९. इच्छा. १०. पुरा; सफल; तुझा हेतु पुरा केला पाहिजे. तुझी इच्छा सफल केली पाहिजे. ११. बोलाविलें. १२. द्युमत्सेन व अश्वपति यांनीं. १३. तपः+निधि=तप हेंच आहे निधि (ठेवा; द्रव्य) ज्यांचें असे; ऋषि. १४. केलें. १५. परम+अर्थ+दृष्टि–खरा अर्थ पाहणारा म्हणजे खऱ्या दृष्टीनें पाहणारा. १६. हिमालयपर्वताप्रमाणें. हिमालयपर्वतानें आपली कन्या अरण्यवासी शंकरास दिली त्याप्रमाणें.

कन्या निरखितां[१]
पडे महीवर[२],
राया[३] गहींवर[४]
आंवरेना. ७८
सावित्री पित्याच्या
नेत्रांतें पदरें
पुसूनि आदरें[५]
समजावी. ७९
घेऊनि निरोप
निघे **अ**श्वपति.
ती **सा**वित्री सती
स्वस्थ राहे[६]. ८०
हर्षली पावोनि
जशी सती[७] भर्गा[८],
वनाहूनि स्वर्गा
तुच्छ मानी. ८१
तशीच **सा**वित्री
आनंदली मनीं,
क्रीडे तपोवनीं
पती-संगें. ८२
वांटी बहु, स्वल्प[९]
वस्त्र नग[१०] ठेवी,
वल्कलें[११] ती देवी
सुखें[१२] नेसे. ८३
श्वशुराची[१३] आज्ञा
जशीच वेदांची[१४],
तीळही भेदाची
बुद्धि नाहीं. ८४

१. पाहिलें तेव्हां. कन्यादान झाल्यावर कन्येला पाहिलें तेव्हां (का० सं०). २. जमिनीवर. ३. राजाला (**अ**श्वपतीला). ४. दुःखाचा उमाळा. ५. पूज्य बुद्धीनें. ६. (सासरीं) राहिली. ७. **द**क्षाची कन्या. ही **स**ती नांवाची **द**क्षाची कन्या **शं**करास दिली होती, आणि हीच दुसऱ्या जन्मीं **पा**र्वती या नांवानें **हि**मालयपर्वताच्या उदरीं आली, आणि पुन्हां **शं**कराची बायको झाली. ८. **शं**कराला. ९. थोडे. १०. दागिने. **सा**वित्रीनें पुष्कळ अलंकार व वस्त्रें देऊन टाकिलीं व थोडीं ठेविलीं. ११. झाडाच्या सालींचीं केलेलीं वस्त्रें. १२. आनंदानें. १३. सासऱ्याची. १४. **वे**दवाक्याप्रमाणें **सा**वित्री सासऱ्याची आज्ञा मानीत होती, त्यामध्यें तिळभरही भेदाची बुद्धि (फरक) ठेवीत नसे.

कुळ-देवताचि
ती श्वश्रू[1] मानिली,
पुजिली, वानिली[2]
सावित्रीनें. ८५

केवळ अतिथी[3]
अभ्यागत[4] बाळ
करी प्रतिपाळ[5]
माता[6] सती. ८६

मानियला शाक[7]-
फळ-मूळ-कंद-
रसाहूनि मंद
सुधा-रस. ८७

बोलावें स[8]-स्मित,
मृदु[9], परि[10]-मित,
सत्य, प्रिय, हित[11]
बोलविल्या[12]. ८८

सर्वांच्या मागूनि
तृण[13]-शय्येवरी
सुखें निद्रा करी,
उठे आधीं[14]. ८९

एकांतीं पतीचें
हृदय[15] रमवी[16],
संताप[17] शमवी[18]
सेवा-धर्में. ९०

१. सासू. सासूला **सा**वित्री कुलदेवताच मानीत होती. २. स्तवन केलें. ३. प्रवासी. ४. आलेला; पाहुणा. ५. सांभाळ. ६. अतिथी आणि अभ्यागत हे बाळ आणि सती म्हणजे **सा**वित्री ही मातेप्रमाणें प्रतिपाळ करी; त्यांना मुलाप्रमाणें जपे असा अर्थ. ७. शाक (भाजी)+फळ+मूळ+कंद (रताळीं वगैरे) यांच्या रसापेक्षां सुधारस (अमृत) मंद (कमी गोड) [**सा**वित्रीनें] मानिला. ८. किंचित् गालांत हंसून. ९. कठोर नव्हे असें [भाषण]. १०. थोडें, बेताचें; जितक्यास तितकें. ११. उपयोगी; कल्याणकारक. १२. दुसऱ्यानें विचारलें तरच (का० सं०). १३. तृण (गवत)+शय्या (बिछाना)–गवताच्या बिछान्यावर. १४. अगोदर; सर्वांच्या अगोदर. १५. मन. १६. संतोषवी; आनंदित करी. १७. त्रास. १८. शांत करी. नाहींसा करी.

न पडे विसर
[1]मुनीच्या शब्दाचा,
[2]अवधि [3]अब्दाचा
सदा मोजी. ९१
जसा तो अवधि
होय देह [4]उणा,
नित्य ताप [5]दुणा
सावित्रीचा. ९२
[6]उरले दिवस
अवधीचे चार,
व्रताचा विचार
[7]करी मनीं. ९३
उपोषण तीन
दिवस करावें,
शेवटीं मरावें
पती-सह. ९४
[8]त्रि-दिन-व्रताचा
[9]संकल्प करूनि
बैसली धरूनि
नियमातें. ९५
दुःख पावे [10]राजा
तिच्या त्या निश्चयें,
[11]आहारार्थ स्वयें
[12]असें [13]प्रार्थी; ९६
म्हणे, 'बाई! मज
अंधाकडे पाहें;
उपोषण कां हें
आरंभिलें? ९७

१. **ना**रदाच्या. '**स**त्यवानाचें आयुष्य फक्त एक वर्षपर्यंत आहे' हें जें **ना**रदमुनींनीं सांगितलें होतें त्याचा **सा**वित्रीला विसर पडला नाहीं. २. वेळ; दिवस. ३. वर्षाचा. ४. कमी. जसा तो अवधि उणा होय तसा **सा**वित्रीचा देह उणा होय. जसजसे वर्षाचे दिवस कमी होत चालले तसतसा **सा**वित्रीचा देह कमी होत चालला; म्हणजे ती कृश होत चालली. ५. दुप्पट. ६. **स**त्यवानाच्या मृत्यूचे चार दिवस राहिले. ७. याचा कर्ता '**सा**वित्री' अध्याहृत. ८. त्रि (तीन)+दिन (दिवस)+व्रताचा=तीन दिवस निराहार करावा अशा व्रताचा. ९. मनोदय; निश्चय. १०. **द्यु**मत्सेनराजा. ११. आहार (खाणें)+अर्थ (साठीं)–कांहीं खावें म्हणून. १२. पुढील ९७,९८,९९, या अभंगांत सांगितल्याप्रमाणें. १३. विनंतीपूर्वक बोले.

मुली! हा उपास
तिसरा कीं आहा[1]!
कां हे कष्ट महा
करितीस? ९८

गुर्वाज्ञा-पालन-[2]
व्रत कुलीनेतें
बाई! मुली! नेतें
सुखें स्वर्गा.' ९९

सावित्री म्हणे, 'जी[3]!
नका होऊं श्रमी[4],
उद्यां व्रतास मी
उजवीन[5]. १००

कळेल करितें
व्रत ज्याकारणें[6],
करीन पारणें[7]
उद्यां याचें.' १०१

राजा म्हणे, 'तरी
घडो हें[8] अ[9]-व्यंग;
कोणी व्रत[10]-भंग
करूं नये. १०२

न भोगितां अशी
संताप[11]-तीव्रता
संता[12] पतिव्रता
सदा मान्या.' १०३

१. आहाहा! हा दुःखाचा उद्गार. २. गुरु+आज्ञा+पालन+व्रत (वडील माणसाची आज्ञा पाळण्याचें व्रत) कुलीनेतें (कुलीन स्त्रियेला) सुखें (सहज रीतीनें) स्वर्गा नेतें असा अन्वय. ३. अहो! ४. कष्टी. ५. संपूर्ण करीन; पुरें करीन. ६. ज्याकरितां. ७. कांहींएक निमित्तानें उपोषण केलें असतां तें उपोषण सोडण्याकरितां जें भोजन करितात तें. ८. तुझें व्रत. ९. अ (न) व्यंग (न्यून; कमीपणा; उणेपणा;)=ज्यांत कांहीं न्यून किंवा कमीपणा नाहीं असें. १०. व्रताचा भंग=व्रत मोडणें. ११. संताप (तप किंवा तपापासून होणारा ताप)+तीव्रता (उग्रता). तीव्र तपानें उग्रता येते. अशी संतापतीव्रता न भोगितां पतिव्रता संता सदा मान्या [असते.]—पतिव्रता स्त्रीला कठिण व्रत करण्याचें कारण नाहीं; कठिण व्रत न करितांहि पतिव्रता स्त्री संतांना (साधूंना) मान्य असते—असा भावार्थ. १२. साधूंना; सज्जनांना.

ऐसें सांगोनियां
[1]हित उगा राहे,
राजा वाट पाहे
[2]उदयाची. १०४

चवथे दिवशीं
प्रातःकाळीं सती
समाप्त व्रत ती
करी भावें. १०५

[3]नमस्कारी श्वश्रू-
श्वशुर-चरणां
पतीच्या मरणा
चुकवाया. १०६

[4]म्हणती, 'सौभाग्य-
वती पुत्र-वती
चिर-काळ पती-
सह नांदें.' १०७

ऐसेंच ह्मणती
तपोधन मुनि
मागतां नमूनि
आशीर्वाद. १०८

आशीर्वाद-वर
गुरूचे [5]साधिले,
[6]पदरीं बांधिले
सावित्रीनें. १०९

[7]आली तपोधना
करूनि [8]प्रणति;
वडील ह्मणती,
'[9]भुक्ति करीं.' ११०

विनवी जोडूनि
हात [10]त्यांकारणें,
'करीन पारणें
[11]अस्तमानीं.' १११

१. कल्याणकारक; बरें; हितावह. २. सूर्य उगवण्याची. ३. नमस्कार करी. याचा कर्ता '**सा**वित्री' अध्याहृत. ४. याचा कर्ता '**सा**वित्रीची सासू व सासरा' अध्याहृत. ५. मिळविले. ६. पदरांत बांधिले (मिळविले). ७. याचा कर्ता '**सा**वित्री' अध्याहृत. ८. नमस्कार. ९. जेवण कर, पारणें सोड. १०. त्यासाठीं; त्यामुळें; वडिलांनीं जेवण करावयास सांगितलें म्हणून. ११. सायंकाळीं.

मनींच सावित्री
वाहे काळजीला,
दिसे काळ[1] जिला
क्षण-क्षणां.[2] ११२

सत्यवंत स्कंधीं[3]
परशु[4] वाहोनि[5]
स्त्रीकडे पाहोनि
वना निघे. ११३

सावित्री म्हणे, 'जी!
मी येत्यें वनाला,
वियोग मनाला
न सोसवे.' ११४

तो म्हणे, 'त्वां केलीं
उपोषणें तीन,
झाला शक्ति-हीन[6]
देह तुझा. ११५

वर्णावीं[7] पाऊलें
तुझीं नवनीतें!
गमन वनीं तें
कठिनांचें.[8] ११६

सुख-द[9] नव्हे तें,
दुःख-द[10] कानन[11];
ह्मणसी कां? 'न[12] न,'
आतां येतों.' ११७

सती म्हणे, 'मज
दुःखांतचि सुख
तुमचें श्री-मुख[13]
विलोकितां.[14] ११८

---

१. मृत्यु; **यम**. २. क्षणोक्षणीं; प्रतिक्षणीं. ३. खांद्यावर. ४. कुऱ्हाड. ५. घेऊन; ठेऊन. ६. शक्ति+हीन (रहित)–शक्ति गेलेली आहे असा; क्षीण. ७. वर्णन करावीं. तुझीं पाऊलें नवनीतें (लोण्यानें) वर्णावीं=तुझीं पाउलें लोण्यापेक्षांही मृदु आहेत–असा भाव. ८. धट्टेकट्टे लोकांचें; राकट लोकांचें. ९. सुख देणारें. १०. दुःख देणारें. ११. अरण्य. १२. 'नाहीं नाहीं.' एकटें नका जाऊं असें कां म्हणतेस? (का० सं०.) १३. सुंदर मुख. १४. पाहतां.

स्वामी[1]-संगें मज
न बाधेल ताप,
जसा भव-ताप
संतें[2]-संगें.' १९९

सत्यवंत म्हणे,
'कांते! न रुसावें,
तुवां हें पुसावें
वडीलांस.' १२०

सासू-सासऱ्यांतें
म्हणे, 'न कोपावें,
मज हें ओपावें[3]
वर-दान. १२१

फळें आणावया
जातांना वनांत
माझ्याही मनांत
वाटे जावें. १२२

वर्ष झालें आल्या
सोडूनि माहेर,
आश्रमाबाहेर
गेल्यें नाहीं. १२३

स्वामी-समागमें,
तपस्वी शरण्य[4],
पाहेन अरण्य,
आज्ञा द्यावी.' १२४

राजा म्हणे, 'बाई!
वर्षांत त्वां कांहीं
मागितलें नाहीं
आम्हांपाशीं. १२५

वन पाहावया
आज्ञा मागतीस,
पायां[5] लागतीस,
तरी जावें. १२६

वत्सा[6]! उपवासी
सुकुमारी बाळा,
शीघ्र[7] या, सांभाळा
अन्योन्यांतें.' १२७

१. पतीबरोबर. 'आपण बरोबर असतां मला ताप (त्रास) होणार नाहीं' असें **सा**वित्री **स**त्यवानाला म्हणत आहे. २. जसा संतसंगें (साधूंच्या समागमानें) भवताप (संसाराचा ताप) बाधत नाहीं त्याप्रमाणें. ३. हें वरदान मज ओपावें—मला पतीबरोबर वनांत जाण्यास परवानगी द्यावी. ४. शरण जाण्यास योग्य. ५. पायां लागतेस=पायां पडतेस. ६. हे मुला! (हे **स**त्यवाना!) ७. लवकर.

वंदूनियां सती
निघे झडकरी,
धैर्यें [1]धड करी
हृदयातें. १२८
[2]पुष्पित [3]फलित
[4]तरु, [5]मृग, पक्षी,
[6]वनांतरीं [7]लक्षी
राज-कन्या; १२९
पतीच्या [8]सुखार्थ
बळें आणी हास्य
मयूरांचें [9]लास्य
विलोकूनि; १३०
[10]विनोद-वचनें
पतीतें [11]डोलवी;
[12]दाटूनि बोलवी;
[13]पुण्य-कथा. १३१
एके नेत्रें प्रिया,
एके नेत्रें **काळा**
पाहे [14]राज-बाळा
[15]हृष्टा, [16]भीता. १३२
चित्राश्व [17]वेंचूनि
फळें [18]पात्र भरी;
मग [19]काष्ठावरी
घाव घाली. १३३
[20]शक्तीहूनि बहु
घडतां [21]आयास
तयाच्या [22]कायास
[23]घर्म आला. १३४

१. धट्ट; मन घट्ट करी. २. फुलें आलेले. ३. फळें आलेले. ४. वृक्ष, झाडें. ५. पशु; जनावरें. ६. वनामध्यें. ७. पाही. ८. सुख व्हावें म्हणून. ९. नाचणें. १०. विनोदाचे (थट्टेच्या) बोलण्यानें. ११. संतोषवी. १२. बळें; मुद्दाम. १३. पवित्र गोष्टी. १४. राजकन्या (**सा**वित्री). १५. आनंदित. १६. भ्यालेली. नवऱ्याकडे पाहतांना तिला आनंद वाटे आणि नवऱ्याचे प्राण नेण्याकरितां **यम** येत आहे कीं काय हें पहावयास लागे तेव्हां तिला भीति वाटे. १७. गोळा करून. १८. भांडें. १९. लांकडावर; झाडावर. २०. शक्तीबाहेर; शक्तीपेक्षां. २१. श्रम. २२. शरीरास. २३. घाम.

कठिणा काष्ठाच्या
करितां भेद[1]ना
उठली वेद[2]ना
शिरीं[3] भारी. १३५
म्हणे[4], 'प्रिये! शूळ[5]
उठला मस्तकीं.'
धांवूनि हस्तकीं[6]
साध्वी धरी. १३६
म्हणे, 'कधीं झाला
ऐसा खेद नाहीं,
शिरोवेदनांहीं[7]
धैर्य गेलें. १३७
जाणों[8] शूलाघातें[9]
मस्तक फाटतें,
मनांत वाटतें
निजावेंसें.' १३८
पतीच्या मस्तका-
खालीं घाली मांडी,
जाणों[10] उशी मांडी[11]
कुसुमांची[12]! १३९
धरूनि मस्तक
मनीं म्हणे बाळा[13],
'आला ठोकताळा[14]
भविष्याचा.' १४०
तों[15] पुरुष पाश[16]-
हस्त उभा आहे
असें साध्वी पाहे
पुण्य-बळें[17]. १४१

१. तोडणें. २. कळ. ३. डोक्यांत. ४. याचा कर्ता '**स**त्यवान्' अध्याहृत. ५. तिडीक; कळ. ६. हातांनीं. ७. डोक्यांत निघालेल्या कळांनीं. ८. असें वाटतें कीं. ९. शूल (तिडीक)+आघातें (टोंचण्यानें; मारण्यानें)—डोक्यांत निघालेल्या वेदनांनीं असा भाव. १०. जणूं काय. ११. करी. १२. फुलांची. १३. **सा**वित्री. १४. प्रतीति; प्रचीति. **ना**रदमुनींनीं जें भविष्य **स**त्यवानाच्या मृत्यूविषयीं सांगितलें होतें त्याची प्रचीति आली. १५. तेव्हां; तितक्यांत. १६. पाश (मृत्युपाश)+हस्त=मृत्युपाश ज्याच्या हातांत आहे असा. १७. पुण्याच्या बळानें. **सा**वित्री पुण्यवान् होती म्हणून तिला **य**म दिसला.




तो पुरुष पाहे । इथें उभा आहे । असें साध्वी पाहे । पुण्यबळें ॥ सावित्रीगीत, अभंग १३१.

[illegible]
[illegible]
उठली [illegible]
[illegible] १३५
[illegible]
[illegible]
[illegible]
[illegible] १३६
[illegible]
[illegible]
शिरोवेदनोंही
धैर्य गेलें. १३७
[illegible]
[illegible]

मनांत [illegible]
निजा[illegible]
पतीच्या [illegible]
खालीं [illegible]
जोंवरी [illegible]
[illegible]
[illegible]
मनीं म्हणे [illegible]
'आला ठोके[illegible]
भविष्या[illegible]
तों पुरुष [illegible]
हस्त उभा [illegible]
कशी साध्वी [illegible]
पुंण्य-[illegible]

[illegible] ४. याचा काय [illegible] ७. डोक्यांत [illegible]



तों पुरुष पाश- । हस्त उभा आहे । असें साध्वी पाहे । पुण्यबळें ॥ सावित्रीगीत, अभंग १४१.

[1]रक्त-नेत्र, [2]कृष्ण-
वर्ण, [3]तेजें [4]अर्क,
[5]**काळ** असा तर्क
मनीं केला. १४२
हळूचि मस्तक
उतरूनि ठेवी;
उठोनि ती देवी
हात जोडी; १४३
म्हणे, 'बा! तूं देव,
काय तुझें नाम?
कोण कार्य काम?
मज सांग.' १४४
काळ म्हणे, '[6]शुद्धा
म्हणोनिच तुज
सांगतों मी [7]गूंज
पतिव्रते! १४५
[8]करीता जीवाची
प्राण-हानि **यम**
जाण [9]हा नियम
[10]व्रत-सिद्धे! १४६
सरलें आयुष्य
[11]नियत, [12]मान्या या
प्रियतमा न्याया
तुझ्या आलों.' १४७
पतिव्रता म्हणे,
'दूत कीं येतात,
जीवाला नेतात
तुजकडे. १४८
स्वयें कां आलास?
काय केले दूत?
[13]प्रभूस [14]प्रभूत
श्रम झाला.' १४९
यम म्हणे, 'पितृ-
भक्त **सत्यवंत**,
यासी सर्व संत
[15]मानवती. १५०

१. ज्याचे डोळे लाल आहेत असा. २. काळ्या रंगाचा. ३. तेजानें. ४. सूर्य. ५. **यम**. ६. शुद्ध (पवित्र) आहे आचरण जिचें अशी तूं. ७. गुप्त गोष्ट. ८. कर्ता; करणारा. ९. हा नियम=हाच सिद्धांत; हाच निश्चयार्थ; हेंच खचित. १०. व्रताच्या योगानें सिद्धपदाप्रत (उच्चपदाला) पोंहोचलेली अशी तूं. ११. ठरलेलें. १२. मान्य (योग्य) जो त्यास (**सत्यवानाला**). १३. देवाला (**यमाला**—तुला). १४. फार; अतिशय; पुष्कळ. १५. मान देतात.

कोणी रूपें गुणें
नाहीं असा मान्य,
सत्य [1]अ-सामान्य
सत्यवंत. १५१
दूत कसा धाडूं
न्यावया अशाला?
रक्षाया [2]यशाला
[3]स्वयें आलों.' १५२
ऐसें बोलोनियां
तो देव [4]**कीनाश**
घालोनियां पाश
बळें ओढी. १५३
[5]पुरुषासी राजा
काढी गेहांतूनि,
तसा देहांतूनि,
काढियेला. १५४
[6]पुरुष काढितां
अंगुष्ठ-प्रमाण,
[7]निष्प्रभ [8]निष्प्राण
देह झाला. १५५
पाशांनीं बांधोनि
[9]सूक्ष्म-पुरुषाला
घेऊनि निघाला
[10]धर्मराज. १५६
यापरी होऊनि
[11]कृत-कार्य **काळ**
निघाला तत्काळ
[12]दक्षिणेला. १५७

१. अ (नाहीं)+सामान्य=सामान्य नव्हे असा; श्रेष्ठ; वरिष्ठ. २. माझ्या (**य**माच्या) स्वतःच्या यशाला. ३. स्वतः. ४. **यम**. ५. राजा पुरुषास (मनुष्यास) गेहांतूनि (घरांतून) काढी (काढितो) तसा [**स**त्यवानाच्या] देहांतूनि (शरीरांतून) [पुरुष=लिंगदेह] [**य**मानें] काढियेला. ६. लिंगदेह (आत्मा). हा लिंगदेह अंगुष्ठप्रमाण असतो. अंगुष्ठप्रमाण म्हणजे आंगठ्यानें ज्याचा निर्देश केला जातो तो. अत्यंत सूक्ष्म तो बोटानें दाखविला जातो. लिंगदेह (आत्मा) अत्यंत सूक्ष्म असतो म्हणून त्यास अंगुष्ठप्रमाण असें म्हटलें आहे. ७. निस्तेज; तेज नाहीं ज्याला असा. ८. प्राणरहित. ज्या देहांत प्राण नाहीं असा. ९. लिंगदेहाला. १०. **यम**. ११. कृत (केलेलें)+काम–ज्याचें कार्य झालेलें आहे असा. १२. **द**क्षिण दिशेला.

त्यामागूनि साध्वी
तशीच निघाली,
न तिच्या निघाली[1],
मनीं शंका. १५८

सती[2]-व्रतें तिच्या
अंगा सिद्धि[3] आली,
आकाशांत झाली
गति[4] प्राप्त. १५९

करी मनुष्यत्वा-
पासूनि सुटका
जड ही गुटका[5]
न कां धर्म? १६०

यम म्हणे, 'दूर[6]-
पावीत आलीस,
सावित्री! झालीस
उतराई[7]. १६१

जा, उत्तम लोक
प्राप्त व्हाया प्रिया[8]
करीं सांग[9] क्रिया[10]
यथा-शक्ति.' १६२

सावित्री म्हणे, 'गा[11]!
देहा[12]सवें छाया[13]
जशी, तशी जाया[14]
पती[15]-सवें. १६३

प्राण जाऊं द्यावे,
पति न सोडावा,
स्व-धर्म जोडावा
मुख्य हाचि. १६४

गुरूच्या तुझ्याही
प्रसादें आजी[16] या
गतीला माझिया
विघ्न नाहीं. १६५

१. आली; उत्पन्न झाली. २. पतिव्रताधर्मानें. ३. योग्यता. ४. जाण्याची योग्यता. तिला आकाशमार्गानें जाण्याचें सामर्थ्य आलें. ५. धर्म ही गुटका (मात्रा) जड मनुष्यत्वापासून सुटका कां न करी? (काव्यसंग्रह.) ६. दूर-पर्यंत. ७. उपकार फेडलेली अशी; कर्तव्यकर्म केलेली अशी; आपला धर्म बजावलेली अशी. ८. पतीला. ९. पूर्ण. १०. उत्तरक्रिया. ११. अगा! १२. देहाबरोबर; शरीराबरोबर. १३. सांवली. १४. बायको; भार्या. १५. नवऱ्याबरोबर. १६. आज.

सात[1] पदें गांठी[2]
जरी मार्गीं पडे,
तरी मैत्री घडे
सज्जनांशीं. १६६
या न्यायें तुजशीं
सख्य झालें वाटे[3]
दोघें एके वांटें[4]
चालतसों. १६७
तुजशीं बोलत्यें
कांहीं मित्र-भावें[5],
तें त्वां आयकावें
धर्मराजा! १६८
इंद्रियें[6] जिंकिल्या-
विना केलें कर्म,
त्यासी संत धर्म
न म्हणती. १६९
गृहस्थाश्रमांत[7]
सर्व धर्म घडे,
तेणें[8] मळ[9] झडे[10]
अंतरींचा[11]. १७०
विषय[12]-वासना-
मळ जातां, ज्ञान
होय समाधान
आत्म[13]-लाभें. १७१
गृहस्थाला[14] सोपें,
न तसें अन्यास[15],
न लागे संन्यास
ज्ञानासाठीं[16]. १७२

१. सज्जन लोकांबरोबर सात पावलें चाललें म्हणजे त्यांच्याशीं मैत्री होते. २. गांठ; भेट. ३. मनांत वाटे. ४. वाटेनें. ५. मित्राच्या नात्यानें. ६. इं-द्रियांचें व मनाचें दमन गृहस्थाश्रमाशिवाय होत नाहीं म्हणून पतीला नेऊं नको असा भाव. ७. गृहस्थ+आश्रम–गृहस्थाच्या आश्रमांत (गृहस्थाच्या धर्मानें राहण्यांत. संसार करून राहण्यांत). ८. त्यामुळें. ९. पाप. १०. ना-हींसा होतो. ११. मनाचा. १२. विषयवासना हेंच पाप. (का० सं०.) १३. ब्रह्मप्राप्तीमुळें. १४. गृहस्थाश्रमांत राहणारा त्याला. १५. इतरास, दुसऱ्यास. १६. ज्ञानासाठीं संन्यास घेण्याची जरूर नाहीं असा भाव.

असें म्यां ऐकिलें;
ऐसेंच कीं बा! हें
विचारूनि पाहें
धर्मराजा!' १७३

धर्म म्हणे, 'बाई!
[1]मदालसा धन्या,
कीं तूं, नसे अन्या
आढळली. १७४

[2]रोमांच माझिया
देहीं उभारती
तुझी [3]सु–भारती
[4]आकर्णितां. १७५

[5]पती-विना देतों
एक वर, [6]मागें,
जा फिरोनि [7]मागें,
भागलीस.' १७६

साध्वी म्हणे, 'देसी
जरी आज वर,
तारीं [8]राज-वर
द्युमत्सेन. १७७

त्याचें अंधपण
वृद्धपण जावें,
गेलें [9]तेजें यावें
[10]अनायासें.' १७८

यम म्हणे, 'हें म्यां
दिलें [11]महा-भागे!
परतोनि जा गे!
भागलीस.' १७९

साध्वी म्हणे, 'मला
कांहीं नाहीं श्रम,
[12]पति–समागम
[13]सुख-मय. १८०

१. मदालसा ही अलर्क राजाची माता. ही एक परमब्रह्मनिष्ठ साध्वी होती. २. आंगावर आनंदानें जे कांटे येतात ते. ३. सु (चांगली)+भारती (वाणी)–चांगली वाणी; चांगलें बोलणें. ४. ऐकतां; श्रवण करितां. ५. पतीवांचून. सत्यवान् जिवंत व्हावा ही गोष्ट खेरीज करून. ६. माग. ७. परत. ८. राजांमध्यें श्रेष्ठ जो द्युमत्सेन त्यास. ९. भाग्य; वैभव. १०. सहज. ११. महा (मोठें)+भाग (दैव)–मोठें आहे दैव जिचें अशी तूं. १२. पति+समागम (सहवास)–पतीबरोबर असणें. १३. सुखानें पूर्ण.

दुर्लभ[1] सत्संग[2]
दैवें प्राप्त झाला;
सत्संगानें धाला[3]
नाहीं कोण? १८१
सत्संग दीना[4] श्री[5]
वना दे वसंत,
धना[6] देव, संत
ज्ञाना देती. १८२
सत्संग दुर्लभ,
काम-प्राप्ति-हेतु[7];
सत्संग हा सेतु[8]
भवार्णवीं[9].' १८३
यम म्हणे, 'बाई!
तुझी दिव्य[10] दृष्टि
अमृताची वृष्टि
तुवां केली १८४
बोलतीस तैसें
श्रुतीनें[11] बोलावें,
ऐकतां डोलावें[12]
जडांनींही[13]. १८५
वेधील[14] **वि**धीला[15]
बाई! बोल तुझा;
पती-विना दुजा[16]
वर मागें.' १८६
पतिव्रता म्हणे
'स्वराज्या[17] आसरा
हो माझा सासरा
द्युमत्सेन. १८७

१. मिळण्यास कठिण. २. सज्जनांची संगत, साधूंबरोबर सहवास. ३. संतोषला; तृप्त झाला. ४. गरीबाला. ५. सत्संग गरीबाला श्री (लक्ष्मी) व वनाला वसंतश्री (शोभा) देतो. (का० सं०.) ६. देव धना [देती] [आणि] संत ज्ञाना [देती.] असा अन्वय. ७. काम (इच्छा)+प्राप्ति (लाभ)+हेतु (साधन)= इच्छा पूर्ण करण्याचें साधन. ८. पूल; बांध. ९. भव (संसार)+अर्णवीं (समुद्रांत)–संसाररूपी समुद्रांत. १०. सुंदर; अत्युत्तम. ११. वेदानें. १२. आनंदानें मान डोलवावी. १३. मूढांनीं देखील, अज्ञान जे लोक त्यांनींही. १४. मोह पाडील. १५. **ब्रह्म**देवाला. १६. दुसरा. १७. स्वतःच्या राज्याला आसरा (आश्रय) होऊं दे (त्याचें राज पुन्हां त्यास मिळूं दे–का० सं०).

कोणाही[1] निमित्तें[2]
स्व-धर्मातें[3] जोडूं,
सज्जनांच्या जोडूं
प्रसादातें.' १८८

धर्म म्हणे, 'दिलें.
जा बाई! आश्रमा,
त्वत्तनु[4] या श्रमा
योग्य नव्हे.' १८९

सावित्री म्हणे, 'जे
ज्ञानातें जोडिती,
न तयां[5] सोडिती[6]
तुझे पाश. १९०

नरकीं जीवास
भोगविसी ताप,
केलें असे पाप
ज्यांहीं[7] जैसें. १९१

त्वां पापी सर्वेही
निरयास[8] नेला
यातना तयाला
भोगावया. १९२

शुद्ध[9], पुरवूनि
काम, सभाजिला;
तामस भाजिला
कुंभी-पाकीं. १९३

जो द्रोहें[10] न करी
कोणाही भूताचा[11],
त्यां[12] तुझ्या दूतांचा
धाक नाहीं. १९४

१. कोणत्याही. २. कारणानें. ३. आपला जो क्षात्रधर्म त्यास. ४. त्वत् (तुझी)+तनू (शरीर)–तुझें शरीर. ५. त्यांना. ६. नुसत्या ज्ञानानें मोक्ष मिळत नाहीं. (का० सं०.) ७. ज्यांनीं. ८. नरकास. ९. शुद्ध (सत्वशील पुरुष) [जो आहे त्याचा] काम (इच्छा) पुरवूनि [त्वां–**य**मानें] सभाजिला (पूजिला) [आणि] तामस (तमोगुणी प्राणी) **कुं**भीपाकीं (**कुं**भीपाक नांवाच्या नरकांत) भाजिला–असा अन्वयार्थ. १०. वैर; द्वेष. ११. प्राण्याचा. १२. त्याला.

जो कोणी सर्वत्र
करी [1]अनुग्रहा,
त्यासी [2]अनुग्र हा
तुझा देह. १९५

[3]सर्वत्र [4]अ-द्रोह,
अनुग्रह, दान,
हें [5]त्रय [6]निधान
कल्याणाचें. १९६

संतांच्या ठायीं हें
[7]धर्म-त्रय वसे;
इतरत्र नसे
क्षण-मात्र. १९७

संतांसी जो आला
शत्रुही शरण,
तयासी मरण
न ते देती. १९८

सर्वांही संतांत
मुख्य तूं बा! [8]धर्म!
तुझें पुण्य-कर्म
काय वर्णू?' १९९

यम म्हणे, 'जशी
तान्हेल्यासी [9]सुधा,
तुझी वाणी [10]बुधा
मज तशी. २००

पती-विना [11]ईष्ट
वर माग [12]तिजा,
[13]परं [14]मागती जा
[15]श्रमी न हो.' २०१

सती म्हणे, '[16]ताता
दे [17]औरस शत
पुत्र [18]धर्म-रत
[19]वंश-कर.' २०२

१. कृपा. २. अन् (नव्हे)+उग्र (रागीट, क्रूर)–क्रूर नव्हे असा; शांत. ३. सर्व ठिकाणीं. ४. द्वेष न करणें. ५. तीन. ६. भांडार, ठेवा. ७. धर्म+त्रय=धर्मांच्या तीन गोष्टी (अद्रोह, अनुग्रह, दान). ८. हे धर्मा! हे यमा! ९.अमृत. १०.चतुर; चांगली. ११.इच्छेस येईल तो; पाहिजे तो. १२.तिसरा. १३.परंतु. १४.परत. १५.श्रम जिला झालेले आहेत अशी. १६.बापाला (अश्वपतीला). १७. लग्नाची जी बायको तिच्या पोटीं झालेले. १८.धर्मावर भक्ति आहे ज्यांची असे; धर्मशील. १९. वंश (कुल; घराणें)+कर (चालविणारे).

यम म्हणे, '[1]शुचि-
व्रतारंभ-रते!
[2]भ्राते शंभर ते
पहाशील. २०३

[3]स्व-स्थाना जा शीघ्र,
दूर तूं आलीस,
श्रमी कीं झालीस
[4]बाढ वेळ.' २०४

साध्वी म्हणे, 'आहे
[5]पति-संनिधान
अति [6]सन्निधान
सुखाचें हें. २०५

तुझा [7]उत्पादक,
[8]विश्व [9]भासविता,
देव हा [10]सविता
[11]जगदात्मा. २०६

अत्यंत [12]हित तूं
[13]सम [14]पुण्य-काम,
सत्य तुझें नाम
धर्मराज. २०७

[15]फळतो दगड
धरितां [16]विश्वास,
हें आहे [17]विश्वास
[18]अवगत. २०८

१. शुचि (पवित्र)+व्रत+आरंभ+रते=पवित्र व्रत आरंभण्याविषयीं प्रीति आहे जिची असे (का० सं०). २. भाऊ. ३. स्व(आपल्या)+स्थाना (ठिकाणीं)=आपल्या घरीं—परत. ४. पुष्कळ वेळ. ५. पति+संनिधान (जवळ असणें)=नवरा जवळ असणें. ६. सत् (चांगलें)+निधान (ठेवा). ७. उत्पन्नकर्ता (बाप). ८. जग. ९. प्रकाशविता. १०. सूर्य. ११. जगत्+आत्मा=जगाचा आत्मा. १२. कल्याणकारक. १३. सारखा; सर्वांस सारखा; निःपक्षपाती. १४ पुण्य (पवित्र)+काम (इच्छा) पवित्र आहे इच्छा ज्याची. १५. पावतो. १६. भाव; भक्ति. भाव धरला म्हणजे दगड देखील पावतो. १७. जगास. १८. माहीत, ठाऊक.

मग संतीं[१] दृढ
ठेऊनि विश्वास
सोडिला निश्वास[२]
उष्ण[३] कोणीं?' २०९

यम म्हणे, 'बाई!
धन्या तूं सु-शीला,
आलीस कुशीला[४]
जिच्या[५] तीही. २१०

दिलें त्वां सुख हें
वर्णवे दान[६] न,
वर्ण[७] वेदानन[८]
व्यालें[९] असे. २११

तुझ्या[१०] शब्दामृता
तृप्तीच्या हेतूला
प्राशून, हे तुला
कर्ण गाती. २१२

पती-विना वर
मागें चवथा, न
मागें[११] चव थान
ठेवी पानीं.' २१३

ती[१२] सती मुरली
गाय **कृष्ण-सार,**
काय कृष्णसार
यमधर्म! २१४

१. साधूंच्या ठिकाणीं. २. सुस्कारा; श्वास; उच्छ्वास. ३. उष्ण उच्छ्वास दुःख झालें म्हणजे टाकतात. दुःख कोणास झालें? म्हणजे कोणासहि दुःख झालें नाहीं असा भाव. ४. पोटीं. ५. ज्या मातेच्या. ६. देणें; त्वां सुख दिलें हें दान न वर्णवे. ७. अक्षरें; शब्द. ८. वेद+आनन (मुख). ९. प्रसवलें. वेदमुखांतूनच असे तुझ्यासारखे शब्द येतात—तुझे शब्द वेद-तुल्य आहेत असा भाव. १०. तुझ्या तृप्तीच्या हेतूला (तृप्तीला कारणीभूत होणाऱ्या, तृप्ति देणाऱ्या) शब्दामृता (शब्दरूपी अमृताला) प्राशून (पिऊन) माझे हे कर्ण गाती—असा अन्वय. तुझें अमृतासारिखें गोड भाषण ऐकून मला फार आनंद झाला हें तात्पर्य. ११. मागें (मागाहून, आणखी) चव (आशा) थानपानीं (स्तनपानीं) न (नको) ठेवीं (ठेवूं)—आणखी अधिक आशा करूं

'[1]चित्राश्वाची जाया
योग्य [2]पुत्र-शत
[3]पावो; [4]सती-व्रत
स्वस्थ राहो.' २१५

म्हणे, 'दिले पुत्र
शंभर [5]हितांचे
[6]दंभ-रहिताचे
धर्म जैसे. २१६

आतां तरी बाई!
सावित्री! [7]परतें,
[8]भूमीला भर तें,
झालें [9]शव.' २१७

साध्वी म्हणे, 'देवा!
जी [10]धर्म-संतति
इच्छिती संत, ती
धर्मासाठीं. २१८

संतांची [11]शाश्वत
[12]धर्मी चित्त-वृत्ति,
अ-धर्मी [13]प्रवृत्ति
स्वप्नीं नसे. २१९

नको. १२. ती सती मुरली **कृ**ष्णसार (**कृ**ष्णाची स्तुति) गाय, [आणि] **य**मधर्म कृष्णसार (हरिण, मृग) काय! ती **सा**वित्री **य**मधर्मांची स्तुति करीत असतां **कृ**ष्णगुण वर्णन करणाऱ्या मुरलीप्रमाणें वाटली आणि तिच्या गोड वाणीनें तो **य**मधर्म कृष्णसारा(मृगा)प्रमाणें मोहित झाल्यासारखा दिसला— असा भावार्थ. मोह पडल्यामुळेंच **सा**वित्रीनें खुबीनें मागितलेला पुढील वर **य**मानें दिला.

१ **चि**त्राश्वाची (**स**त्यवानाची) स्त्री (**सा**वित्री). २. शंभर पुत्र. ३. प्राप्त होवोत. ४. सती+व्रत सतीचें व्रत (पातिव्रत्य) स्वस्थ राहो (सुखरूप राहो; चांगलें राहो)=पातिव्रत्याला भंग न येवो. ५. कल्याण करणारे. ६. दंभ (ढोंग) +रहित (शिवाय)=ढोंगी नव्हेत असे; धर्मशील. ७. परत जा. ८. भार, ओझें. ९. प्रेत (**स**त्यवानाचें). १०. धर्मशील संतति (मुलेंबाळें). ११ निरंतर. १२. धर्माच्या ठिकाणीं. १३. ओढा; कल (मनाचा).

संतांची[1] संसार-
नदी-नौका कथा,
त्या संतांसी व्यथा[2]
कासयाची[3] ? २२०

साधुसंत **गं**गा-
यमुनांचे ओघ,
हा संगम मोघ[4]
कधीं नाहीं. २२१

संतांपासूनियां
संतां भय झालें!
असें काना आलें
नाहीं कधीं. २२२

संत चालविती
सत्यें[5] तरणीतें[6],
तपें[7] धरणीतें[8]
धरिताती[9]. २२३

किंबहुना संत
सर्वांचीही [10]गति,
संत [11]मुक्ति-पति,
संत ज्ञान. २२४

व्रत चालवी तें
एक संतराय[12],
नामें[13] अंतराय[14]
जाती दूर. २२५

१. संतांची कथा संसार+नदी+नौका [आहे]–असा अन्वय–संतांच्या गोष्टी संसाररूपी नदींतून तरून जाण्यास नौका आहेत. २. दुःख. ३. कशाची. ४. निष्फल, व्यर्थ. **गंगाय**मुनांचा ओघ ज्याप्रमाणें निष्फल होत नाहीं त्याप्रमाणें साधुसंतांचा संगम (सहवास) निष्फल होत नाहीं. ५. सत्यानें, चांगल्या वर्तनानें. ६. सूर्याला. ७. तपानें; तप करून. ८. पृथ्वीला. ९. साधूंच्या सत्य आचरणामुळें सूर्याला आकाशांत चालण्याला आधार होतो व साधूंच्या तपामुळें पृथ्वीला राहण्याला आधार होतो. १०. आश्रय, सर्वांस शरण जाण्याचें स्थान. ११. मुक्ति देणारे. १२. साधुश्रेष्ठ. १३. नांव घेतलें असतां. १४. विघ्नें; संकटें. संतांचें नांव घेतलें असतां विघ्नें दूर जातात.

[1]प्रसाद शाश्वत,
[2]अर्थ, [3]बहु-मान,
यांचें [4]मूल-स्थान
संत तुह्मी.' २२६

यम म्हणे, '[5]**वा**णी
नव्हे [6]बोलकी ती,
बाई! [7]बोल किती
तुझे वर्णूं! २२७

तुज वर्णावया
नाहीं मज शक्ति,
तुझे ठायीं भक्ति
माझी झाली. २२८

पांचवा अद्भुत
वर महा-भागे!
माग, न [8]हा भागे
वर देतां.' २२९

सावित्री म्हणे, 'बा!
देवा! वर-दान
तुझें [9]वरदा! न
व्यर्थ व्हावें. २३०

[10]स्वं-सत्य सांभाळा,
मत्पति वांचवा,
द्या वर पांचवा
हाचि मज. २३१

[11]स्वर्गीं भाग्य-सुख,
शत-पुत्र, जिणें,
नको पती-विणें
मज देवा! २३२

वांचवावा माझा
भर्ता [12]**स**त्यवंत,
देवा! [13]सत्य-वंत
त्यांही व्हावें. २३३

१. कृपा. २. द्रव्य. ३. पुष्कळ वैभव. ४. मूळ ठिकाण. ५. **स**रस्वती. ६. बोलणारी. **स**रस्वती देखील तुझ्या इतकी बोलकी (बोलण्यांत चतुर) नाहीं. ७. शब्द. ८. मी (**य**म) न भागें—मी वर देतांना थकणार नाहीं. ९. हे वर देणाऱ्या देवा! १०. स्वतःचें सत्य—आपण बोललेलें (शंभर पुत्र होतील हा वर; अभंग २१६ पहा.) खरें करा. ११. स्वर्गीचें सुख, शंभर पुत्र, जिणें (जगणें), या गोष्टी पतीशिवाय मला नको. १२. **स**त्यवान्. १३. खरें बोलणारे.

शत-पुत्र-वर
दयेनें देऊनि
पतीला घेऊनि
कसा जासी?' २३४

धर्म म्हणे, 'बाई!
प्रताप हा भला,
जिंकिलें त्वां मला
पतिव्रते! २३५

मार्कंडेया जशी
तारी शंभु-भक्ति,[1]
तशी तुझी शक्ति
सत्यवंता. २३६

बाई! म्यां तुझा हा
भर्ता केला मुक्त;[2]
याशीं तूं हो युक्त
चिर-काळ. २३७

पतीसह राज्य
चार शत वर्षें
करिशील हर्षें[3]
धर्म-न्यायें.[4] २३८

१. शंकराची भक्ति. शंकराच्या भक्तीमुळें मार्कंडेयाला जसें आयुष्य मिळालें तसें. मृकंडुऋषीच्या पुत्राचें नांव मार्कंडेय. मृकंडुऋषीस पुत्र नव्हता, म्हणून त्याचे स्त्रीनें 'तुम्ही शिव प्रसन्न करून घेऊन त्यापाशीं पुत्र मागा' असें त्यास सांगितलें. त्याप्रमाणें त्यानें पुत्र मागितला; पण शिव म्हणाला कीं, 'एक १६ वर्षें आयुष्याचा पण सुंदर शहाणा, दुसरा १०० वर्षें आयुष्याचा पण कुरूप आणि मूर्ख अशा दोन पुत्रांपैकीं जो तुला आवडेल तो तूं घे.' मृकंडूनें पहिल्या प्रकारचाच मागितल्यावरून शिवानें तो दिला. पुढें १६ वर्षें भरण्याचे सुमारास आई-बापांस फार वाईट वाटूं लागलें; तेव्हां मार्कंडेय (मृकंडुपुत्र) 'भिऊं नका, मी शिव प्रसन्न करून घेतों म्हणजे मला भय नाहीं,' असें सांगून शिवपूजेस लागला. पुढें शिव प्रसन्न होऊन त्यानें मार्कंडेयाचे अंतसमयीं आलेल्या यमास लाथ मारून पाडून मार्कंडेयाला चिरंजीव केलें. (नवनीत.)
२. मोकळा. तुझ्या नवऱ्याचा प्राण घेऊन मी चाललों होतों तो परत दिला.
३. आनंदानें. ४. धर्मानें व न्यायानें.

षड्रिपु[1] होतील
नंत[2] पतिव्रते!
न तप तीव्र तें[3]
साहतील.' २३९
ऐसें सांगोनि तो
गुप्त झाला **धर्म**.
प्रकटलें शर्म[4]
सती-मनीं.[5] २४०
आली जेथें होतें
वनीं कलेवर,[6]
मनीं[7] केले वर-[8]
चमत्कार. २४१
बैसे घेऊनि तें
शिर मांडीवर,
चिर[9] मांडी[10] वर-[11]
शुश्रूषा ती. २४२
संज्ञा[12] पावोनि तो
उघडी नयन[13]
करूनि शयन[14]
उठलासा.[15] २४३
वाटे जाऊनि तो
आला पर-देशा,[16]
सती वरदेशा[17]
मनीं वंदी. २४४
पदरें पुसूनि
मुख घाली वारा,
जपे[18] सती दारा
मातेपरी.[19] २४५

१. सहा शत्रु—काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर. २. नम्र. ३. षड्रिपु. ४. सुख; आनंद. ५. **सा**वित्रीच्या मनांत. ६. देह; शरीर (**स**त्यवानाचें). ७. मनीं केले=मनांत आणिले. ८. **य**मधर्मानें **सा**वित्रीला वर दिले ही असाधारण गोष्ट झाली. म्हणून त्यास चमत्कार म्हटलें आहे. ९. पुष्कळ वेळ. १०. करी. ११. वर (नवरा)+शुश्रूषा (सेवा)—नवऱ्याची सेवा. १२. संज्ञा पावोनि(शुद्धीवर येऊन). १३. डोळे. १४. झोंप. १५. उठल्यासारिखा. १६.पर (दुसरा)+देशा—दुसऱ्या देशाला. १७.वरद (वर देणारा)+ईशा (देवाला)—वर देणाऱ्या देवाला; **य**माला. १८. काळजी घेई. १९. आईप्रमाणें.

म्हणे, 'कांते! तुज
चिर भागविलें[1],
कां न जागविलें[2]
तुवां मज? २४६

पुरुष ओढीत
होता मज श्याम[3].
तो कोठें? तन्नाम[4]
काय? सांग. २४७

पाहिला स्वप्नीं, कीं
सत्य तो देखिला?
म्यां मनीं लेखिला[5]
सत्य काळ.' २४८

सावित्री म्हणे, 'तो
पाप-पुण्य-कर्म-[6]
फळ-दाता धर्म-
राज देव २४९

गेला स्व-स्थानाला.
आह्मी जाऊं चला,
तुह्मी न उचला
भार[7] कांहीं. २५०

रात्र झाली, गुरु[8]
चिंतेला[9] वहात,
वाटेला पहात
असतील.' २५१

'निजलों त्वदंकीं[10]
बहु घोरत मी,
तैं[11]सा घोर[12] तमीं[13]
देखिला तो. २५२

स्वप्न कीं सत्य हें
कसें काय सांग?
आठवितां अंग
थरारतें.' २५३

साध्वी म्हणे, 'तुह्मीं
न धरावी व्यथा,
सांगेन हे कथा
उद्यां सारी.' २५४

१. श्रमविलें; त्रास दिला. २. उठविलें. ३. काळा. ४. तत् (त्याचें)+नाम—त्याचें नांव. ५. मानिला. ६. पापपुण्यकर्मांचें फल देणारा. ७. ओझें. ८. वडील माणसें. ९. चिंतेला वहात=काळजी करीत असतील. १०. त्वत् (तुझ्या)+अंकीं (मांडीवर), तुझ्या मांडीवर. ११. तेव्हां. १२. भयंकर; उग्र. १३. अंधकारांत.

सत्यवंत म्हणे,
'अंधकार दाट,
वनीं कशी वाट
सांपडेल?' २५५
सती म्हणे, '[1]शुष्क
[2]वृक्षीं तो [3]दहन
दिसतो, [4]गहन
[5]प्रकाशी तो. २५६
[6]उपाय दिसाया
वाट भली तमीं,
चला, [7]अलात मी
हातीं घेत्यें. २५७
अथवा नसेल
शक्ति, तरी राहूं,
प्रातःकाळीं पाहूं
गुरूप्रति.' २५८

सत्यवंत म्हणे,
'वृद्ध माय-बाप
पावतील ताप
वियोगानें, २५९
वडींत [8]शतदां
मज स्मरतील,
शोकें मरतील
[9]निःसंदेह. २६०
मी शोकें हा प्राण
सोडीन हें जाण;
सत्य तुझी आण
वहातसें.' २६१
ऐसें म्हणोनि तो
पितृ-भक्त रडे,
सत्यवंत पडे
स्त्रीच्या गळां. २६२

१. वाळलेल्या. २. झाडांत. ३. अग्नि. ४. अरण्य. ५. प्रकाशित करतो. ६. तमीं (अंधारांत) भली (चांगली) वाट दिसाया उपाय (साधन) [तो दहन—अग्नि आहे]. ह्या अग्नीच्या योगानें, कोलिताच्या साहाय्यानें, आपल्यास अंधेरांतून वाट दिसेल (का० सं०). ७. कोलित. ८. शंभर वेळां. ९. निःसंशय; खात्रीनें.

सावित्री म्हणे, 'म्यां
स्व-धर्म जोडिला[1],
असेल सोडिला
दुष्ट-मार्ग, २६३

तरी यांसी त्यांसी[2]
सुखें भेटी घडो;
संकट न पडो
कोणा कांहीं.' २६४

सत्यवंत म्हणे,
'कसें तरी करीं
सावित्री! उद्धरीं[3]
दुःखांतूनि.' २६५

उठोनि प्रथम
स्व-केश सांवरी
सावित्री, त्यावरी[4]
सत्यवंता. २६६

चित्राश्व तो तिच्या
बळें[5] उभा राहे;
पात्राकडे पाहे
फळांच्या तो. २६७

सती म्हणे, 'येन्हां
वृक्षीं[6] राहो पात्र,
परशु हा मात्र
मीच घेत्यें.' २६८

जेणें[7] सर्प शुंडा-
कार तो तोडावा,
पतीचा तो डावा
रम्य बाहु २६९

वाहे वाम-स्कंधीं
आपुल्या ती सती,
स्व-दक्षानें[8] पति
आलिंगूनि. २७०

१. जर जोडला असेल. २. आईबापांची. ३. काढीं. ४. त्यानंतर **स**त्यवानाला सांवरून धरी. ५. साहाय्यानें. ६. झाडावर; वृक्षावर. ७. जेणें (ज्या हातानें) तो शुंडाकार (शुंड+आकार=हत्तीच्या सोंडेसारिखा लठ्ठ) सर्प तोडावा (धरून मारावा) तो पतीचा डावा रम्य बाहु ती सती आपल्या वामस्कंधीं (डाव्या खांद्यावर) वाहे (ठेवी, घेई)–असा अन्वय. ८. स्व (आपल्या) दक्षानें (उजव्या हातानें).

निघाली तों[1] वनीं
चंद्रिका[2] दिवटी[3]
होऊनि, निवटी[4]
अंधकारा. २७१

ऐरीकडे[5] आली
द्युमत्सेना दृष्टि,
दिसे सर्व सृष्टि[6]
यथा-पूर्व[7]. २७२

गेलें अंधपण,
नुमजला[8] तो हें,
झाला पुत्र-मोहें
पुन्हा अंध[9]. २७३

भार्येसह नृपें
सर्वांही ऋषींतें
पुशिलें, ऋषि तें
जसें पाणी[10]. २७४

शोधूनि स-स्त्रीक[11]
भूप तो रडला,
मूर्च्छित पडला
पुत्र-शोकें. २७५

करिती विलाप[12]
जेव्हां ते दंपती[13],
समाधि संपती[14]
ब्राह्मणांचे. २७६

१. तेव्हां, तितक्यांत. २. चांदणें. ३. मशाल. ४. घालवी; नाश करी. ५. इकडे. ६. जग; सृष्टींतील सर्व वस्तु. ७. पूर्वींप्रमाणें. ८. नुमजला (न+उमजला). आपलें अंधपण एकाएकीं कसें नाहींसें झालें हें तो द्युमत्सेन समजला नाहीं—असा भाव. ९. पुत्राच्या काळजीमुळें तो इतका दुःखी झाला कीं त्याला पुनः दिसेनासें झालें—असा भाव. १०. आपल्यास जें दिसतें त्याचेंच प्रतिबिंब जसें पाण्यांत दिसतें, जास्त कांहीं दिसत नाहीं, त्याप्रमाणें ते ऋषि जें विचारावें तेंच विचारीत. सारांश राजास त्यांनीं कांहीं बातमी दिली नाहीं. (का० सं०). ११. बायकोसह. १२. दुःख. १३. नवराबायको (द्युमत्सेन व त्याची बायको). १४. ब्राह्मणांचे (ब्राह्मणांच्या) समाधि (ध्यान लावून बसणें) संपती (संपल्या)—सत्यवानाच्या आईबापांनीं इतका विलाप केला कीं तो ऐकून ब्राह्मण समाधि संपवून उठले आणि द्युमत्सेनाकडे दुःख निवारण्याकरितां आले.

मिळाले[1], पावोनि
ताप स-खेद हा,
तापस खेद हा
निवाराया. २७७

स्त्री-सह तो राजा
आश्रमांत नेला,
त्यांहीं बोध केला
परोपरी[2]. २७८

सुवर्चा, **गौ**तम,
दालभ्य, मुनिराज[3]
धौम्य, **भ**रद्वाज,
आपस्तंब २७९

ह्मणती, 'संताप[4]
हा जाईल क्षणें[5],
उत्तम लक्षणें[6]
सावित्रीचीं. २८०

सुचविते दृष्टि[7]
लाभ, महोदया;
ऐका अहो! दया
देवाची हे. २८१

धरीं ब्राह्मणांच्या
वचनीं विश्वास;
बा! उष्ण निश्वास
सोडूं नको.' २८२

ऐसें जों बोले ती
मंडळी, मावली[8]
तों साध्वी पावली[9]
पती-सह. २८३

भूपाहूनि बहु
ब्राह्मण हर्षले,
मेघसे[10] वर्षले
आशीर्वादें. २८४

१. ताप पावोनि (पुत्राची काळजी लागली म्हणून) हा (**द्यु**मत्सेन) सखेद (दुःखी) [झाला, म्हणून] तापस (ऋषिजन) हा खेद निवाराया मिळाले (जमले). २. नानाप्रकारांनीं. ३. मुनिश्रेष्ठ. ४. दुःख; मोठा ताप; काळजी. ५. क्षणानें; क्षणांत; लवकरच. ६. **सा**वित्रीचीं लक्षणें उत्तम आहेत; **सा**वित्री दैववान् आहे. ७. तुम्हाला दृष्टि आली यामुळें तुम्हाला लाभ व महोदय (महा+उदय= मोठें भाग्य) प्राप्त होणार असें दिसतें. ८. माउली; आईसारखी चांगली स्त्री. ९. येऊन पोंचली. १०. मेघाप्रमाणें.

राजासीं ह्मणती,
'आलें कीं [1]प्रत्यया?
[2]बोलतो सत्य या
मुखें वेद.' २८५
[3]पुसती, 'वत्सा! कां
[4]विलंब लागला?
[5]नृपाळ भागला
चिंता-भारें.' २८६
शिरीं [6]बाधा झाली
फोडितां लांकडें,
[7]निजलों, सां[8]कडें
पडलें हें. २८७
नाहीं जागविलें
[9]ईणें, घोर तमीं
सुखें घोरत मी
निजलोंच.' २८८
गौतम म्हणे, 'बा!
बोलिलासी खरें,
परी [10]तत्व बरें
[11]नेणसी तूं. २८९
[12]अकस्मात् दृष्टीचा
[13]लाभ असा अंधा
राया [14]सत्य-संधा
द्युमत्सेना! २९०
[15]**सा**वित्री बाई! तूं
सांग सर्व वृत्त,
समस्तांचें चित्त
तृप्त करीं.' २९१

१. अनुभवास. खरें झालें कीं नाहीं? २. वेद या मुखें (आम्हा ब्राह्मणांच्या मुखानें) सत्य बोलतो=ब्राह्मण सांगतात तें खरें होतें. ३. याचा कर्ता 'ऋषि-जन' अध्याहृत. ४ उशीर; वेळ. ५. राजा (द्युमत्सेन). ६. दुःख; वेदना. ७. याचा कर्ता 'मी—**स**त्यवान्' अध्याहृत. ८. संकट. ९. **सा**वित्रीनें. १०. खरी गोष्ट; वस्तुस्थिति. ११. जाणत नाहींस. १२. एकाएकीं. १३. याचें क्रियापद 'झाला' अध्याहृत. १४. सत्य+संधा (प्रतिज्ञा)—खरें बोलणारा, त्याला. १५. या अभंगाचा पहिला चरण मात्र काव्यसंग्रहांत छापिला आहे. मूळ प्रतींतच बाकीचे तीन चरण नसल्यामुळें हा अभंग अपूर्ण राहिला आहे असें वाटतें. म्हणून नवीन तयार केलेले तीन चरण येथें देऊन हा अभंग पुरा केला आहे.

ती सती तें सर्व
वृत्त आयकवी,
तेव्हां [1]काय कवि
विसरले. २९२

करिती ते [2]बंदी-
सम [2]स्तव मुनि,
समस्त [3]वमूनि
[4]मान-विष; २९३

'अश्वपति-कन्या
सावित्री हे धन्या,
अशी नाहीं अन्या
पतिव्रता. २९४

सावित्रीनें दोनीं
कुळें उद्धरिलीं,
कीर्तीनें हरिलीं
पाप-दुःखें'. २९५

स्तवूनि, पुसोनि,
मनांत [5]नमूनि
[6]सनातन मुनि
स्थळा गेले. २९६

प्रातःकाळीं प्रजा
येऊनि [7]प्रणति
करूनि म्हणती
[8]द्युमत्सेना, २९७

'तुमच्या प्रधानें
मारिला [9]अराति;
[10]सं-नाथा करा ती
राजधानी; २९८

न्यायवयासी आलें
[11]चतुरंग सैन्य;
[12]शत्रु-पक्षीं [13]दैन्य-
दुःख गेलें.' २९९

१. शरीर. तेव्हां कवि देहभाने विसरले. २. भाटाप्रमाणें स्तुतिपाठकाप्रमाणें; स्तव=स्तुति. ३. ओकून; टाकून. अहंकाररूपी विष ओकून; निरभिमानपणानें (का०सं०). ४. अहंकाररूपी विष. ५. **सा**वित्री लहान तेव्हां ते ऋषि सर्वांदेखत तिला कसा नमस्कार करितील? म्हणून त्यांनीं (ऋषींनीं) तिला मनांत नमस्कार केला. ६. पुरातन; प्राचीन. ७. नमस्कार. ८. द्युमत्सेनाला. ९. शत्रु. १०. जिला नाथ (स्वामी) आहे अशी करा. ११. हत्ती, घोडे, पायदळ व रथ हीं आहेत चार अंगें ज्याचीं असें (सैन्य). १२. शत्रूकडे. १३. दैन्य (दारिद्य)+ दुःख—हीं शत्रुपक्षाकडे गेलीं. शत्रूकडील मंडळी दुःखी व दीन झाली.

गौतमादि सर्व
तपोधन वंदी,[1]
प्रेमें होय बंदी[2]
द्युमत्सेन. ३००

करी मुक्त-करी-[3]
सम स्तवनातें,
समस्त वनातें
प्रदक्षिणा. ३०१

बैसे राज-पदीं,
होय पूर्ण-काम,[4]
तो जसा श्री-राम
अयोध्येंत. ३०२

सावित्रीची कथा
सज्जनांसी तशी,
मयूरास[5] जशी
मेघमाला. ३०३

सावित्रीच्या कथा
गातील ज्या स्त्रिया,
होतील त्या प्रिया
बहु मान्या. ३०४

'सावित्री' 'सावित्री'
असें जे म्हणती,
कल्याणा गणती
नाहीं त्यांच्या. ३०५

१. नमस्कार करी. याचा कर्ता 'द्युमत्सेन.' २. भाट; स्तुति करणारा; स्तुतिपाठक. ३. मुक्त (मोकळा केलेला)+करि (हत्ती)+सम (सारखा)= गजेंद्राप्रमाणें. सुसरीनें पाय धरिला होता त्या संकटांतून सुटल्यानंतर गजेंद्रानें जशी विष्णूची स्तुति केली त्याप्रमाणें. हाहा आणि हूहू असे दोन गंधर्व होते. देवल ऋषीच्या शापानें त्यांतील एक गंधर्व गज (गजेन्द्र नांवाचा) होऊन त्रिकुटपर्वतावर भटकूं लागला व दुसरा तेथेंच नक्र झाला. गजेन्द्र पाणी पिण्यास सरोवरांत उतरला तेव्हां नक्रानें त्याला पकडलें. नंतर गजेन्द्रानें विष्णूचा धांवा केला, तेव्हां त्यानें नक्रास मारून गजेन्द्रास मुक्त केलें. पुढें ते दोघेही शापमुक्त होऊन गंधर्वपद पावले. (का० सं०). ४. इच्छा पूर्ण झाली आहे ज्याची असा. ५. मोराला. मोराला मेघमाला (ढग) पाहून मोठा आनंद वाटतो. पृष्ठ २२ टीप ९ पहा.

सावित्री-स्मरण,
सावित्री-पूजन,
सावित्री-कीर्तन
सत्य-सार. ३०६

पतिव्रता तरे,
पतिव्रता तारी,
पतिव्रता नारी
[१]जगदंबा. ३०७

सावित्री-गीत
समाप्त.

१. पतिव्रता [स्वतः] तरे, पतिव्रता [दुसऱ्यांना] तारी, [म्हणून] पतिव्रता नारी (स्त्री) **ज**गदंबा (जगाची माता) [मानिली जाते].

श्रीराम.

महाराष्ट्र-कवि-वर्य-मोरोपंत-कृत

सीता-गीत.

(अभंग[1].)

यज्ञासाठीं भूमि
नांगरितां धन्या[2]
सांपडली कन्या
सीता[3] देवी. १

जनकाची पुत्री[4]
दुर्जना[5] दुर्मिळा[6],
ती भार्या[7] ऊर्मिळा,
लक्ष्मणाची. २

जनकाचा बंधु[8]
होता एक-निष्ठ[9],
वयानें [10]कनिष्ठ,
श्रेष्ठ गुणें. ३

तेणें[11] भरतासी
मांडवी दुहिता[12]
दिली, जी [13]सु-हिता
दोहीं[14] कुळीं. ४

---

१. पृष्ठ १, टीप १ पहा. २. धन्य=दैववान्; भाग्यशाली. धन्या=धन्य जो त्यास (जनकराजास.) ३. यज्ञाकरितां भूमि नांगरीत असतां जनकराजाला एक मुलगी पेटींत सांपडली. नांगरतांना शेतांत जमिनीला जी रेषा (जीस मराठींत तास म्हणतात) पडते, त्या रेषेस 'सीता' असा संस्कृतांत शब्द आहे. सीतेंत सांपडली ह्मणून जनकराजानें मुलीचें नांव 'सीता' असें ठेविलें. ४. मुलगी. ५. वाईट लोकांस. ६. मिळण्यास कठिण; दुष्ट लोकांस अलभ्य (काव्यसंग्रह.) ७. बायको. ८. जनकराजाला एक भाऊ होता; त्याचें नांव कुशध्वज होतें. ९. [जनकावर] अत्यंत प्रेम करणारा. १०. लहान. ११. कुशध्वजानें. १२. मुलगी. १३. चांगलें हित करणारी; कल्याणकारक. १४. सासर व माहेर या दोन्हीं कुळांमध्यें.

शत्रुघ्नाला दिली
[1]दुजी **श्रु**तकीर्ति,
जिची गाती कीर्ति
पतिव्रता. ५
[2]चवघी बहिणी
[3]भाग्यें झाल्या जावा;
त्यांचा [4]गीतीं गावा
[5]सु-संवाद. ६
[6]वनवास-वृत्त
सीतेसी पुसती
प्रेमें त्या [7]सु-सती
तिघीजणी. ७
सीता म्हणे—"ऐका
[6]वन-वास-कथा;
[8]परी मनीं [9]व्यथा
न धरावी. ८
चि[10]त्रकूटाहूनि
पादुका घेऊनि
वियोग[11] देऊनि
तुम्ही आलां. ९

१. दुसरी. २. **सी**ता, **उ**र्मिळा, **मां**डवी, आणि **श्रु**तकीर्ति या चवघी बहिणी. ३. भाग्यानें; सुदैवानें. ४. गीतांत; गाण्यांत. ५. सु (चांगलें)+संवाद (बोलणें; भाषण)=चांगलें भाषण. ६. वनवासाची हकीकत. ७. सु (चांगल्या)+सती (बायका)=चांगल्या बायका. ८. पण; परंतु. ९. दुःख; वाईट वाटणें. पूर्वीं घडलेल्या दुःखाची हकीकत मी सांगणार आहें त्याबद्दल आतां मनाला उगीच वाईट वाटूं देऊं नका म्हणून **सी**ता येथें आपल्या लहान वहिणींना सूचना करीत आहे. १०. **चि**त्रकूट हा पर्वत **प्र**यागापासून दहा कोसांवर आहे. या पर्वतावर **रा**म, **ल**क्ष्मण, व **सी**ता हीं वनवासास जाण्यापूर्वीं एका पर्णकुटीमध्यें कांहीं दिवस राहिलीं होतीं. येथें (**चि**त्रकूटावर) **भ**रत, **श**त्रुघ्न, त्यांच्या बायका व माता आणि सर्व नगरवासीजन **रा**माला परत आणावयाच्या हेतूनें गेले होते; परंतु **रा**मानें परत न जातां **भ**रताला आपल्या पादुका दिल्या व त्या सर्वांना **अ**योध्येस परत पाठविलें. ११. **भ**रत वगैरे गेल्याचें दुःख.

आम्हीही तेथूनि
तशींच निघालों,
वनांत रिघालों[1]
तिघेंजणें. १०

लक्ष्मण भावोजी
मागें,[2] पुढें स्वामी,
मज आहें धामीं[3]
ऐसें वाटे. ११

न बाधेचि मज
ऊष्ण,[4] क्षुधा,[5] तृषा;[6]
तुम्हांपाशीं मृषा[7]
न बोलावें. १२

जेव्हां कांहीं वाटे[8]
चालतां मी भागें,[9]
मुरडोनि[10] मागें
विलोकिती.[11] १३

बाई! काय सांगों
स्वामींची[12] ती दृष्टि![13]
अमृताची वृष्टि[14]
मज होय. १४

अत्रीच्या आश्रमीं
नेलें मज वाटें;[15]
माहेरचि वाटे[16]
खरेंखुरें. १५

अनुसूया[17] सती
करी वेणीफणी,
आनंदाची धणी[18]
दिली मज. १६

१. शिरलों. २. लक्ष्मण मागें, त्याच्यापुढें **सी**ता व तिच्यापुढें **रा**म अशा क्रमानें तिघेंजण चालत असत. ३. घरीं. ४. ऊन. ५. भूक. ६. तहान. ७. खोटें. ८. [**रा**माला] मनांत वाटे. ९. थकून जाई. १०. मागें मान करून. ११. [**रा**म] पहात असत. १२. पतीची; **रा**माची. १३. पहाणें. १४. वर्षाव; पाऊस. १५. वाटेनें; मार्गानें. १६. मनांत वाटे. १७. **अ**नुसूयेला, **अ**नसूया असेंही म्हणतात. **अ**नुसूया ही **अ**त्रिऋषीची स्त्री होती. ही मोठी पतिव्रता व तपस्विनी होती. १८. लाभ; तृप्ति.

आजवरी ओली
चंदनाची उटी,
आली नाहीं तुटी
[1]माळा-गुणीं. १७
ऋषींतें [2]वंदीत
गेलों **गो**दा[3]-तटीं,
जेथें [4]**पं**चवटी
[5]पुण्य-स्थान. १८
भावोजींनीं केली
माझी बहु सेवा,
ती त्या **म**हादेवा
ठावी असे. १९
तेथें [6]**शू**र्पणखी
भार्या व्हाया आली.
तिला माझी भ्याली
चित्त[7]वृत्ति. २०
भावोजींनीं तिचा
[8]कर्ण-नासा-छेद
केला, [9]कीं ते [10]वेद-
शास्त्रार्थ-ज्ञ. २१

१. माळा+गुणीं (माळेच्या गुणांमध्यें) तुटी (तूट, कमीपणा) आली नाहीं. **अ**नुसूयेनें **सी**तेला सदा शीतल राहणारी चंदनाची उटी व कधीं न सुकणारी पुष्पमाला ह्या दोन वस्तु दिल्या होत्या. (का. सं.) चौदा वर्षांपूर्वी **अ**नुसूयेनें लाविलेली चंदनाची उटी व दिलेली पुष्पमाला हीं अद्यापपर्यंत जशींच्या तशींच आहेत–असा भाव. २. [मार्गांतील अनेक ऋषींची] पूजा करीत, नमस्कार करीत. ३. **गो**दानदीचे तीरीं. ४. पंच (पांच)+वट (वडाचा वृक्ष.) पांच मोठीं वडाचीं झाडें एके ठिकाणीं होतीं म्हणून त्यावरून या स्थळाला **पं**चवटी असें नांव पडलें. **पं**चवटी हें स्थळ **ना**शिकाजवळ **गो**दावरीचे कांठीं उत्तरेस आहे. ५. पुण्यकारक ठिकाण. ६. **शू**र्पणखी नांवाची **रा**वणाची बहीण. शूर्प (सूप)+णख (नख)=सूपासारखीं नखें आहेत जिचीं अशी. ७. मन. ८. कान व नाक कापणें. ९. कारण. १०. वेद आणि शास्त्र यांचा अर्थ जाणणारे. **शू**र्पणखा ही स्त्री असून हिच्यावर शस्त्र शूर पुरुषानें कसें धरिलें अशी शंका येईल म्हणून मुद्दाम ‘वेदशास्त्रार्थज्ञ’ हें

तिचा भाऊ खर
होऊनियां [1]क्रुद्ध
करावया युद्ध
आला बाई! २२

चवदा सहस्र
राक्षस [2]पापिष्ठ
रणीं केले [3]पिष्ट
स्वामींनीं ते. २३

[4]तिणें [5]घ्राण-रक्तें
मुख मळविलें,
वृत्त कळविलें
रावणाशी. २४

छळाचा उपाय
मनीं आठविला,
[6]दुष्टें पाठविला
[7]माया-मृग. २५

[8]स्वर्ण-रत्न-मय
मृग म्यां देखिला,
तो [9]सत्य [10]लेखिला
मनामध्यें. २६

[11]गृहा आणावया
[12]मागें हरिणा मी,
दुःख [13]परिणामीं
[14]नेणोनियां. २७

मज रक्षावया
लक्ष्मणा ठेवूनि
[15]निघाले घेऊनि
[16]धनुर्बाण. २८

विशेषण कवीनें लक्ष्मणाला दिलें आहे असें दिसतें. पापी स्त्रीला शिक्षा करावी अशी वेदशास्त्रांची आज्ञा आहे.

१. रागावलेला. २. पापी; दुष्ट. ३. पीठ; चूर. ४. शूर्पणखेनें. ५. घ्राण (नाक)+रक्तें (रक्तानें)=नाकाच्या रक्तानें. ६. रावणानें. ७. कपटानें झालेला हरिण. रावणानें आपला भाचा जो मारीच-राक्षस त्याला मायावी मृगाच्या रूपानें पाठविला होता. ८. सोनें व रत्नें यांचा. ९. खरा. १०. मानिला. ११. घरीं. १२. मागितला. १३. अंतीं; शेवटीं. १४. न जाणून. १५. [राम] निघाले; गेले. १६. धनुष्य आणि बाण.

माया-मृगामागें
[1]जगदेक-शूर
गेले बहु दूर
अरण्यांत. २९

कपटी [2]राक्षस
जाणोनियां, प्राण
घ्यावयासी बाण
[3]मोकलिला. ३०

तो बाण लागतां
हृदय [4]विदारी,
[5]दुष्ट हांक मारी
[6]स्वामी-वाणी. ३१

'हा **सी**ते! हा बंधो!
लक्ष्मणा! ये धांवें,
[7]अंत-काळीं [8]पावें
भेटावया.' ३२

मज वाटे माझ्या
स्वामींचीच हांक,
शिरे [9]कंप [10]धांक
हृदयांत. ३३

मी म्हणे, 'भावोजी!
धांवा, रक्षा प्राण,
हे घ्या [11]चांप-बाण,
उठा [12]वेगीं.' ३४

भावोजी म्हणती,
'राक्षसाची माया;
कोण **राम**-राया
पाहों शके?' ३५


[13]वाटलें, तें वाक्य
सत्य, परी खोटें;
झालें दुःख मोठें
माझ्या मनीं. ३६

१. जगत्+एक+शूर=जगतामध्यें अद्वितीय शूर (नवनीत). २. **मा**रीचराक्षस. ३. [**रा**मानें] फेंकिला; सोडिला. ४. फोडून जाई. ५. **मा**रीचराक्षस. ६. **रा**मासारखी. ७. मरणसमयीं. ८. यावें. ९. कंप शिरे–कांपरें भरलें; कांपावयास लागलें. १०. धडधड; भीति. ११. चाप=धनुष्य. १२. लवकर. १३. तें वाक्य सत्य [होतें] परी (परंतु) खोटें वाटलें–असा अन्वय.



कपटी राक्षस । जाणोनियां, प्राण । घ्यावयासी बाण । मोकलिला ॥

सीतागीत, अभंग ३०.



कपटी राक्षस । जाणोनियां, प्राण । घ्यावयासी बाण । मोकलिला ॥

सीतागीत, अभंग ३०.

न [1]वदावें तेंचि
बोलिल्यें मी [2]कोपें,
चित्त [3]शब्दरोपें
  [4]विदारिलें. ३७

'[5]वांछितोसी दुष्टा!
[6]अग्र-जाचा [7]घात,
माझ्या आंगा हात
  लावावया. ३८

हात लावितांचि
सोडीन मी प्राण,
[8]शिरीं [9]पाद-त्राण
  कोण [10]वाहे? ३९

माझ्या दृष्टीपुढें
नको राहों, [11]जांच,
नरकींचा [12]जोंच
  '[13]मूर्त तूंचि.' ४०

ऐशी बाई! माझी
ऐकतांचि वाणी
डोळां आलें पाणी
  भावोजींच्या. ४१

मातेनें [14]दांपितां
[15]वत्स पित्याकडे
जाय तैसें धडे
  लक्ष्मणासी. ४२

साधूसी गांजितां
झालें [16]सद्या फळ.
सज्जनाचा छळ
  करूं नये. ४३

---

१. बोलावें. २. रागानें. ३. शब्दरूप बाणानें (नवनीत.) ४. विद्ध केलें (दुखविलें.) ५. इच्छा करितोस. ६. वडील भावाचा. अग्र (अगोदर)+ज (जन्मलेला)=अगोदर जन्मलेला ह्मणजे वडील भाऊ. ७. नाश; मरण. ८. डोक्यावर. ९. पाद (पाय)+त्राण (रक्षण करणारा)=जोडा; पायांतील जोडा. पायांतील जोडा पायांतच ठेविला पाहिजे, त्याला डोक्यावर कोण घेईल? १०. ठेवील; घेईल. ११. निघून चालता हो (का० सं०) १२. छळ; गांजणूक. १३. मूर्तिमंत. १४. दटाविलें असतां; रागें भरल्यावर. १५. मूल. १६. तत्काल; लागलींच.

वाटेंत [1]धनुष्यें
ओढोनियां रेघ
गेले [2]दया-मेघ
स्वामींकडे. ४४

[3]तों आला रावण
होवोनि संन्यासी,
न कळे [4]अन्यासी
[5]छद्म त्याचें. ४५

भिक्षा द्याया गेल्यें
रेघेच्या बाहेर
[6]सासूर [7]माहेर
बुडवाया. ४६

न [8]लंघितें जरी
धनुष्याची [9]रेखा,
तरी [10]त्यांचा [11]लेखीं
काय होता? ४७

रेघेच्या बाहेरी
जसा दिला पाय,
झाला [12]महा-काय
[13]दश-मुख. ४८

जसा हरिणीतें
[14]हरितो लांडगा,
तसा तो दांडगा
[15]हरी [16]मातें. ४९

त्या पाप्याच्या स्पर्शें
देह हा [17]कोमेला,
आकाशीं [18]तो [19]मेलीं
रथीं चढे. ५०

१. धनुष्यानें. २. दयेचा मेघ=दयेची वृष्टि करणारा; दयावान् (**लक्ष्मण.**) ३. तितक्यांत; त्याच वेळीं. ४. दुसऱ्यास. ५. कपट. ६. सासर. ७. माईहर—माहेर; आईचें घर. (का. सं.) ८. ओलांडितें; ओलांडून जातें. ९. रेघ. १०. **रा**वणाचा. ११. पाड. १२ महा (मोठें)+काय (शरीर)=मोठें आहे शरीर ज्याचें असा. १३. दहा तोंडांचा (**रा**वण.) १४. हरण करितो; घेऊन जातो. १५. घेऊन गेला. १६. मला. १७. कोमेजून गेला; सुकला. १८. **रा**वण. १९. दुष्ट. ही बायकांची शिवी आहे.

'हा राम! लक्ष्मण!'
ऐशी हांक मोंजी[1]
[2]जटायु मामाजी
आयकती. ५१

सखे दशरथ-
मामाजींचे आप्त[3]
सोडवाया प्राप्त
झालें दैवें. ५२

जातीचे ते गृध्र
वृद्ध मोठे शूर,
रथ केला चूर
रावणाचा. ५३

[4]चंचु-नखायुध
गृध्र युद्ध[5]-दक्ष
रावणाचें वक्ष[6]
विदारिती[7]. ५४

[8]अन्यायें रावण
[9]छेदी त्यांचे पंक्ष[10];
मज वाटे लक्ष[11]-
बंधु-घात. ५५

मूर्छित मामाजी
पडले भूंवरी[12],
[13]स्कंधीं वाहे[14] [15]अरि
मला बाई! ५६

रडतां काढिले
पांच सात नग[16],
[17]वस्त्र-खंडीं मग
बांधिले म्यां. ५७

१. माझी. २. जटायु हा गृध्र (गिधाड) पक्षांचा राजा होता. जटायु हा दशरथाचा मित्र होता. म्हणून सीतेनें त्यास 'मामाजी' म्हटलें आहे. ३. स्नेही, मित्र. ४. चोंच व नखें हीं आहेत आयुधें ज्याचीं असा (नवनीत.) ५. युद्धामध्यें निपुण, हुशार. ६. ऊर. ७. फोडिते झाले. ८. अन्यायानें. ९. छेदिता झाला; तोडी. १०. पंख. ११. लक्ष (लाख)+ बंधु (बांधव)+घात (हानि)=लाख बांधव मारिले गेले असें मला वाटलें. १२. जमिनीवर. १३. खांद्यावर. १४. घेऊन जाई. १५. शत्रु (रावण.) १६. दागिने. १७. वस्त्र (वस्त्राच्या)+खंडीं (तुकड्यांत)=चिंधींत.

[1]पर्वतीं वानर
देखिले म्यां मग,
त्यांमध्यें ते नग
सोडियेले. ५८

[2]शत-गांवें [3]सिंधु,
त्यांत एक लंका,
तेथें [4]ने [5]कलंका
लावावया. ५९

नेऊनियां ठेवी
[6]अशोक-वनांत,
न शोक मनांत
[7]मांये माझ्या. ६०

सहस्र राक्षसी
करिती रक्षण,
[8]चिंता-तीर [9]क्षण
[10]नं सांपडे. ६१

[11]दिव्यान्नाचा ज्यांत
नानापरी थाट,
धाडी नित्य ताट
[12]शक्र-भार्या. ६२

दिव्यान्नाचें ताट
ये मज जवळ,
भक्षी मी [13]केवळ
एक दोन. ६३

१. **ऋ**ष्यमूक पर्वतावर. **तुं**गभद्रा नदीच्या कांठीं **वि**जयानांवाच्या नगरासमीप हा पर्वत आहे (का० सं०) २. शत (शंभर)+गांव (योजन)=१०० योजनें (चारशें कोस.)एक योजन=चार कोस. ३. समुद्र. ४. नेलें; [**रा**वणानें] नेलें. ५. डाग; दोष. ६. **अ**शोक नांवाचें वन. ७. मावे. ८. चिंता (काळजी)+तीर (शेवट)=काळजीचा शेवट. ९. एक क्षणभर देखील. १०. न सांपडे=सांपडला नाहीं. एक क्षणभर सुद्धां चिंताशून्य अशी मी नव्हतें. (का० सं०) मी नेहमीं काळजींत होतें—असा भाव. ११. दिव्य (स्वर्गातील; उत्तम)+अन्नाचा=उत्तम अन्नाचा. १२. **श**क्र (इंद्र)+भार्या (बायको) =इंद्राची बायको; इंद्राणी. १३. घास.

फिरले घेऊनि
मारीचाचे प्राण
दिव्य[१]-धनुर्बाण-
पाणी मागें[२]. ६४

मार्गीं[३] लक्ष्मणजी
करिती वंदन[४]
श्री-रघु-नंदन-
चरणांतें. ६५

म्हणती[५], 'वत्सा ! त्वां
कां आज्ञा मोडिली ?
एकली सोडिली
कां ती[६] वनीं ?' ६६

भावोजींनीं सर्व
वृत्त कळविलें,
मुख मळविलें
अश्रु-पातें[७]. ६७

ऐकोनि बोलिले
स्वामी, 'झालें खोटें[८],
राक्षसांनीं मोठें
विघ्न केलें.' ६८

दोघांच्या[९] हृदयीं
धडधड करी,
आले झडकरी
धांवोनियां. ६९

पर्ण-शाळेमध्यें
देखिले कांवळे[१०],
स्वामींचा मावळे
धैर्य-सूर्य[११]. ७०

१. दिव्य (उत्तम)+धनुः (धनुष्य)+बाण+पाणी (हात)=दिव्य धनुष्य आणि बाण ज्यांच्या हातांत आहेत असे (रामचंद्र.) हा शब्द 'फिरले' या क्रियापदाचा कर्ता आहे. २. परत [फिरले.] ३. रस्त्यांत. ४. नमस्कार. ५. याचा कर्त्ता 'श्रीरामचंद्र' अध्याहृत. ६. सीता. ७. डोळ्यांतील आसवांनीं. अश्रुपात= अश्रूंचें पडणें किंवा गळणें. अश्रूंनीं लक्ष्मणाचें मुख मळून गेलें. सर्व तोंड आसवांनीं भरलें. (का० सं०) ८. वाईट. ९. रामलक्ष्मणांच्या. १०. निर्जनस्थळीं कावळ्यांची वसति असते. पर्णकुटीमध्यें कावळे पाहिल्याबरोबरच आंत सीता नाहीं असें त्या उभयतांस कळलें. (का० सं०) ११. धैर्यरूपी सूर्य. रामाचा धैर्यरूपी सूर्य मावळला=रामानें धैर्य सोडलें.

केला आधीं फार
शोध, मग शोक,
धन जातां लोक
करी जैसा. ७१

शोधितां वनांत
[1]मामाजी पाहिले,
धरूनि राहिले
कंठीं प्राण. ७२

पुसती, 'बापाजी!
झाली हे कां गति?'
मामाजी सांगती
[2]अर्ध-शब्दें. ७३

स्वामींपाशीं माझें
सांगतां हरण
पावले मरण
[3]शोक-भरें. ७४

'हा तात! हा तात!'
म्हणूनि [4]रडले,
[5]मूर्छित पडले
घडीभरी. ७५

मामाजींची [6]सांग
[7]संपादिली [8]क्रिया;
त्याकाळीं हे [9]प्रिया
नाठविली. ७६

पुन्हां वनीं मातें
रडत शोधिती,
लक्ष्मण [10]बोधिती
[11]नाना-यत्नें. ७७

१. **ज**टायु. २. [प्राण व्याकुळ झाल्यामुळें शब्द बरोबर उमटत नव्हता म्हणून] अस्पष्ट वाणीनें. ३. अत्यंत शोकामुळें. ४. याचा कर्ता '**रा**म' अध्याहृत. ५. मूर्छा येऊन. ६. पूर्ण. ७. केली. ८. मृताची उत्तरक्रिया. ९. मी (**सी**ता.) **रा**माला **सी**तेचा विरह जरी दुःसह होता, तरी **ज**टायूची उत्तरक्रिया प्रथम सांग केल्याचें सांगून **रा**माची कर्तव्यतत्परता दाखविली आहे. १०. समजूत करीत होते. ११. पुष्कळ प्रकारानें.

आलिंगिल्या वेल्ली[1],
वियोगें भ्रमले[2],
शोधितां श्रमले
रात्रंदिस. ७८

वनीं कबंधानें[3]
केला होता घात,
चार कोस हात
लांब त्याचे. ७९

धरितां खड्गांनीं
केला भुजच्छेद[4];
शाप-ताप-खेद[5]
निवारिला. ८०

मतंग[6]-मुनीच्या
आश्रमीं शबरी[7]
व्हाया यश बरी
युक्ति[8] सांगे. ८१

हनुमंतावरी[9]
केली अनु-कंपा[10]
या प्रभूंनीं पंपा[11]-
सरोवरीं. ८२

---

१. वेली. २. माझ्या वियोगाच्या योगानें ते अगदीं वेडाऊन गेले व म्हणूनच त्यांनीं वेली आलिंगिल्या. ३. हा राक्षस मुळचा गंधर्व असून मुनिशापानें राक्षसयोनींत जन्म पावला. याचे हात चार कोस लांब असून त्यांत जें सांपडेल तें तो भक्षण करी. याचें मस्तक इंद्राच्या वज्रप्रहारानें हृदयप्रदेशांत दडपून गेल्यामुळें याचा देह कबंध (मस्तकरहित) दिसे. ४. भुज (हात)+छेद केला=हात तोडले. ५. रामाच्या हातून कबंधाचा वध झाल्यामुळें तो शापमुक्त झाला म्हणून तो त्रासांतून व दुःखांतून सुटला. ६. मतंग नांवाचा ऋषि शबरीचा गुरु होता. ७. भिल्लीण. हिचें नांव श्रमणा होतें. ही एक तापसी होती. हिचीं उष्टीं बोरें रामानें मोठ्या प्रेमानें खाल्लीं अशी कथा आहे. ८. ऋष्यमूक पर्वतावर सुग्रीव वानर आहे त्याचें साहाय्य घे म्हणजे सीतेचा तुला शोध लागून तुझें कल्याण होईल अशी युक्ति शबरीनें सांगितली. ९. मारुतीवर. १०. कृपा. ११. हें सरोवर ऋष्यमूक पर्वताजवळ आहे.

सुग्रीवासीं भेटी
ऋष्यमूकीं झाली,
त्याची दृष्टि [1]धाली
पाहतांचि. ८३

त्याच्या मुखें वृत्त
[2]आयकिलें, मग
आणूनि ते [3]नग
[4]दाखविले. ८४

सुग्रीव वानर
सूर्याचा [5]तनय,
ज्या स्वप्नीं [6]अ-नय
नाहीं ठावा. ८५

[7]दोषाविणें [8]रागें
सुग्रीवासी [9]जाची,
त्याच्या [10]अग्र-जाची
बुद्धि खोटी. ८६

[11]बंधूंची स्त्री वाळी
[12]बळात्कारें भोगी,
सुग्रीव तो [13]जोगी
केला होता. ८७

एके बाणें वाळी
स्वामींनीं मारिला,
सुग्रीव तारिला
संकटांत. ८८

वानरांचें राज्य
दिलें सुग्रीवाला,
तो फार [14]निवाला
उपकारें. ८९

१. समाधान पावली. २. याचा कर्ता '**रा**मानें' अध्याहृत. ३. [**सी**तेनें टाकिलेले व वानरांना सांपडलेले] दागिने. ४. याचा कर्ता '**सु**ग्रीवानें' अध्याहृत. ५. मुलगा. ६. अनीति; वाईट आचरण. ७. अपराधावांचून; विनाकारण. ८. रागानें. ९. [**सु**ग्रीवाला **वा**ळी] छळी. १०. वडील भावाची (**वा**ळीची.) ११. **सु**ग्रीवाची. **सु**ग्रीवाच्या बायकोचें नांव **रु**मा होतें. १२. **सु**ग्रीवाची बायको **वा**ळीनें बळकाविली होती. १३. **सु**ग्रीवाचें सर्वस्व (बायको व राज्य) घेऊन **वा**ळीनें त्यास बाहेर काढिलें होतें, अर्थात् तो जोगी (बैरागी) झाला होता. १४. संतुष्ट झाला.

माझी वार्ता कोणा
न कळे किमपि,
पाठविले कंपि[1]
  शोधावया. ९०

न लागतां माझा
शोध कपि सारे
म्हणती ते, 'हा रे!
  दूरदृष्टा[2]! ९१

मारील सुग्रीव
लंघिला[3] अवधि[4],
मरावें, नव-धी[5]
  करूं नये.' ९२

समुद्राच्या तीरीं
पर्वतीं रडले[6],
मराया पडले
  उपोषित. ९३

'धिक्कार आह्मांला,
झालों सेवाँ-चोर[7],
व्यर्थ मृत्यु, थोर[8]
  खेद वाटे. ९४

श्री-रामाची भार्या
सोडवितां मेला
जटायु, तो गेला
  सद्गतीसी[9].' ९५

ऐसें जी बोलिले
वाणी, दे कंपा[10] ती,
विचारी [11]संपाति
  गृध्र-राज. ९६

१. वानर. २. दुस् (वाईट)+अदृष्ट (दैव)=हे दुष्ट दैवा! ३. [जर] टळला. ४. वेळ. सुग्रीवानें वानरांना असें सांगितलें होतें कीं एक महिन्यांत सीतेचा शोध लावून आणा; ह्मणून मुदत टळेल अशी वानरांना भीति वाटली—असा भाव. ५. नव (नवीन)+धी (विचार)=नवा विचार; दुसरा विचार. 'येथेंच उपोषित (कांहीं न खातां) राहून मरावें' असा विचार वानरांनीं केला. ६. याचा कर्ता 'वानर' अध्याहृत. ७. चाकरी करण्यांत कुचर. ८. जटायूनें सीता सोडविण्याची खटपट केली आणि तींत तो मेला म्हणून त्याला उत्तम गति प्राप्त झाली, आम्हांला मात्र व्यर्थ मृत्यु येणार. (का० सं०.) ९. चांगल्या गतीस; मुक्तीस. १०. ती वाणी (जटायु मेला हें बोलणें) [संपातीला] कंपा (भीति) दे. ११. जटायूचा थोरला भाऊ.

वार्ता वाटे कानीं
पडतां [1]शंपा ती,
रडला संपाति
बंधु-शोकें. ९७

[2]त्यानें सांगितली
[3]त्यांला माझी [4]शुद्धि,
त्या [5]कवीची बुद्धि
[6]सम-दृष्टि. ९८

[7]शत-गांवें बाई!
मारुति उडाला,
[8]पुण्यें न बुडाला
सागरांत. ९९

[9]पुरी शोधी, होय
[10]स-शोक मनांत,
अशोक-वनांत
मग आला. १००

तों रात्रीं रावण
प्रार्थी, बडबडे;
बुद्धि [11]गडबडे
मारुतीची. १०१

[12]पाण्यापरीस मीं
पातळ तो केला;
मग रागें मेला
असें म्हणे, १०२

१. वीज. ती वार्ता कानीं पडतां शंपा वाटे—असा अन्वय. बंधूच्या मरणाचा सर्व वृत्तांत ऐकल्यावर आपल्या अंगावर वीजच पडली काय असें त्यास वाटलें. (का० सं०.) २. संपातीनें. ३. वानरांना. ४. शोध. ५. ज्ञाता, शहाणा त्याची (संपातीची). ६. समदृष्टि (सारखी दृष्टि)=त्याचें चित्त स्थिर होतें. बंधुशोकानें सुद्धां त्याच्या वृत्तीमध्यें फरक झाला नाहीं. माझ्यामुळें त्याचा भाऊ मेला तरी माझ्यावर त्याचा कोप झाला नाहीं. (का० सं०.) ७. चारशें कोस. ८. पुण्याई-मुळें. ९. लंका नगरी. १०. दुःखी. ११. सीतेच्या पुढें रावणानें उच्चारलेले विनंतिपूर्वक लघळपणाचे शब्द ऐकून मारुतीची चित्तवृत्ति साशंक झाली. जिच्यासाठीं आपण समुद्रोल्लंघन केलें ती रावणाला वश आहे अशी शंका येऊन त्याचें चित्त भ्रमलें. (का० सं०.) १२. पाणउतारा केला; धिक्कार केला; झिटकारून टाकिला. कोणेकास पाण्यापरीस (पाण्यापेक्षां) पातळ करणें म्हणजे त्याचा केवळ पाणउतारा करणें.

‘[1]दों [2]मासांत [3]मान्य
न होतां [4]हे मारा,
राक्षसी हो! चारा
[5]मांस [6]मज.’ १०३

ऐसें राक्षसींला
सांगोनि तो जाय;
म्हणे ‘हाय! हाय!’
हनुमंत. १०४

हळूच मारुति
[7]सद्गुण-समुद्रा
[8]वर्णी, मग [9]मुद्रा
मज दावी. १०५

निववी हृदय
प्रिय-सखी मुद्रा,
काय [10]सुधा [11]क्षुद्रा
निववील? १०६

मज [12]म्हणे, ‘चाल,
बैस माझे स्कंधीं,
तूं [13]दुर्गा, मी नंदी,
दास तुझा.’ १०७

तेव्हां मी बोलिल्यें,
‘नेशील बा! खरें,
परी नव्हे बरें
असें जाणें. १०८

युद्धीं मारितील
या मेल्यासी स्वामी,
तेव्हां मुख बा! मी
दाखवीन.’ १०९

मग तें अशोक-
वन कपि मोडी,
राक्षसांचें झोडी
[14]बळें सैन्य. ११०

१. दोन. २. महिन्यांत. ३. कबूल. ४. ही (सीता). ५. [सीतेचें] मांस. ६. मला (रावणाला). ७. सद्गुणांच्या सागराला (रामाला). ८. वर्णन करी. ९. आंगठी. १०. अमृत. ११. यःकश्चित्. यःकश्चित् अमृतानें माझी काय तृप्ति झाली असती? १२. याचा कर्ता ‘मारुति’अध्याहृत. १३. पार्वती. १४. बळानें, सामर्थ्यानें.

मारिला [1]संगरीं
रावणाचा अक्ष
[2]कुमार, जो दक्ष
[3]रण-रंगीं. १११

इंद्र-जिताला [4]तो
दाटूनि सांपडे,
हनुमंत पडे
[5]ब्रह्म-पाशीं. ११२

रावणें वानर
मानूनियां तुच्छ
पेटविलें [6]पुच्छ
जाळावया. ११३

पुच्छ पेटतांचि
हनुमंत उडे,
लंकेमध्यें [7]हूडे
वाडे जाळी. ११४

देवांनीं [8]वदनीं
घातली [9]आंगोळी
लंकेची रांगोळी
पाहोनियां. ११५

विचारोनि मज
जाय स्वामीकडे,
पायांवरी पडे
हनुमंत. ११६

माझा समाचार
ऐकोनि हर्षले,
[10]प्रेमाश्रु वर्षले
स्वामी माझे. ११७

स्वामींस [11]मद्वृत्त
करी [12]सु-प्रसन्न,
जैसें दिव्य अन्न
[13]क्षुधार्ताला. ११८

हनुमंतावरी
झाली दया मोठी,
उपकार कोटि
[14]मानियेले. ११९

१. युद्धांत. २. मुलगा (अक्ष या नांवाचा). ३. रणांगणीं. ४. मारुति. ५. ब्रम्हास्त्राच्या पाशांत. ६. शेंपूट. ७. बुरूज. ८. तोंडांत. ९. बोट; बोटें. १०. आनंदाचे अश्रु. ११.माझी हकीकत. १२.आनंदित. १३.क्षुधा (भुकेनें)+आर्ताला (पीडित जो त्यास)=भुकेल्याला. १४.याचा कर्ता 'रामचंद्रांनीं' अध्याहृत.

निघाले घेऊनि
वानरांची सेना,
[1]धरणीं दिसेना
[2]सूर्य-प्रभा. १२०
रावण [3]धर्माच्या
वाटे न लागला,
सांगोनि [4]भागला
बिभीषण. १२१
[5]नायके रावण,
[6]क्रोधानळें पेटे;
[7]श्रीमंतांसी [8]भेटे
[9]सिंधु-तटीं. १२२
[10]म्हणे, '[11]गुण-कल्प-
वृक्षांच्या अरण्या!
दयाळा! [12]शरण्या!
रक्षीं मज.' १२३
स्वामींचें [13]शरणा-
गतीं प्रेम [14]प्राज्य,
दिलें लंका-राज्य
वंदितांचि. १२४
भेटला [15]सागर,
जोडोनियां [16]करीं
म्हणे, 'सेतु करा,
तारा मज'. १२५
शत गांवें सेतु
समुद्रीं रचिला,
[17]पर्वतीं खचिला,
मार्ग मोठा. १२६

१. पृथ्वीवर. २. सूर्याचा प्रकाश. इतकी वानरसेना मोठी होती कीं पृथ्वीवर सूर्याचा प्रकाश दिसेना. ३. चांगल्या मार्गाच्या. ४. थकला; दमला. 'सीतेला रामाकडे पाठवून दे' असें सांगून बिभीषण दमला. ५. ऐकेना. ६. क्रोध (राग)+अनळ(अग्नि)=बिभीषणाच्या उपदेशानें रावणाच्या मनावर चांगला परिणाम तर कांहीं झाला नाहीं, पण उलट तो क्रोधरूपी अग्नीनें पेटला (रागावला). ७. रामाला. ८. याचा कर्ता 'बिभीषण' अध्याहृत. ९. समुद्राचे तिरीं (रामेश्वराजवळ). १०. याचा कर्ता 'बिभीषण' अध्याहृत. ११. सद्गुणांचे कल्पवृक्ष जेथें अनेक आहेत अशा रामा! (का० सं०). १२. शरण येणाऱ्यांचें रक्षण करणाऱ्या (रामा)! १३. शरण आलेल्यांचे ठिकाणीं. १४. पुष्कळ. १५. समुद्र. १६. हात. १७. पर्वतप्राय दगडांनीं (का० सं०).

[1]सेतु-पंथें सिंधु
लंघूनियां [2]आले,
[3]वार्तामृतें [4]धाले
कर्ण माझे. १२७

[5]दूत पाठविला
[6]दुर्जन-भंग-द
तेजस्वी अंगद
वालि-पुत्र. १२८

स्वामींचा निरोप
दोहीं [7]लोकीं [8]पथ्य
सांगितला [9]तथ्य
अंगदानें. १२९

[10]खळ [11]नेघे वाक्य
स्वामींचें [12]तोखद,
न [13]सेवी [14]ओखद
[15]गतायुष्य. १३०

[16]म्हणे, 'आह्मांपुढें
बोलतें [17]वांकडें,
मर्यादा माकडें
टाकिली कीं! १३१

राक्षस हो! धरा,
मारा, धांवा, चावा,
पळ न वांचवा
हा [18]मर्कट.' १३२

अंगासीं राक्षस
झोंबले चवघे,
झाडोनि अवघे
पिष्ट [19]केले. १३३

---

१. सेतु (पूल; बांध)+पंथें (मार्गानें)=पुलावरून. २. याचा कर्ता 'श्रीरामचंद्र' अध्याहृत. ३. वार्ता+अमृत=वार्तारूपी अमृतानें. ४. तृप्त झाले. ५. निरोप सांगणारा; शिष्टाई करणारा. ६. दुर्जन (वाईट लोक)+भंग (पराभव)+द (देणारा)=वाईट लोकांचा पराभव करणारा. ७. मृत्युलोकीं व स्वर्गलोकीं. दोहीं लोकीं पथ्य=प्रपंच व परमार्थ यांस हितकर (का० सं०). ८. हितावह; चांगला. ९. खरा; जसा होता तसा. १०. दुष्ट (रावण). ११. घेईना; ऐकेना; मानीना. १२. तोख (आनंद)+द (देणारें)=आनंद देणारें. १३. घेई. १४. औषध. १५. गत (गेलें आहे, संपलें आहे)+आयुष्य ज्याचें असा (ज्याचें मरण जवळ आलें आहे तो). १६. याचा कर्ता 'रावण' अध्याहृत. १७. भलतें सलतें. १८. वानर (अंगद). १९. याचा कर्ता 'अंगदानें' अध्याहृत.

उडतां मोडिली
स्वर्ण[१]-वज्र-सभा,
मळविली प्रभा[२]
रावणाची. १३४

धर्म[३]-मर्यादेच्या
संकोचें[४] थोपले[५],
अधर्मे[६] कोपले[७]
राक्षसाच्या. १३५

ज्यांला[८] चावावया
वज्राहूनि[९] गांढा[१०]
काळाच्याही दाढा
न शकल्या, १३६

ते राक्षस लक्ष-
कोटि बळें[११]-पूर्ण
वानरांनीं चूर्ण
नखीं केले. १३७

रक्त-नद्या तेथें
शतशा वाहिल्या,
देवांनीं पाहिल्या
डोळेभर. १३८

मारिले प्रधान,
रावणाचे पोर,
त्यांत बळी[१२] थोर
इंद्र-जित. १३९

रावणाचा भ्राता
कुंभकर्ण काळ[१३],
तेणें कपि-पाळ[१४]
धरियेला. १४०

१. स्वर्ण (सोनें)+वज्र (हिरे)+सभा=सोनें व हिरे ह्यांचें बनविलेलें सभास्थान. २. तेज. ३. एकदम शत्रूवर स्वारी करूं नये असा धर्मयुद्धाचा नियम आहे. ४. प्रतिबंधानें. ५. [राम] थांबले होते. एकदम रामानें स्वारी केली नाहीं. प्रथम अंगद शिष्टाईकरितां पाठविला. ६. अधर्मानें, अन्यायानें [रावणाच्या]. ७. [राम] रागावले. ८. ज्या राक्षसांना. ९. वज्र=इंद्राचें आयुध. १०. कठिण; प्रत्यक्ष काळाच्या सर्वभक्षी जबड्यालाहि जे अगम्य ते राक्षस वानरांनीं नखांनीं फाडून टाकिले! (का० सं०.) ११. बलयुक्त; शूर. १२. बळकट; शक्तिवान्. १३. भयंकर. १४. कपि (वानर)+पाळ (पालन करणारा)=वानरांचा राजा (सुग्रीव).

वहिणीची तैशी
त्याची करी गति
स्वयें कपि-पति
सुटोनियां. १४१

जसे वरे गरे,
बहु कपि-भट
तेणें गटगट
गिळियेले. १४२

पळाया त्यां वाट
मिळे कर्णीं नाकीं.
मिथ्यां वणार्नी कीं
जानकी मी. १४३

प्रभूंनीं हरिलें
तत्तेज सर्व तें,
पुरेले पर्वतें
वज्रापुढें. १४४

माझे स्वामी झाले
त्या तमा तरणी,
त्यांची मात रणीं
काय सांगों? १४५

१. कुंभकर्णाची वहीण शूर्पणखा तिचें नाक व कान जसे लक्ष्मणानें कापिले तसें सुग्रीवानें कुंभकर्णाचें नाक व कान कापिले (नवनीत). २. सुग्रीव. ३. वरके. ४. फणसाचे गरे. ५. कपि (वानर)+भट (योद्धे)= वानरयोद्धे; शूर वानर. ६. कुंभकर्णानें. ७. कुंभकर्णानें गिळलेल्या वानरांना. ८. कानांतून. ९. नाकांतून. कुंभकर्णानें गिळलेले वानर त्याच्या कानांतून व नाकांतून वाहेर आले—असा भाव. १०. खोटेपणानें; अतिशयोक्तीनें. ११. कुंभकर्णाचें तेज. १२. न टिकावें. १३. पर्वतानें. १४. इंद्राच्या आयुधापुढें. १५. त्या तमा (कुंभकर्णरूपी अंधकाराला). १६. माझे स्वामी (श्रीरामचंद्र) तरणी (सूर्य) झाले—असा भाव. १७. गोष्ट. १८. रामचंद्र हा वज्र अगर सूर्य व राक्षस हे पर्वत अगर अंधकार; असें उभयतांचें वर्णन केल्यावर युद्धाचें वृत्त आणखी काय सांगावयाचें आहे? (का० सं०).

इंद्रासी [1]अ-सह्य
इंद्र-जित, परी
मारिला तो अरि
भावोजींनीं. १४६

[2]वोहूनि मस्तकें
तो[3]षविला [4]भर्ग,
[5]कांपविला स्वर्ग
कैलासही, १४७

[6]तो काय सामान्य?
परी झाला गर्व,
त्याचें तेज सर्व
वायां गेलें. १४८

मारिला प्रभूंनीं
[7]सह-परिवार,
उतरिला भार
धरणीचा. १४९

उर्मिळे! मूर्छित
तुझे माझे [8]धणी
झाले होते रणीं
सेनेसह. १५०

वांचविले सर्व
[9]हनुमंतें बाई!
सांगों याचे काई
उपकार? १५१

[10]ओषधि-पर्वत
[11]स-मूळ [12]खांणिला,
[13]घटींत आणिला,
जैसा चेंडू. १५२

१. न आवरण्यासारिखा. २. अर्पण करून. रावणानें शंकरास प्रसन्न करण्यासाठीं आपलीं मस्तकें अर्पण केलीं होतीं, अशी त्याची उग्रतम तपश्चर्या होती. (का० सं०.) ३. संतुष्ट केला. 'तोषविला' या क्रियापदाचा कर्ता 'ज्या रावणानें' अध्याहृत. ४. शंकर. ५. हालविला. 'कांपविला' याचा कर्ता 'ज्या रावणानें' अध्याहृत. एके समयीं रावणानें कैलासपर्वत हालविला होता, इतका तो बलवान् होता. ६. रावण. ७. आप्त, बांधव, सैन्य यांसह. ८. पति. ९. हनुमंतानें; मारुतीनें. १०. औषधी वनस्पती ज्या पर्वतावर आहेत तो द्रोणागिरी पर्वत. ११. मूळापासून; अगदीं खालपासून. १२. खणून काढिला; उपटून काढिला. १३. घटकेंत.

हनुमंतें आह्मां
दिलें [1]चुडे-दान.
ऐसा नाहीं [2]आन
आप्त कोणी. १५३

उठले वानर
अमृत-वृष्टीनें,
स्वामींच्या दृष्टीनें
हेंचि सत्य. १५४

[3]शिबिकेंत मज
घालोनि आणिलें;
देह म्यां न्हाणिलें
[4]अग्नि-कुंडीं. १५५

त्या काळीं देवांनीं
केली [5]पुष्प-वृष्टि,
आनंदानें सृष्टि
[6]कोंदाटली. १५६

आले **द**शरथ
मामाजी विमानीं,
[7]धन्या [8]जीवीं मानी
आपणा मी. १५७

देवांची [9]प्रार्थना,
मामाजींची [10]आज्ञा,
[11]केली सर्व [12]प्राज्ञा
सुखवाया. १५८

१. चुडेदान दिलें=(नवऱ्याचे प्राण वांचवून) सौभाग्य दिलें. २. अन्य; दुसरा. ३. पालखींत. ४. अग्निकुंडांत **सी**तेनें उडी घालून दिव्य केलें तेव्हां ती जशीच्या तशीच बाहेर आली; म्हणून ती शुद्ध व पवित्र राहिली होती हें सिद्ध झालें. ५. देवांनीं फुलें **सी**तेवर टाकिलीं. ६. भरली; व्यापिली. ७. कृतकृत्य. ८. मनांत. ९. **रा**वण मनुष्याच्या हातून मरावयाचा होता म्हणून मनुष्यरूपानें अवतार घेऊन **रा**वणाला मारावा अशी देवांची प्रार्थना. १०. चौदा वर्षें वनांत जावयाची **द**शरथाची आज्ञा. ११. पूर्ण केली. याचा कर्ता 'श्री**रा**मचंद्रानें' अध्याहृत. १२. प्राज्ञा=सुज्ञ लोकांना; शहाण्या लोकांना.



······ देह म्यां झाणिलें । अग्निकुंडीं ॥
त्या काळीं देवांनीं । केली पुष्पवृष्टि । आनंदानें सृष्टि । कोंदाटली ॥

सीतागीत, अभंग १५५, १५६.

हनुमंतें आज्ञा
दिलें चुडे-दान,
ऐसा नाहीं आन
आप्त कोणी. १५३

उठले वानर
अमृत-वृष्टीनें,
स्वामींच्या दृष्टीनें
[illegible] १५४

शिविकेंत भज
घालोनि आणिलें;
देह [illegible] न्हाणिलें
[illegible] [illegible]

त्या काळीं देवांनीं
केली पुष्प-वृष्टि,
आनंदानें सृष्टि
कोंदाटली. १५६

आले दशरथ
मामाजी विमानीं,
धन्या जीवीं मानी
आपणा मी. १५७

देवांची प्रार्थना,
मामाजींची आज्ञा,
केली सर्व प्राज्ञा
सुखवाया. १५८

[illegible] (वरून) सौभाग्य दिलें. २. अन्य; [illegible] सीतेनें उडी घालून दिव्य केलें तेव्हां [illegible] ती शुद्ध व पवित्र राहिली होती हें [illegible] सीतेवर टाकिली. ६. भरली; व्यापिली. [illegible] मनुष्याच्या हातून मरावयाचा होता [illegible] रावणाला मारावा अशी देवांची प्रार्थना. [illegible] दशरथाची आज्ञा. ११. पूर्ण केली. याचा [illegible] लोकांना. [illegible] प्राज्ञा=सुज्ञ लोकांना; शहाण्या



...... देह म्यां न्हाणिलें । अग्निकुंडीं ॥
त्या काळीं देवांनीं । केली पुष्पवृष्टि । आनंदानें सृष्टि । कोंदाटली ॥

सीतागीत, अभंग १५५, १५६.

मांडीवरी मज
घेतलें स्वामींनीं,
घनीं[1] सौदामिनी[2]
जनां वाटे.[3] १५९.

भृंग-युक्त[4] पति
पुष्पक-विमानीं[5]
पुष्प कवि मानी,
जैं बैसले. १६०

स्वामींनीं समुद्रीं
दाखविला[6] सेतु,
भवाब्धींत[7] हेतु[8]
तराया जो. १६१

रुंद दहा गांवें,
लांब शत गांवें,
पाप न तगावें[9]
जो देखतां. १६२

दाविली किष्किंधा,[10]
भेटविली तारा
सुग्रीवाची दारा[11]
जाऊबाई. १६३

१. मेघाचे ठिकाणीं. २. वीज. ३. श्यामवर्ण रामचंद्राच्या मांडीवर सीतादेवी बसली त्या वेळेस लोकांना ती मेघामध्यें जशी वीज त्याप्रमाणें भासली. ४. जैं पति पुष्पकविमानीं बैसले [तेव्हां तें विमान] भृंगयुक्त पुष्प [असें] कवि मानी—हा अन्वय. जेव्हां रामचंद्र पुष्पकविमानांत बसले तेव्हां [राम नीलवर्ण असल्यामुळें] कवीस वाटलें कीं, हें विमान भृंगानें (भुंग्यानें) सुशोभित असें एक कमलपुष्पच आहे! (का० सं०.) ५. पुष्पक या नांवाचें विमान. ६. परत येतांना दाखविला. ७. भव (संसार)+अब्धि (समुद्र)=संसारसमुद्रांत. ८. साधन. ९. टिकावें; उरावें. जो सेतु पाहिला असतां पाप राहत नाहीं. १०. किष्किंधा ही सुग्रीवाच्या राज्यांतील मुख्य नगरी होती. या ठिकाणीं हल्लीं अनागोंदी नांवाचें खेडें आहे. ११. बायको.